इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - २३६ ▸ सोमवार,ता.२९ डिसेंबर २०२५ ▸ पाने १२
इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

### गणपतीपुळे पर्यटकांनी गजबजला

**रत्नागिरी,ता.२८–**

जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ व लाखो भाविकांचे श्रध्देस्थान असलेल्या गणपतीपुळे येथे सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांची मोठी गर्दी होऊ लागली आहे.गर्दीच्या पार्श्वभूमीवर जयगड पोलीस ठाण्याकडून विशेष बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.मंदिर परिसर आणि समुद्र किनाऱ्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.किनाऱ्यावरील गर्दीच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्हा पोलीस दलाकडून जादा कर्मचारी बंदोबस्तासाठी गणपतीपुळे येथे पाठविण्यात आले आहेत.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव

### भारतात मलेरियाच्या प्रकरणांमध्ये घट

**अहमदाबाद,ता.२८**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितले की, भारतातील मलेरियाच्या रुग्णसंख्येत ९७ टक्क्यांनी घट झाली असून देश लवकरच या आजारातून मुक्त होणार आहे.अहमदाबादमधील शेला येथे आयोजित भारतीय वैद्यकीय संघटना (आयएमए) च्या परिषदेला संबोधित करताना शहा म्हणाले की,आयुष्मान भारत आणि मिशन इंद्रधनुष यांसारख्या आरोग्य योजनांमुळे मलेरियाच्या रुग्णसंख्येत मोठी घट नोंदवण्यात आली आहे.डेंग्यूमुळे होणाऱ्या मृत्यूदरात घट होऊन तो आता केवळ १ टक्का राहिला आहे तर मातृ मृत्यूदरात २५ टक्क्यांनी घट झाली आहे.

www.emahasatta.com | e-mail : mahasatta@gmail.com | mahasattaadvt@gmail.com | किंमत ₹ ५.००



### मालगाडी घसरली

■ पाटणा,ता.२८–

**बिहारमधील हावडा–पाटणा–दिल्ली मुख्य रेल्वे मार्गावरील सिमुलतला स्टेशनजवळ शनिवारी रात्री उशिरा मालगाडी रुळावरून घसरली.**

यावेळी तीन डबे पुलावरून बरुआ नदीत कोसळले आणि डझनभर डबे (पान २ वर)

### पुतिन यांचा युक्रेनला इशारा

■ मॉस्को,ता.२८–



**रशिया–युक्रेन युध्दाला बराच काळ लोटला असला तरी दोन्ही देशांमधील संघर्ष संपण्याची चिन्हे दिसत नाहीत.**

अशा परिस्थितीत रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी युक्रेनला इशारा देत म्हटले की,कीव दोन्ही देशांमधील संघर्ष शांततापूर्ण मार्गाने संपवण्याबाबत कोणतीही घाई (पान २ वर)

### खालिदा झिया यांची प्रकृती चिंताजनक

■ ढाका,ता.२८–



**बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली आहे.**

त्यांच्या वैयक्तिक डॉक्टरांनी सांगितले आहे की,त्यांची अवस्था सध्या अत्यंत गंभीर आहे.८० वर्षांच्या खालिदा झिया सध्या ढाक्यातील एव्हरकेअर रुग्णालयात दाखल आहेत. बांगलादेश (पान २ वर)



### कापरीत बिबट्याचे पिल्लू आढळले

■ शिराळा,ता.२८ (प्रतिनिधी)–

**कापरी येथे अविनाश आनंदराव निकम यांच्या शेतात ऊसतोड चालू असतानाच बिबट्याचे पिल्ल आढळून आले.** (पान २ वर)

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १४०३०० रु. | २५४००० रु. |

अंडी ७१० रुपये शेकडा

### हास्यतुषार




# ‘ऑपरेशन सिंदूर’मुळे पाक सरकार धास्तावले होते

## भारताचे दहशतवादी तळांवर अचूक हल्ले
## पाकचे राष्ट्राध्यक्ष झरदारी यांची कबुली

■ इस्लामाबाद,ता.२८–



**२२ एप्रिल भारतासाठी काळा दिवस ठरला होता. या दिवशी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता.**

या हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल भारताने मे महिन्याच्या सुरुवातीला ‘ऑपरेशन सिंदूर’ अंतर्गत पाकिस्तान आणि पाकिस्तानव्याप्त जम्मू–काश्मिरमधील दहशतवादी आणि लष्करी तळांना लक्ष्य केले होते. या कारवाईमुळे पाकिस्तानमध्ये खळबळ उडाली होती. पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष आसिफ अली झरदारी यांनी भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान पाकिस्तानच्या नेतृत्वात भीतीचे वातावरण होते




हे कबूल केले आहे.

भारतीय हल्ल्यांच्या वेळी त्यांच्या मिलिट्री सेक्रेटरीने त्यांना सुरक्षेसाठी बंकरमध्ये जाण्याचा सल्ला दिला होता.माझे मिलिट्री सेक्रेटरी माझ्याकडे आले आणि म्हणाले की, युध्द सुरू झाले आहे. त्यांनी मला सांगितले की, आपल्याला बंकरमध्ये जायला हवे.पण मी नकार दिला.

भारताने ‘ऑपरेशन सिंदूर’ची सुरुवात केली होती. या मोहिमे अंतर्गत भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी तळांवर अचूक हल्ले केले.त्यानंतर पाकिस्तानने प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला असता, भारतीय सैन्याने पाकिस्तानी लष्करी तळांवर लक्ष्य केले.या हल्ल्यांनी पाकिस्तानच्या लष्करी सज्जतेवर आणि संरक्षण क्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले होते.भारताच्या कारवाईनंतर सीमेवर तणाव आणखी वाढला. (पान २ वर)



# राष्ट्रपतींची कदंब नौदल तळाला भेट

## आयएनएस वागशीर पाणबुडीवरून ऐतिहासिक प्रवास

■ कारवार,ता.२८–

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी रविवारी कर्नाटकातील उत्तर कन्नड जिल्ह्यातील कारवार येथील कदंब नौदल तळाला पहिल्यांदाच भेट दिली आणि अरबी समुद्रात भारतीय नौदलाच्या पाणबुडी आयएनएस वागशीरवर प्रवास केला.यामुळे पाणबुडीवरून प्रवास करणाऱ्या त्या भारताच्या दुसऱ्या राष्ट्रपती ठरल्या आहेत.**

कदंब नौदल तळावर पोहोचल्यानंतर, कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी राष्ट्रपती मुर्मू यांचे स्वागत केले. आशियातील सर्वांत मोठ्या नौदल तळांपैकी एक असलेल्या कदंब नौदल तळाचा दुसरा टप्पा पूर्ण झाला आहे हे उल्लेखनीय आहे.हा तळ आता (पान २ वर)

# थलापती विजयचा चित्रपटसृष्टीला रामराम

■ मुंबई,ता.२८–

**दाक्षिणात्य सुपरस्टार थलापती विजयने फिल्म इंडस्ट्रीला रामराम केला आहे. अभिनेत्याचा शेवटचा चित्रपट ‘जाना नायकन’ जानेवारीमध्ये प्रदर्शित होणार आहे.**

यापूर्वी, २७ डिसेंबरला मलेशियामध्ये ‘जाना नायकन’चा ऑडिओ लाँच कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमादरम्यान अभिनेता भावूक झाला आणि त्याने (पान २ वर)



## राजकारणात प्रवेश करणार

# ठाकरे बंधूंना पवारांची साथ

## मुंबई महानगरपालिकेसाठी युती

■ मुंबई,ता.२८–

**महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे.महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधूंची युती झाल्यानंतर त्यांच्यासोबत महाविकास आघाडीचे पक्ष जाणार का? असा सवाल उपस्थित केला जात होता.अशातच अखेर मुंबई महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने ठाकरे बंधूंबरोबर युती केली आहे.**

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला उबाठा मनसे युतीकडून १० जागा देण्यात आल्या आहेत. राष्ट्रवादी



काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा ५२ जागांच्या मागणीचा प्रवास अखेर १० जागांवर येऊन संपला आहे.त्यामुळे आता मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत ठाकरे बंधूंबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष देखील सहभागी असणार आहे. गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष मुंबईत कोणाबरोबर जणार याबाबतची चर्चा सुरु होती. अखेर हा मुद्दा निकाली निघाला आहे.शरद पवार यांच्या पक्षाची ठाकरे बंधूंबरोबर युती झालेली आहे.त्यामुळे आता महाराष्ट्र नवनिर्माण सेना (पान २ वर)

# पवार काका-पुतण्या बारामतीत एकाच मंचावर

■ पुणे,ता.२८–

**बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या उद्घाटन प्रसंगी राजकीय घडामोड दिसून आली.यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात चर्चा झाली.**

कार्यक्रमाच्या आसन व्यवस्थेनुसार शरद पवार आणि अजित पवार यांच्यामध्ये उद्योगपती गौतम अदानी यांच्यासाठी खुर्ची ठेवण्यात आली होती.मात्र, काही चर्चा करण्यासाठी अजित पवार हे शरद पवार यांच्या बाजूच्या खुर्चीत येऊन बसले आणि दोघांमध्ये बोलणे सुरू झाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी,बारामतीच्या दोन खासदार म्हणून सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांची नावे घेतली.तसेच, आमदार रोहित पवार यांचाही उल्लेख केल्याने हशा पिकला. गौतम अदानी यांनी यावेळी शरद पवार यांना आपले तीन दशकांहून अधिक काळचे मार्गदर्शक संबोधले. (पान २ वर)

# गोगवेत दोन ठिकाणी घरफोडी

## चार लाखाचा मुद्देमाल लंपास

■ सरूड, ता.२८ (प्रतिनिधी)–

**शाहूवाडी तालुक्यातील गोगवे येथील सागर मारुती नांगरे व भरत ज्ञानदेव पाटील यांच्या घराचा रात्रीच्या वेळी पाठीमागील दरवाजा तोडून सोन्याच्या दागिने व रोख रक्कम असा एकूण चार लाख वीस हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली.याबाबत शाहूवाडी पोलिसात नोंद झाली आहे.**




गोगवे येथील भाजीपाला व्यापारी सागर नांगरे यांच्या घरातील मागील दरवाजा तोडून अज्ञात चोरट्याने घरातील एक लाख तीस हजार रुपये किमतीचे पाच ग्रॅम सोन्याच्या अंगठ्या व पाच ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या कर्णफुलासह तीस हजार रुपयांची रोकड लंपास केली. शेजारी असणाऱ्या भारत ज्ञानदेव पाटील यांच्या घरात प्रवेश करून चोरट्याने दोन लाख ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख दहा हजार रुपये रक्कम लंपास केली असे एकूण चार लाख वीस हजार रुपयाचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने लंपास केला.शाहूवाडी पोलीस (पान २ वर)

# राहुल गांधींना विकासाचे राजकारण समजत नाही

## अमित शहा:तामिळनाडू–बंगालमध्येही काँग्रेस पराभूत होईल

■ अहमदाबाद,ता.२८ –



**राहुल गांधी यांचा निवडणुकीतील वारंवार पराभव हा विकासाचे राजकारण न समजल्याचा परिणाम आहे. राहुल, तुम्ही आत्ताच थकू नका, पुढेही तुम्हाला पराभव पत्करावा लागणार आहे. तुम्ही पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्येही निवडणुका हरणार आहात. २०२९ मध्ये पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली भाजप पुन्हा एकदा सत्तेत येईल,असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला.**

अहमदाबादमधील एका कार्यक्रमात शहा म्हणाले की, काँग्रेसचे राजकारण देशाच्या विचारांशी जुळत नाही. राहुल गांधी विकास आणि सुशासन यांसारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी कायदेशीर आणि तांत्रिक मुद्द्यांमध्ये गुंतलेले असतात. भाजपने विश्वास आणि जनतेच्या गरजा समजून राज्य केले, म्हणूनच त्यांना निवडणुकीत वारंवार जनादेश मिळाला. तर काँग्रेस सतत पराभूत होत आहे, कारण ती जनतेला पाठिंबा असलेल्या मुद्द्यांपासून दूर आहे.काँग्रेसने त्या सर्व धोरणात्मक निर्णयांना विरोध केला, ज्यांना जनतेचा पाठिंबा मिळाला. यात राम मंदिर, पाकिस्तानविरुद्ध एअर (पान २ वर)

**ड्रेनेज प्रकल्पामुळे ९ वॉर्डांमधील सुमारे १५ लाख लोकांना फायदा होईल. ४५०० सोसायट्यांमधील गटारांची जुनी समस्या संपली आहे. सुमारे ४०० कोटी रुपये खर्चून हे काम पूर्ण करण्यात आले, ज्यामुळे लोकांच्या आरोग्याशी संबंधित समस्याही दूर होतील,असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले.**

# सादळे मादळेत बिबट्याचा वावर

■ टोप,ता.२८(प्रतिनिधी)–

**सादळे मादळे परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वारंवार वावर दिसून येत असून त्यामुळे शेतकरी व स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शनिवारी रात्री मादळे येथील बिडकर शिवारात ऊस भरणी सुरू असताना मोकळ्या रानात बिबट्याचा वावर दिसून आल्याने गोंधळ उडाला.**

मादळे येथील पंडित बिडकर यांच्या शेतात ऊसतोड सुरू होती. शनिवारी सायंकाळी सुमारे आठच्या सुमारास ट्रॅक्टर आल्यानंतर अविनाश बिडकर हे ऊसतोड मजुरांसह शेतात ऊस भरणी करत होते. यावेळी शेतालगतच्या बांधावर गवतातून अचानक गुरगुरण्याचा आवाज आला. आवाज ऐकताच जवळच असलेली महिला घाबरून थेट ट्रॅक्टरकडे धावून आली. त्यानंतर अविनाश बिडकर यांनी काय आहे हे पाहण्यासाठी पुढे जाताच समोर बिबट्या दिसून आला. बिबट्याच्या गुरगुरण्याच्या आवाजामुळे ऊसतोड (पान २ वर)

## पश्चिम महाराष्ट्रात साखर उताऱ्यात

# कोल्हापूर विभाग आघाडीवर

■ सोलापूर,ता.२८–

**ऊस गाळप हंगाम सुरू होऊन दीड महिना उलटून गेला असून, पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक उतारा कोल्हापूर विभागाचा आहे.निव्वळ साखर उतारा हा ९.६५ इतका असून, तुलनेने सर्वाधिक साखर कारखाना असलेल्या सोलापूर जिल्ह्यात मात्र सरासरी उताराही ९ टक्क्याच्या खाली आहे.**



राज्यात ९१ सहकारी आणि ९३ खासगी मिळून १८४ साखर कारखान्यांचा ऊस गाळप हंगाम सुरू आहे. यामध्ये ८० लाख मेट्रिक टनाइतके सर्वाधिक ऊस गाळप पूर्ण करून पुणे विभागाने आघाडी घेतली आहे.७७.९८ लाख मेट्रिक टन गाळपासह कोल्हापूर विभाग ऊस गाळपात दुसऱ्या स्थानी आहे. विशेष म्हणजे ९.६५ टक्क्यांइतका सर्वाधिक निव्वळ साखर उतारा कोल्हापूरचा असून, या विभागाने सर्वाधिक ७४.८८ लाख क्विंटल इतके साखरेचे उत्पादन केले आहे.राज्यात सद्यस्थितीत ३३६ लाख मेट्रिक टन उसाचे गाळप पूर्ण झालेले आहे. तर ८.२७ टक्के निव्वळ साखर उताऱ्यानुसार राज्यात २७ लाख ८३ हजार मेट्रिक टन नवे साखर उत्पादन तयार (पान २ वर)

## बिद्री कारखान्याचे संचालक

# राजेंद्र मोरे यांचे निधन

■ सरवडे,ता.२८(प्रतिनिधी)–

**कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघाचे व बिद्री सहकारी साखर कारखान्याचे संचालक तसेच विविध संस्थांचे मार्गदर्शक व काँग्रेसचे नेते राजेंद्र कृष्णाजी मोरे (वय ५८) यांचे रविवारी सकाळी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले.**



त्यांना उपचारासाठी कोल्हापुरातील खाजगी रुग्णालयात दाखल केले होते.परंतु उपचारा दरम्यान त्यांची प्राणज्यात मालवली.त्यांच्या आकस्मिक निधनाने कारखाना कार्यक्षेत्रासह जिल्ह्यात शोककळा पसरली आहे.

स्व. आमदार कृष्णाजी मोरे व माजी जिल्हा परिषद सदस्या पार्वतीबाई मोरे यांच्या पोटी १ जून १९६८ रोजी त्यांचा जन्म झाला. ज्येष्ठ बंधू गोकुळचे संचालक व बिद्री साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष स्व. विजयसिंह मोरे यांच्या मार्गदर्शनातून राजकारण व समाजकारणात ते सक्रिय होते. (पान २ वर)

(पान १ वरून)

## मालगाडी रूळावरून घसरली

एकमेकांवर आदळून डाऊन ट्रॅकवर कोसळले.यामुळे अप आणि डाऊन दोन्ही मार्गांवरील रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली.अनेक एक्सप्रेस गाड्या विविध स्थानकांवर अडकून पडल्या.त्यामुळे रात्री येथून जाणाऱ्या सुमारे दोन डझन एक्सप्रेस आणि प्रवासी गाड्यांचे कामकाज विस्कळीत झाल्याने प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागला.मालगाडी जसिदीहहून झाझा येथे अप लाईनवर जात होती.अचानक, तेलवा बाजार हॉल्टजवळील पुल क्रमांक ६७६ वर सिमेंटने भरलेली मालगाडी रुळावरून घसरली.ट्रेनचा चालक आणि गार्डने ताबडतोब सिमुलतला स्टेशनला माहिती दिली.

## पुतिन यांचा युक्रेनला इशारा

दाखवत नाही.जर युक्रेनला शांततापूर्ण तोडगा नको असेल तर रशिया आपल्या विशेष लष्करी मोहिमेच्या माध्यमातून सर्व उद्दिष्टे साध्य करेल.एका वृत्तसंस्थेच्या हवाल्याने सांगण्यात आले की, हे वक्तव्य रशियाने कीववर पहाटे सुमारे ५०० ड्रोन आणि ४० क्षेपणास्त्रे डागल्यानंतर एका दिवसाने आले आहे. या हल्ल्यात किमान एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून सुमारे २७ जण जखमी झाले आहेत.दरम्यान, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की फ्लोरिडामध्ये डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेणार आहेत. या भेटीत गेल्या सुमारे चार वर्षांपासून सुरू असलेल्या रशिया-युक्रेन संघर्षाचा शेवट कसा करता येईल, यावर पुढील चर्चा होणार आहे.झेलेन्स्की यांनी सांगितले की,कीव आणि त्याच्या आसपासच्या भागांवर १० तास चाललेली बॉम्बहल्ल्यांची मालिका ही आमच्या शांतता प्रयत्नांना रशियाकडून दिलेले उत्तर होते.

## राष्ट्रपतींची नौदल तळाला भेट

युध्दनौका आणि पाणबुड्यांसाठी एक प्रमुख धोरणात्मक केंद्र म्हणून विकसित झाला आहे.त्याच परिसरात अत्याधुनिक दुरुस्ती यार्डचे बांधकाम देखील सुरू आहे.नौदल तळावरील विविध प्रतिष्ठानांची पाहणी केल्यानंतर, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आयएनएस वागशीर पाणबुडीवरून सुमारे एक तासाचा ऐतिहासिक प्रवास केला.त्यांच्यासोबत नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी आणि रिअर ॲडमिरल विक्रम मेनन यांच्यासह वरिष्ठ भारतीय नौदल अधिकारी होते. राष्ट्रपतींच्या या भेटीतून भारतीय नौदलाच्या वाढत्या धोरणात्मक क्षमता,स्वदेशी संरक्षण शक्ती आणि सागरी सुरक्षेतील त्यांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित होते.

## कोल्हापूर विभाग आघाडीवर

झालेले असल्याची माहिती साखर आयुक्तालयातून देण्यात आली.गतवर्षी याचदिवशी ११७ लाख ३३ हजार मेट्रीक टन ऊस गाळप आणि ७.८९ टक्के निव्वळ उताऱ्यानुसार राज्यात १३.९९ लाख मेट्रीक टनाइतके साखर उत्पादन तयार झाले होते. याचा विचार करता चालूवर्षी दुप्पट ऊस गाळप व साखर उत्पादन हाती आले आहे. पुणे विभागात २९ कारखाने सुरू असून, त्यांची दैनिक गाळप क्षमता २ लाख ६ हजार ९५० मेट्रीक टन आहे. तुलनेने कोल्हापूर विभागातील ३५ कारखान्यांकडून दररोज २ लाख ३३ हजार ८५० मे. टनाइतके ऊस गाळप सुरू आहे. त्यामुळे ऊस गाळपात कोल्हापूर विभाग थोडा मागे असला तरी लवकरच पुणे विभागास मागे टाकण्याची दाट शक्यता आहे.

## पाक सरकार धास्तावले होते

पाकिस्तानकडून सीमापार गोळीबार वाढला, ज्याला भारतीय सैन्याने जोरदार प्रत्युत्तर दिले. परिस्थिती इतकी बिघडल्यानंतर पाकिस्तानच्या डीजीएमओने भारताच्या डीजीएमओशी संपर्क साधून युध्दविरामाचा प्रस्ताव ठेवला होता.परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी सांगितले होते की, दोन्ही देशांमध्ये जमीन, हवा आणि समुद्रातील सर्व प्रकारची युध्द कारवाई थांबवण्यास सहमती झाली आहे.

## झिया यांची प्रकृती चिंताजनक

नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) च्या प्रमुख खालिदा झिया यांच्यावर २३ नोव्हेंबरपासून उपचार सुरू आहेत. ११ डिसेंबरला त्यांच्या फुफ्फुसांना आणि शरीराला विश्रांती मिळावी यासाठी त्यांना व्हेंटिलेटर सपोर्टवर ठेवण्यात आले होते. शनिवारी मध्यरात्री रुग्णालयाबाहेर माध्यमांशी बोलताना डॉ.ए.झेड.एम. जाहिद यांनी सांगितले की, त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली आहे, असे सध्या म्हणता येणार नाही. त्या अत्यंत कठीण काळातून जात आहेत.डॉक्टरांनी देशातील जनतेला खालिदा झिया या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करण्याचे आवाहन केले आहे.जर देवाची कृपा झाली आणि त्या या नाजूक टप्प्यातून बाहेर पडल्या, तरच एखादी चांगली बातमी मिळू शकेल. दरम्यान, त्यांचे पुत्र आणि बीएनपीचे कार्यकारी अध्यक्ष तारिक रहमान यांनी रुग्णालयात जाऊन आईची विचारपूस केली आणि तेथे दोन तासांहून अधिक वेळ घालवला.

खालिदा झिया यांच्या प्रकृतीबाबत डॉक्टरांनी दिलेल्या या निवेदनानंतर बीएनपी समर्थकांनी त्यांच्या आरोग्यासाठी प्रार्थना सुरू केल्या आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे, काही दिवसांपूर्वी परदेशातून डॉक्टरांची एक टीम त्यांना एअरलिफ्ट करून नेण्याची शक्यता तपासण्यासाठी बांग्लादेशात आली होती.मात्र,त्यांची प्रकृती अत्यंत खालावलेली असल्याने ते शक्य होऊ शकले नाही. बीएनपीची इच्छा त्यांना अधिक चांगल्या उपचारांसाठी परदेशात नेण्याची होती. मात्र सध्याची शारीरिक अवस्था पाहता त्यांचा हवाई प्रवास सुरक्षित नसल्याने सध्या देशातच त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांच्या देखरेखीकरिता स्थानिक तसेच परदेशी डॉक्टरांची एक संयुक्त टीम कार्यरत आहे.

## चित्रपटसृष्टीला रामराम

त्याचा शेवटचा चित्रपट वेदनादायक असल्याचे सांगितले.विजय थलापतीने अभिनय सोडून राजकारणावर लक्ष केंद्रीत करण्याचा निर्णय घेतला आहे.गेल्यावर्षी विजयने त्याचा 'तमिलागा वेट्टी कझगम' हा राजकीय पक्ष सुरू केला.आता, अभिनेता आगामी तामिळनाडू राज्य निवडणूक लढवण्याची तयारी करत आहे.

थलापती विजयने राजकारणावर लक्ष केंद्रीत करण्याच्या निर्णयावरही चर्चा केली. माझ्यासाठी फक्त एकच गोष्ट महत्त्वाची आहे. लोक थिएटरमध्ये येतात आणि मला पाहण्यासाठी रांगेत उभे राहतात. म्हणूनच मी पुढील ३०-३३ वर्षे त्यांच्यासाठी रांगेत उभे राहण्यास तयार आहे.

थलापती विजय पुढे म्हणाला, मला पहिल्या दिवसापासूनच सर्व प्रकारच्या टीकेचा सामना करावा लागला आहे. पण माझे चाहते सुरुवातीपासूनच माझ्या पाठीशी उभे राहिले आहेत. मी वाळूचा किल्ला बांधण्याच्या आशेने चित्रपटसृष्टीत प्रवेश केला होता, पण तुम्ही मला एक राजवाडा दिला. थलापती विजयचा शेवटचा चित्रपट ९ जानेवारी २०२६ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट एच. विनोद यांनी दिग्दर्शित केला असून या चित्रपटात बॉबी देओल, पूजा हेगडे, ममिता बैजू, गौतम वासुदेव मेनन, प्रकाश राज, नारायण आणि प्रियामणी यांच्याही मुख्य भूमिका आहेत.

# उत्तर भारतात दाट धुक्याची लाट; रेल्वे,विमान सेवांवर गंभीर परिणाम

■ नवी दिल्ली,ता.२८-

**उत्तर भारतातील अनेक शहरांमध्ये पुन्हा एकदा दाट धुके आणि खराब हवामानामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे.याचा सर्वाधिक फटका वाहतूक सेवांना बसत आहे. दृश्यमानता कमी झाल्यामुळे रेल्वे आणि हवाई वाहतूक मोठ्या प्रमाणावर प्रभावित झाली आहे.अनेक गाड्या ठरलेल्या वेळेपेक्षा तासनतास उशिराने धावत आहेत तर काही गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत.दिल्लीसह अनेक शहरांमध्ये विमान सेवाही उशिराने सुरू आहेत किंवा रद्द होण्याची शक्यता आहे.**

उत्तर भारतात दाट धुक्यामुळे आतापर्यंत चार डझनहून अधिक गाड्या निर्धारित वेळेपेक्षा उशिराने धावत आहेत.धुक्यामुळे गाड्यांचा वेग कमी ठेवण्यात येत असून त्यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रयागराज एक्सप्रेस सुमारे ५ तास, रीवा-आनंद विहार एक्सप्रेस सुमारे ९ तास, नवी दिल्ली तेजस राजधानी एक्सप्रेस ४ तास, ब्रह्मपुत्र मेल सुमारे ४५ मिनिटे तर महाबोधी आणि संपूर्ण क्रांती एक्सप्रेस ४ ते ५ तास उशिराने धावत आहेत. याशिवाय अनेक मेल आणि एक्सप्रेस



गाड्याही तासनतास उशिराने आपल्या स्थानी पोहोचत आहेत.

खराब हवामानाचा परिणाम हवाई वाहतुकीवरही स्पष्टपणे दिसून येत आहे. स्पाईसजेट, एअर इंडिया आणि इंडिगो या विमान कंपन्यांनी प्रवाशांसाठी ट्रॅव्हल ॲडव्हायजरी जारी केली आहे. दिल्ली विमानतळ प्रशासनानेही कमी दृश्यमानतेमुळे उड्डाणांच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो, असा इशारा दिला आहे. सध्या दिल्ली विमानतळावर दहा पेक्षा जास्त उड्डाणे उशिराने सुरू आहेत. याचा परिणाम कनेक्टिंग फ्लाईट्सवरही होऊ शकतो.मात्र, विमान कंपन्या आणि रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना प्रवास सुरू करण्यापूर्वी आपल्या विमान किंवा गाडीची स्थिती तपासण्याचे आवाहन केले आहे. रेल्वे प्रवासी एनटीईएस ॲपद्वारे तर विमान प्रवासी संबंधित एअरलाईनच्या वेबसाईट किंवा ॲपवरून ताजी माहिती मिळवू शकतात. धुक्याचा प्रभाव केवळ दिल्लीपुरताच मर्यादित नाही. अमृतसर, जम्मू, अयोध्या, गोरखपूर, वाराणसी, चंदीगड, पाटणा,दरभंगा, हिंडन,रांची, गुवाहाटी आणि बागडोगरा यांसारख्या शहरांमध्येही विमान आणि रेल्वे सेवांवर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, उत्तर भारतात पुढील काही दिवस धुके कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रवाशांना आणखी अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

## राजेंद्र मोरे यांचे निधन

(पान १ वरून)

बंधू विजयसिंह मोरे यांच्या निधनानंतर मोरे गटाची संपूर्ण जबाबदारी त्यांनी समर्थपणे पेलली. गोकुळ दूध संघ व बिद्री साखर कारखान्याच्या संचालक पदी निवड झाल्यानंतर त्यांनी संस्था व सभासद हिताचे काम केले.

दूरदृष्टी ठेवून सतत कार्यरत असणाऱ्या सेवाभावी नेत्याच्या अकाली निधनाने तालुक्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या अंत्ययात्रेला गोकुळचे अध्यक्ष नाविद मुश्रीफ, सर्व संचालक, बिद्री कारखान्याचे अध्यक्ष के. पी. पाटील, उपाध्यक्ष मनोज फराकटे, सर्व संचालक, जिल्हा बँकेचे संचालक अर्जुन आबिटकर, ए. वाय. पाटील यांच्यासह विविध पक्षांचे, संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.माजी पंचायत समिती सदस्या कल्पना मोरे यांचे ते पती व सरपंच रणधीर मोरे यांचे चुलते होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, दोन भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे.

# बिबट्याचे पिल्लू आढळले

(पान १ वरून)

सदर घटनेची माहिती प्राणी मित्र सुशीलकुमार गायकवाड व धीरज गायकवाड यांना मिळाल्यानंतर तात्काळ घटनास्थळी जाऊन पाहणी केली.बिबट्याचे पिल्लू असल्याची माहिती वनपाल अनिल वाजे व वनरक्षक दत्तात्रय शिंदे यांना दिली.

रेस्क्यू टीम समवेत तात्काळ घटनास्थळी दाखल होवून बिबट्याच्या पिल्लास ताब्यात घेऊन एका कॅरेटमध्ये सुरक्षित ठेवण्यात आले.ऊस तोड मजूर ट्रॅक्टरमध्ये ऊस भरे पर्यंत त्या ठिकाणी थांबून त्या परिसरातील लोक घरी गेल्यानंतर रात्री उशिरा त्याला त्याच्या आई सोबत पुनर्भेट घडवून आणण्याकरिता अनिल वाजे वनपाल, वनरक्षक दत्तात्रय शिंदे,सुशीलकुमार गायकवाड, प्राणी मित्र धीरज गायकवाड व संतोष कदम यांनी कॅरेट मध्ये बिबट्याच्या पिल्लास ठेऊन त्या ठिकाणी ट्रॅप कॅमेरे लावण्यात आले व वनविभागाची टीम बिबट्या मादी वर लक्ष्य ठेऊन आहेत.

या परिसरातील ऊस तोडण्याचे काम संपेपर्यंत वनविभागाने रेस्क्यू टीम तैनात करणार असल्याचे वनरक्षक अनिल वाजे यांनी सांगितले.

## ठाकरे बंधूंना पवारांची साथ

(पान १ वरून)

आणि शिवसेना ठाकरे गटाच्या मदतीला शरद पवार यांचा पक्ष आला आहे. त्यामुळे मुंबईत ठाकरे बंधूंना बळ मिळणार असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने काँग्रेस पक्षाबरोबर देखील चर्चा केली होती. मात्र, त्यांच्यासोबत जाण्यासंदर्भात काही निर्णय झाला नाही. त्यानंतर अखेर ठाकरे बंधूबरोबर युती झाल्याची माहिती मिळत आहे.

## दोन ठिकाणी घरफोडी

(पान १ वरून)

ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक परशुराम शिरसाट,पोलीस हेडकॉन्स्टेबल मानसिंग खताळ-भाट, यशवंत पाटील, शैलेश पाटील यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. गोगवे येथे दोन घरात चोरी झाल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

## सादळे मादळेत बिबट्या

(पान १ वरून)

मजूर भयभीत होऊन ट्रॉलीवर चढून बसले.ही घटना गावात वाऱ्यासारखी पसरल्यानंतर अनेक नागरिक बिबट्या पाहण्यासाठी घटनास्थळी धावून आले. गोंधळ व गलगलाट वाढताच बिबट्याने तेथून काढता पाय घेतला.जोतिबा, गिरोली, जाखले, सादळे मादळे, कासारवाडी, मनपाडळे, अंबप, घुणकी या परिसरात बिबट्याचा वारंवार वावर दिसून येत असून कुत्री, गायी, म्हशी, शेळ्या, घोडा यांना लक्ष्य केले जात आहे.

## थंडीमुळे वाराणसीत शाळांना सुट्टी

■ वाराणसी,ता.२८

**वाराणसीमध्ये तीव्र थंडी आणि शीतलहरीमुळे २९ आणि ३० डिसेंबर रोजी प्री-प्रायमरीपासून इयत्ता आठवीपर्यंतच्या सर्व शाळा बंद राहतील.**

जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार हा आदेश देण्यात आला आहे. हा आदेश सर्व शासकीय,खासगी तसेच विविध बोर्डांच्या शाळांवर लागू असेल. मुलांच्या आरोग्याला प्राधान्य देत हा निर्णय घेण्यात आला असून, शिक्षक आणि कर्मचारी मात्र विभागीय कामांसाठी शाळेत उपस्थित राहतील.सध्या वाराणसी मध्ये थंडीचा प्रकोप वाढत असून त्यामुळे मुलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुलांना थंडीपासून संरक्षण देण्यासाठी शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# राहुल गांधींना विकासाचे राजकारण समजत नाही

(पान १ वरून)

स्ट्राईक, बांगलादेशी घुसखोरांविरुद्ध कारवाई, कलम ३७० रद्द करणे आणि काशीमध्ये मंदिर बांधकाम यांसारख्या निर्णयांचा समावेश आहे. राहुल गांधी सामान्य लोकांच्या वास्तविक समस्या समजून घेण्याऐवजी एसआयआर सारख्या मुद्द्यांना समजून घेण्यात गुंतलेले असतात. ही त्यांची जबाबदारी देखील नाही, तरीही ते याच विषयांमध्ये अडकलेले

असतात. भाजपचे विकासावर आधारित राजकारण आणि संवेदनशील शासन मॉडेल जनतेशी थेट जोडलेले आहे. अहमदाबादच्या पश्चिम भागात अमित शहा यांच्या हस्ते २७ किलोमीटर लांबीच्या नवीन ड्रेनेज लाईनचे उद्घाटन झाले. ही लाईन रस्ता न खोदता, आधुनिक तंत्रज्ञानाने बनवण्यात आली आहे. ते म्हणाले की, वणझर परिसरात १९७३ नंतर ज्या लोकांनी सर्व काही गमावले होते, ते येथे येऊन स्थायिक झाले होते. सुमारे ५० वर्षांपासून अनेक कुटुंबे येथे राहत होती, परंतु त्यांच्या भूखंडाची कायदेशीर प्रक्रिया रखडली होती.आता ही समस्या सोडवण्यात आली आहे. सर्व फाईल्स पूर्ण करण्यात आल्या आहेत.या लोकांना त्यांचे भूखंड कायदेशीररित्या मिळाले आहेत. यामुळे हजारो कुटुंबांच्या जीवनात मोठा बदल होईल.



श्रीपेवाडी रोडवरील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आवारातील मंदिरात श्री शाकंबरी उत्सवानिमित्त पहिल्या दिवशी देवीची बांधलेली पूजा.

# राष्ट्रवादीची ३७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर

■ मुंबई,ता.२८-

**मुंबई महापालिका निवडणुकासाठी अजित पवारांच्या राष्ट्रवादीने आघाडी घेत ३७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. महापालिकेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या १०० उमेदवारांची यादी जाहीर होईल, अशी माहिती आमदार आणि नवाब मलिक यांच्या कन्या सना मलिक यांनी दिली होती. मात्र, पहिल्या यादीत ३७ उमेदवारांना संधी देण्यात आली असून नवाब मलिक यांच्या भावासह कुटुंबातील तिघांना उमेदवारी देण्यात आली आहे. नवाब मलिक यांचे भाऊ कप्तान मलिक, त्यांची सुन बुशरा मलिक आणि बहीण सईदा खान यांना महापालिकेच्या मैदानात उतरवण्यात आले आहे.**

### ● मलिक कुटुंबातील तिघांना तिकीट
### ● आजपासून एबी फॉर्मचे वाटप

राष्ट्रवादी काँग्रेसने मुंबई महापालिकेत स्वबळाचा नारा दिला असून उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे, उद्यापासूनच या उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटपही केले जाणार आहे. राष्ट्रवादीकडून मुंबई महापालिका निवडणुकांची जबाबदारी नवाब मलिक आणि आमदार सना मलिक यांच्यावर सोपवण्यात आली आहे. त्यामुळे, महायुतीपासून फारकत घेत राष्ट्रवादीने स्वतंत्रपणे उमेदवार देण्यास सुरुवात केली आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून मलिक कुटुंबातून यंदा तिघांना निवडणुकीच्या रणांगणात उतरवण्यात आले आहे. नवाब मलिक यांचे भाऊ कप्तान मलिक प्रभाग १६५, नवाब मलिक यांची बहीण डॉ.सईदा खान प्रभाग १६८ तर कप्तान मलिक यांची सून बुशरा नदीम मलिक प्रभाग १७० मधून निवडणूक लढणार आहेत. कप्तान मलिक यांचा प्रभाग १६८ सध्या महिला राखीव झाल्याने कप्तान मलिक यांच्याकडून सुनेला स्वतः प्रभागात उतरवण्याचा निर्णय तर स्वतः साठी नवीन प्रभाग १६५ मधून लढण्याचा निर्णय घेतला आहे.

## अनुभव प्रमाणपत्रावरून सीएला धमकी

■ कोल्हापूर ता.२८ (प्रतिनिधी)-

**अनुभवाचे प्रमाणपत्र न दिल्याच्या रागातून कार्यालयात छळ केल्याचा आरोप करत सीएला धमकाविण्यात आले. दाभोळकर कॉर्नर परिसरातील अयोध्या टॉवरमध्ये घडला होता.याबाबत सीए फारूख महंमद अलबर्क मुनीर मुल्ला (रा.मोरेवाडी, ता.करवीर) यांनी पोलिसांत दिल्या फिर्यादीनुसार शाहूपुरी पोलिस ठाण्यात सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याप्रकरणी तांझीम नासीर हुसेन महाबरी (रा. फुलेवाडी) हिच्यासह तिची आई, मावशी, समीर आयुब मुजावर, राज महात व शिवसेनेशी संबंधित एका कार्यकर्त्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सीए फारूख मुल्ला यांचे दाभोळकर कॉर्नर परिसरात कार्यालय आहे. काही दिवसांपूर्वी एक युवती त्यांच्या कार्यालयात शिकाऊ उमेदवार म्हणून दाखल झाली होती. संबंधित युवती नियमितपणे कार्यालयात उपस्थित राहत नसल्याने तिला अनुभवाचे प्रमाणपत्र देता येणार नसल्याचे मुल्ला यांनी सांगितले होते. याचा राग मनात धरून युवतीने तिची आई, मावशी व समीर आयुब मुजावर, राज महात आणि शिवसेना पक्षाशी संबंधित अज्ञात व्यक्तीला सोबत घेऊन सीएच्या कार्यालयात प्रवेश केला. त्यांनी 'कार्यालयात छळ केला' असा आरोप करत बदनामी करण्याची धमकी दिली. पत्रकार परिषद घेऊन, तुमची प्रॅक्टिस बंद पाडू, अशी धमकी देत दबाव टाकल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

## मुंबईच्या युवतीचा नाशकात अपघाती मृत्यू

■ नाशिक,ता.२८

**शहरातील सरकारवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका २९ वर्षीय युवतीचा अपघाती मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली आहे. याप्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.**

दिपशिखा गिरीश गोडबोले (२९,रा. मुंबई) असे मृत युवतीचे नाव आहे. सदर घटना रविवारी घडल्याचे नमूद करण्यात आले आहे. दिपशिखा ही युवती नाशिकमध्ये लग्नासाठी आली होती.

# गटारी तुंबल्याने सांडपाणी थेट रस्त्यावर

■ चरण,ता.२८ (वार्ताहर)-

**आरळा (ता. शिराळा) येथील मुख्य बाजारपेठेच्या रस्त्यावर गटारी तुंबल्याने सांडपाणी थेट रस्त्यावरून वाहू लागले असून संपूर्ण रस्त्याला अक्षरशः पाणंदीचे स्वरूप आले आहे. रस्त्यात ठिकठिकाणी पडलेले मोठमोठे खड्डे आणि त्यामध्ये साठलेले दुर्गंधीयुक्त पाणी यामुळे रस्ता प्रवासासाठी अत्यंत धोकादायक ठरत आहे.'याला रस्ता म्हणावा का? असा प्रश्न वाहनधारकांसह प्रवाशांना पडला आहे.**

### शेडगेवाडी-आरळा रस्त्याची दयनीय अवस्था

आरळा हे शिराळा तालुक्याच्या पश्चिम भागातील महत्त्वाचे बाजारपेठेचे केंद्र असून शेडगेवाडी -आरळा हा एकमेव मार्ग चांदोली धरण व चांदोली अभयारण्याकडे जाण्यासाठी वापरला जातो. त्यामुळे पर्यटनासाठी येणारे पर्यटक, शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी, नोकरदार, बाजारपेठेतील कामगार, व्यापारी व स्थानिक नागरिक यांची या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. मात्र सध्या रस्त्याची झालेली दुरवस्था सर्वांसाठीच डोकेदुखी ठरत आहे.

या रस्त्यालगत बांधण्यात आलेल्या आरसीसी गटारी अनेक ठिकाणी तुंबल्याने सांडपाणी रस्त्यावर पसरत आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. परिणामी नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून रोगराई पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्याचबरोबर खड्ड्यांत साचलेल्या पाण्यामुळे दुचाकी व चारचाकी वाहनांना अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. व्यापारी व स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, या रस्त्यावरून रोज प्रवास करणे म्हणजे मोठी कसरत बनली आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होत असून वाहने घसरून पडण्याच्या घटना घडू शकतात. बाजारपेठेतील व्यवसायावरही याचा विपरीत परिणाम होत आहे.संबंधित विभागाने याकडे तातडीने लक्ष देऊन तुंबलेली गटारी साफ करावीत, सांडपाणी वाहून जाण्यासाठी योग्य व्यवस्था करावी तसेच रस्त्यात पडलेले मोठमोठे खड्डे त्वरित बुजवावेत, अशी मागणी वाहनधारक, प्रवासी व स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# किसन वीर यांच्यामुळे सर्वसामान्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य :शिंदे

■ सातारा,ता.२८-

**थोर स्वातंत्र्यसैनिक देशभक्त किसन महादेव तथा आबासाहेब वीर यांनी समाजासाठी सामाजिक, सहकार व शैक्षणिक क्षेत्राच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य केले आहे. किसन वीर कारखाना, जनता शिक्षण संस्था व सातारा जिल्हा बँकेची स्थापना करून सर्वसामान्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण केले असल्याचे गौरवोद्गार किसन वीर सातारा सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रमोद शिंदे यांनी काढले.**किसन वीर यांच्या ४६ व्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम झाले.शिंदे म्हणाले की, मदत व पुनवर्सन मंत्री व कारखान्याचे चेअरमन मकरंद पाटील व खासदार नितीन पाटील यांनी कारखान्याची सुत्रे हातात घेतल्यापासून किसन वीर यांना अभिप्रेत असलेले काम कारखान्यावर सुरू केलेले असून आर्थिक गर्तेत रूतलेला सहकारातील हा कारखाना बाहेर काढण्याचे काम केलेले आहे. किसन वीर व खंडाळा कारखान्याला आर्थिक स्थैर्य प्राप्त करण्याच्या मार्गाने दोन्हीं कारखाने मार्गक्रमण करीत असून शेतकरी व कामगारांच्या सहकार्य व पाठींब्यामुळेच हे शक्य होणार आहे. मागील तीन गळित हंगामात शेतकरी वर्गाने ज्या पद्धतीने सहकार्य केलेले आहे, असेच सहकार्य यावर्षीदेखील करीत असल्याचे चित्र दोन्ही कारखान्याचे गाळप पुर्ण क्षमतेने होत असल्याने ते दिसून येत आहे.

## ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



**श्री. स्वप्निल विजयकुमार शहा**

आमचे परममित्र श्री. स्वप्निल विजयकुमार शहा यांचे रविवार, दि. २८/१२/२०२५ रोजी वयाच्या ४९ व्या वर्षी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

अभिजित सु. शहा * रितेश नानावटी
निलेश मेहता * अतुल शहा
साहिल शहा, इचलकरंजी

अंत्ययात्रा : आज सोमवार, दि.२९/१२/२०२५ रोजी सकाळी ९.३० वा. निवासस्थानाहून निघणार आहे.

# अनेक बडे मासे शिव -शाहू आघाडीच्या गळाला लागणार!

इचलकरंजी,ता.२८–

**महानगरपालिका निवडणुकीसाठी शिव –शाहू विकास आघाडीमध्ये इनकमिंग जोरात सुरु असून सोमवार आणि मंगळवारी बडे मासेही शिव – शाहू विकास आघाडीच्या गळाला लागण्याची शक्यता आहे. शिवतीर्थ पासून ते शंभूतीर्थपर्यत मिरवणुकीने मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. अजितदादा पवार गटाचे राष्ट्रवादीतील काही इच्छुक ही विकास आघाडीमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे.**



शिव शाहू विकास आघाडीतील प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत परवेज गैबान यांनी प्रवेश केला.

कासव चालीने चालणारी शिव –शाहू विकास आघाडी आता आपल्या पोटामध्ये मोठ्या प्रमाणात नाराजांना सामावून घेण्याच्या तयारीत आहे. महायुतीमध्ये उमेदवारी न मिळालेले तसेच नाराज असलेले अनेक दिग्गज नेते आता शिव –शाहू विकास आघाडीमध्ये जात आहेत. भाजपमध्ये असलेली नाराजी आपल्या पथ्यावर पाडून घेण्यासाठी आघाडी प्रयत्नशील आहे. त्यामुळे त्यांनी आज अखेर उमेदवार घोषित केलेले नाहीत. विशेष करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अनेक दिग्गज युवक आता विकास आघाडीच्या वाटेवर आहेत. तसेच शिवसेना शिंदे गटामधून ही उमेदवारी न मिळालेले ही त्याच पावलावर पाऊल ठेवून पुढे जात आहेत. त्यामुळे विकास आघाडीची वाट ही सुखकर होताना दिसत आहे. इनकमिंग वाढल्यामुळे विकास आघडीच्या नेत्यांच्यामध्ये उत्साहाचे वातावरण दिसत आहे. परंतु या नाराजीचा फायदा कितपत त्यांना होतो हे लवकरच कळणार आहे. या सर्व घडामोडीची माहिती काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सतेज उर्फ बंटी पाटील यांना देण्यात येणार आहे. बंटी पाटील हे रणनीती तयार करीत असून त्यांच्या रणनीतीवरच विकास आघाडी वाटचाल करणार आहे. त्यामुळे आघाडीचे सर्व पदाधिकारी उद्या सोमवारी कोल्हापुरमध्ये आम. सतेज पाटील यांची भेट घेणार असल्याचे समजते.

### परवेज गैबान शिव शाहू आघाडीत

विक्रम नगर परिसरामध्ये आपले वेगळे अस्तित्व निर्माण केलेले युवा नेते परवेज गैबान यांनी शिव शाहू विकास आघाडीमध्ये रविवारी प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मोठ्या पदावर असलेल्या या चेहऱ्याने आघाडीमध्ये प्रवेश केल्याने या परिसरात असणाऱ्या दोन ते तीन प्रभागावर मोठा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# इचलकरंजीत महायुतीचं ठरलं!

## राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाला दोन जागा



बैठकीप्रसंगी आम.राहूल आवाडे,माजी आम.अशोकराव जांभळे, सुहास जांभळे, सुनिल पाटील आदी उपस्थित होते. (छाया : मयुर चिंदे)

इचलकरंजी, ता. २८–

**इचलकरंजी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अखेर महायुतीचे एकत्र लढण्यावर शिक्कामोर्तब झाले. भाजप,शिवसेना(शिंदे गट) राष्ट्रवादी काँग्रेस(अजितदादा पवार गट) यांच्यात एकत्र लढण्याविषयी बैठक झाली.रात्री उशिरा यावर तोडगा निघाला.**

महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महायुतीमध्ये पुन्हा एन्ट्री झाली असून या पक्षाला दोन जागा देण्याबाबत निर्णय झाला आहे. यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने जादा जागांची मागणी केली होती. पण तडजोड न झाल्यामुळे स्वबळावर निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार परस्पर उमेदवारांची घोषणा केली होती. त्यानंतर भाजप आणि शिवसेना(शिंदे गट) यांची युती होणार हे जवळपास स्पष्ट झाले होते. त्यानुसार ५४ : ११ असा जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला आहे.मात्र रविवारी रात्री मोठ्या राजकीय घडामोडीना वेग आला. रात्री उशिरा झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला महायुतीमध्ये समाविष्ट करून घेण्याचा निर्णय झाला.

दरम्यान,आमदार राहूल आवाडे यांच्याशी संपर्क केला असता, त्यांनी घडामोडीला दुजोरा दिला. या घडामोडीत त्यांना दोन जागा देण्यावर एकमत झाले असून इतर चार ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसशी मैत्रीपूर्ण लढत होणार आहे.कोणत्या दोन जागावर राष्ट्रवादी लढणार हे येत्या एक-दोन दिवसांत स्पष्ट होईल.

# परप्रांतीय कामगार मृत्यूप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी

हेरले,ता.२८(प्रतिनिधी)–

**नागाव फाटा येथील प्रितम स्टील मध्ये मटेरियल उतरत असताना क्रेन पलटी होऊन बूम खाली चिरडून रशीद खान (रा.उत्तरप्रदेश) या परप्रांतीय कामगाराचा मृत्यू झाला.**

घटना घडल्यानंतर पोलिसांना माहिती देणे क्रमप्राप्त व अपेक्षित होते. पण कंपनीच्या कामगारांनी बाहेरील लोकांना आत येण्यास मज्जाव केला होता.घटनेची माहिती समजताच परप्रांतीय कामगाराच्या गावचे सरपंच, स्थानिक आमदार यांनी कंपनी प्रशासन, पोलीस अधिकारी यांचेशी संपर्क साधून आमचे गावाकडील नातेवाईकांच्या उपस्थितीत मृतदेहाचे शवविच्छेदन करावे अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळे शनिवारी रात्री उशीरापर्यंत नातेवाईक आल्यानंतर शवविच्छेदन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच कंपनीमध्ये काम करणाऱ्या मजुरांच्या सुरक्षेसाठी हेल्मेट, हॅन्डग्लोज, बूट अशी सुरक्षित उपकरणांची कोणतीच उपाययोजना केलेली दिसून येत नाही. तर या घटनेची माहिती स्थानिक लोकांनी पोलिसांना कळविल्यानंतर घटनास्थळी पोलीस आल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले.





अभिनंदन!
प्रो ॲक्टीव अबॅकस नॅशनल कॉम्पीटीशन २०२५-२६ मध्ये कु. अनन्या विनायक मस्ते हिचा आलेबद्दल प्रथम क्रमांक आलेबद्दल हार्दिक अभिनंदन!
अमर सावंत * विनायक मस्ते
फोनिक्स प्रो ॲक्टीव अबॅकस क्लास, इचलकरंजी.

हार्दिक शुभेच्छा!
आमचे बंधुतुल्य मित्र
श्री. समिर जहाँगीर पटेकरी
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



श्री. समिर जहाँगीर पटेकरी
अक्षय तावरे (A.T.)
शोएब नदाफ * ओंकार रावळ * वैभव होगाडे
रुपेश वाघ * आनंद कोळी * इंद्रजीत घोरपडे (बाबा)
अक्षय देसाई * ऋषिकेश पाटील * सिद्धार्थ बहिरगोंडे
7 STAR GROUP




हार्दिक शुभेच्छा!
आमच्या जिवलग मित्राला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
शंतनू पवार * पवन मेटे
अनिकेत ठाणेकर * साहिल पटेकरी
आकिब शेख * प्रतिक खेडकर
देवराज तावरे


# महापालिका निवडणूक शिवसेना (उबाठा) स्वतंत्र लढविणार

इचलकरंजी, ता. २८–

**उमेदवारीसाठी निष्ठावंत शिवसैनिकांना डावलण्याबरोबरच पक्षाला सन्मानजनक जागा दिल्या जात नसल्यामुळे महाविकास आघाडीतून शिवसेना (उबाठा) बाहेर पडून इचलकरंजी महापालिका निवडणूक स्वतंत्र लढविणार असल्याची माहिती शिवसेनेचे जिल्हा प्रमुख संजय चौगुले तसेच उपजिल्हा प्रमुख मलकारी लवटे यांनी पत्रकार बैठकीत दिली.**

चौगुले व लवटे यांनी सांगितले कि, प्रस्थापितांना फायदा होऊ नये यासाठी शिवसेना (उबाठा) ही महाविकास आघाडीत सहभागी झाली होती. शिवाय शिव - शाहू विकास आघाडी करतानाही पक्षाला सन्मानजनक जागा मिळतील ही अपेक्षा व्यक्त केली होती. त्यानुसार किमान १५ जागा मिळतील अशी अपेक्षा होती. मात्र केवळ तीन जागा दिल्या गेल्या तसेच इतर जागांबाबत सातत्याने झुलवत ठेवले गेले. शिवाय निष्ठावंत शिवसैनिकांना उमेदवारीसाठी डावलले. ही बाब पक्षातील वरीष्ठ पदाधिकाऱ्यांना कळविली. त्यानंतर त्यांनी स्वतंत्र निवडणूक लढविण्याचा आदेश दिल्यानेच आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे.

महापालिका निवडणूक स्वतंत्र लढविणे हा पक्ष वाढीसाठी महत्वाचा निर्णय मानून याला सामोरे जाऊ. शिवाय वेळ कमी असल्याने जास्तीत जास्त जागा लढविल्या जातील, असेही चौगुले यांनी सांगितले.

याप्रसंगी तालुका प्रमुख आनंदा शेट्टी, सागर जाधव, रतन वाझे, लक्ष्मण पाटील, अजय घाडगे, सुभाष चौगुले यांचेसह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.


विनम्र अभिवादन!



स्व. श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील
राजारामबापू शिक्षण व उद्योग समूहाचे प्रेरणास्थान
श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील
यांना ८ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त
विनम्र अभिवादन!
अभिवादक
श्री. विजयराव यादव, अध्यक्ष | श्री. माणिकराव पाटील, उपाध्यक्ष | सीए. प्रदीप बाबर, व्यवस्थापकीय संचालक
संचालक मंडळ
ठेवी २५४९.१४ कोटी | कर्जे १७०४.३६ कोटी | एकूण व्यवसाय ४२५३.५० कोटी
RSB राजारामबापू सहकारी बँक लि.,पेठ (शेड्युल्ड बँक)
ता. वाळवा, जि. सांगली.

।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।



मा. श्री. राजेंद्र कृष्णाजी तथा आर. के. मोरे (बापू)
आमच्या कारखान्याचे संचालक व गोकूळ दूध संघाचे संचालक
मा. श्री. राजेंद्र कृष्णाजी तथा आर. के. मोरे (बापू)
यांचे आकस्मिक निधन झाले.
सहकार, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील त्यांचे योगदान अमुल्य असून त्यांची दुरदृष्टी व कार्यतत्परता सदैव स्मरणात राहील. बिद्री साखर कारखान्याच्या प्रगतीसाठी त्यांनी केलेले मार्गदर्शन व सहकार्य हे आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. सर्व शक्तीमान परमेश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो, समस्त मोरे कुटुंबियांच्या दु:खात बिद्री साखर कारखाना परिवार सहभागी आहे.
माजी आमदार के. पी. पाटील, चेअरमन
श्री. मनोज गणपतराव फराकटे, व्हाईस चेअरमन
व सर्व संचालक मंडळ, ऊस उत्पादक सभासद, अधिकारी व कर्मचारी
श्री. दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि., बिद्री
(मौनीनगर) ता. कागल, जि. कोल्हापूर.

■ **संपादकीय** ■

# धोक्याची घंटा

२०१७ मधील उन्नाव बलात्कार प्रकरणात न्यायालयाने आरोपी माजी आमदाराला केवळ जामीन मंजूर केला नाही, तर त्याची शिक्षाही निलंबित केली. कुलदीप सेंगर हे त्याचे नाव आहे. या धक्कादायक निर्णयाच्या निषेधार्थ दोन दिवसांपूर्वी न्यायालयाबाहेर निदर्शने करण्यात आली. सरकारच्या विरोधात, एखाद्या व्यक्तीच्या विरोधात अथवा एखाद्या संस्थेच्या विरोधात निदर्शने होणे सामान्य बाब आहे. न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात निदर्शने केली जाणे ही धोक्याची घंटा आहे.निदर्शने झाली किंवा करावी लागली त्याचे कारण हा निर्णय अन्यायी वाटतो आहे.तांत्रिक आधारावर आरोपीची शिक्षा निलंबित केली असली तरीही त्याने केलेला गुन्हा आणि त्याच्याकरवी केली गेलेली कृत्ये त्याला या दिलाशासाठी पात्र निश्चितच ठरवत नसल्यामुळे आक्रोश आहे. सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. तेथे नक्की न्याय मिळेल असा केवळ पीडितेलाच नाही तर सगळ्यांनाच विश्वास आहे. पीडिता आणि तिच्या आईने निराशा व्यक्त केली आहे, त्याचवेळी वरच्या न्यायालयात दाद मागण्याचा निर्धारही बोलून दाखवला.उच्च न्यायालयावरचा आमचा विश्वासच उडाला आहे ही त्यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया त्यांची वेदना दर्शवणारीच आहे.उत्तर प्रदेशच्या उन्नावमधील हे बलात्कार प्रकरण आठ वर्षांपूर्वीचे आहे. पीडिता तेव्हा अल्पवयीन होती. आमदार असणाऱ्या सेंगरने तिच्यावर अत्याचार केले. कनिष्ठ न्यायालयाने त्याला गुन्ह्यात दोषी ठरवले होते आणि जन्मठेपेची शिक्षा दिली होती. केवळ जन्मठेपच नाही तर मरेपर्यंत त्याला तुरूंगात ठेवले जावे असा निवाडा कनिष्ठ न्यायालयाने केला होता. ही शिक्षा वरच्या न्यायालयाने निलंबित करणे आणि आरोपीला जामीन मंजूर करण्याचा प्रकार त्यामुळेच एकदम विसंगत किंवा विरोधाभासाचा ठरतो. जर आरोपीला आयुष्यभर तुरूंगात ठेवले जावे असे एका न्यायालयाला वाटत असेल तर त्याचा सरळ अर्थ आहे की त्याने केलेला गुन्हा अतिशय गंभीर आहे. हा आरोपी भविष्यात केवळ त्या पीडितेलाच नव्हे तर संपूर्ण समाजासाठीही धोकादायक ठरु शकतो असा निष्कर्ष न्यायालयाने काढला असणार. त्यामुळेच वरच्या न्यायालयाने आता जो निर्णय दिला आहे तो वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. बलात्काराची घटना जेव्हा घडली होती त्यावेळी सुरुवातीला प्रकरण दाबण्याचाच प्रयत्न झाला होता. त्यानंतरही पीडितेची आणि तिच्या कुटुंबाची जी छळवणूक केली गेली आणि त्याला प्रसार माध्यमातून तोंड फुटल्यानंतर या प्रकरणात मग पुढील हालचाली केल्या गेल्या. अन्यथा सेंगर तेव्हाच मुक्त होऊन उजळ माथ्याने वावरला असता आणि कदाचित पुन्हा लोकशाहीचे पवित्र मंदिर असलेल्या सभागृहातही दिसला असता. खलप्रवृत्तीची माणसे केवळ चित्रपटात नसतात. उलट वास्तवात अशी माणसे असल्यामुळेच चित्रपटातही तशा व्यक्तीरेखा दाखवल्या जातात. एखाद्या पीडित कुटुंबावर खलनायकाकडून ज्या प्रकारचे अत्याचार केले जातात ते सगळे अत्याचार या प्रकरणात केले गेले. त्यात पीडितेच्या पित्याला आपले प्राण गमवावे लागले.पीडिता आणि तिच्या वकिलाचीही हत्या करण्याचा प्रयत्न झाला. ते ज्या कारने प्रवास करत होते, त्या कारला एका ट्रकने धडक दिली. सुदैवाने ते दोघे बचावले,मात्र गंभीर जखमी झाले.अपघाताच्या या घटनेत तिच्या दोन नातलगांचा मृत्यू झाला.या बाबीच आरोपी जेरबंद होत नाही तोपर्यंत आणि त्यानंतरही गेल्या काही वर्षांत पीडितेला काय त्रास सहन करावे लागले असतील त्याची दाहकता समजण्यासाठी पुरेशा आहेत. मागचा हा घटनाक्रम पाहता आरोपीला आता मिळालेली सूट चुकीचा संदेश देणारी आहे. प्रभावशाली व्यक्तींकरिता खरेच कायदे वेगळे असतात का आणि प्रत्येक गुन्ह्यात ते सुटका करून घेऊ शकतात एवढ्या पळवाटा त्यांच्यासाठी कायद्यात निर्माण कशा होतात हा प्रश्न केवळ त्या पीडितेलाच नाही तर कोणालाही पडू शकतो. न्याय मिळाला नाही अथवा अन्यायाची भावना निर्माण झाल्यावर अगोदर कायदेशीर मार्गानेच लढण्याचा प्रयत्न असतो. नंतर रस्त्यावर उतरावे लागते. जेव्हा समाजात जागरूकता शिल्लक असते तेव्हा लोकही या लढ्यात सामील होतात. निर्भया प्रकरणात आणि जेसिका लालपासून नैना साहनी आणि आरूषी तलवारपर्यंतच्या अनेक प्रकरणात गुन्ह्याचे स्वरूप वेगवेगळे असले तरी समाजाने जागरूकता दाखवली आहे. हे देशाने अनुभवले आहे. महिलांच्या विरोधातील गुन्ह्यांवर अंकुश आणण्याच्या चर्चा कायम होतात. त्यांच्यावरच्या अत्याचाराच्या विशेषत: बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यात आरोपींना त्वरित आणि कठोर शिक्षा झाली पाहिजे अशी अपेक्षा असते. राज्यांच्या विधानसभांपासून संसदेपर्यंत कठोर कायदे तयार केले गेले. असे असतानाही अत्याचार रोखण्यात तेवढे यश अद्याप आले नाही. आरोपीला अशा गुन्ह्यासाठी मृत्युदंडाचीच शिक्षा झाली पाहिजे अशी एकीकडे मागणी आणि समाज स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी ते आवश्यक असतानाही प्रभावशाली लोकांची जर प्रकरण थंड झाल्यासारखे दिसू लागल्यावर सुटका होत असेल तर अशा घटना कधीच थांबणार नाहीत.

# विमान वाहतुकीला नवे आयाम

**भारतीय नागरी विमान वाहतूक क्षेत्रात लवकरच मोठी स्पर्धा पहावयास मिळणार आहे. केंद्र सरकारने तीन नवीन एअरलाईन्सना देशांतर्गत विमान सेवा सुरू करण्यास परवानगी दिली असून यामुळे प्रवाशांना प्रवासाचे नवीन आणि स्वस्त पर्याय उपलब्ध होणार आहेत. नागरी उड्डाण मंत्रालयाने 'अल हिंद एअर', 'फ्लाय एक्स्प्रेस' आणि 'शंख एअर' या कंपन्यांना 'ना हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) जारी केले आहे.**

उत्तर प्रदेशातील 'शंख एअर' २०२६ मध्ये आपले कमर्शियल ऑपरेशन्स सुरू करू शकते. त्यांच्याकडे यापूर्वीच एनओसी उपलब्ध आहे. केरळच्या 'अल हिंद ग्रुप'कडून 'अल हिंद एअर'चे प्रवर्तन केले जात आहे तर 'फ्लाय एक्स्प्रेस'च्या प्रवर्तनाबाबत अजून माहिती मिळालेली नाही. देशातील विमान वाहतूक क्षेत्राला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने दोन नवीन एअरलाईन्सना परवानगी देण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. सरकारच्या 'उडान' योजनेअंतर्गत स्टार एअर आणि फ्लाय-९१ यासारख्या लहान एअरलाईन्स आधीच कार्यरत आहेत.आता अल हिंद एअर, फ्लाय एक्स्प्रेस, शंख एअरमुळे टियर-२ आणि टियर-३ शहरांची हवाई जोडणी अधिक मजबूत होऊ शकेल. यामुळे प्रवाशांना अधिक पर्याय, स्पर्धात्मक भाडे आणि चांगली सेवा मिळेल, असा अंदाज आहे.

सध्या देशांतर्गत विमान प्रवास करणाऱ्या सुमारे ९० टक्के प्रवाशांकडून इंडिगो आणि टाटा समुहाच्या एअर इंडिया सेवांचा वापर केला जातो. अशा परिस्थितीत एखाद्या मोठ्या एअरलाईनमध्ये अडचण निर्माण झाल्यास संपूर्ण व्यवस्थेवर त्याचा परिणाम होतो. ही जोखीम कमी करण्यासाठी सरकारने नव्या एअरलाईन्सना परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. काही दिवसांपूर्वी नेमके तसे घडले. देशातील सर्वांत मोठी एअरलाईन इंडिगोच्या प्रणालीत बिघाड झाला आणि मोठा गोंधळ उडाला. इंडिगोने ऐनवेळी अनेक उड्डाणे रद्द केली आणि हजारो प्रवाशांना त्याचा फटका बसला. प्रवाशांना तासन्तास विमानतळावर बसावे लागले. अनेक जण आपल्या निर्धारित स्थळी पोहोचू शकले नाहीत.उड्डाणे रद्द झाल्याने तिकिटाचे पैसे परत मिळवण्यासाठी वाद



झाले. या घटनेमुळे भारतीय विमान वाहतूक क्षेत्रात मोजक्या कंपन्यांचे वर्चस्व किती धोकादायक ठरू शकते ते स्पष्ट झाले. या पार्श्वभूमीवर सरकारने घेतलेला निर्णय योग्यच म्हणावा लागेल. सरकारने तीन नवीन विमान कंपन्यांना एनओसी दिली म्हणजे लगेच उद्यापासून या कंपन्यांच्या विमानातून प्रवास करता येईल, असे नाही.

सरकारने या कंपन्यांना विमानसेवा सुरू करण्याची प्रक्रिया पुढे नेण्याची परवानगी दिली आहे. सरकारकडून एनओसी मिळाल्यानंतर या विमान कंपन्यांना नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून एअर ऑपरेटर प्रमाणपत्र घ्यावे लागेल. नंतर फ्लीट, क्रू, नेटवर्क आणि देखभालीबाबत तयारी करावी लागेल. या प्रक्रियेला अनेक महिने लागू शकतात. या प्रक्रियेत एअरलाईनची आर्थिक रणनिती आणि ऑपरेशनल क्षमता समाविष्ट केल्या जातात. भारतातील विमान वाहतूक बाजारपेठ वेगाने वाढत आहे. नव्या विमान

**दैनंदिनी**

कंपन्यांच्या समावेशामुळे अधिक सुविधा आणि चांगली कनेक्टिव्हिटी मिळेल. नवीन कंपन्यांच्या आगमनामुळे स्पर्धा वाढेल. विमानांची निवड करताना प्रवाशांकडे विविध पर्याय उपलब्ध असतील. नवीन विमान कंपन्यांना परवानगी देण्यामागे सरकारचे उद्दिष्ट इंडिगो आणि एअर इंडियावरील अवलंबित्व कमी करणे हे आहे. उत्तर प्रदेशस्थित शंख एअरलाईन्स २०२६ च्या पहिल्या तिमाहीत सुरू होण्याची अपेक्षा आहे. पुढील ३ वर्षात या एअरलाईन्सच्या ताफ्यात २० ते २५ विमाने राहतील, अशी अपेक्षा आहे. देशातील प्रमुख शहरे आणि राज्यांमधील कनेक्टिव्हिटी सुधारण्याचे शंख एअरचे उद्दिष्ट आहे. अल हिंद ही केरळस्थित अल हिंद ग्रुपच्या मालकीची आहे.

या एअरलाईनचे ध्येय प्रादेशिक आणि कमी किमतीची कनेक्टिव्हिटी प्रदान करणे आहे त्यामुळे सामान्य व्यक्तीसाठी विमान प्रवास परवडणारा बनू शकतो. देशात फ्लाय एक्स्प्रेस सुरू झाल्यानंतर कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनापर्यंत सर्व काही व्यावसायिक उद्देशाने वाहतूक करणे सोपे होईल. देशांतर्गत हवाई कार्गोच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर ही विमान कंपनी प्रवासी उड्डाणांसाठी एक व्यवहार्य पर्याय म्हणून काम करू शकते. सध्या भारतीय विमान वाहतूक बाजारपेठेच्या सुमारे ९० टक्के हिश्श्यावर इंडिगो आणि एअर इंडिया समुहाचे वर्चस्व आहे.

एकट्या इंडिगोचा बाजारपेठेतील हिस्सा ६५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. या दोन बड्या कंपन्यांच्या मक्तेदारीमुळे प्रवाशांना अनेक वेळा मर्यादित पर्यायांचा सामना करावा लागतो. गत काही वर्षात 'गो फर्स्ट' आणि 'जेट एअरवेज' सारख्या कंपन्या आर्थिक संकटामुळे बंद पडल्याने या क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली होती मात्र आता नवीन कंपन्या आल्याने विमान वाहतूक क्षेत्रात उत्साहाचे वातावरण आहे. वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आणि प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी देशात विमान ऑपरेटरची संख्या वाढवणे हे सरकारचे मुख्य उद्दिष्ट आहे.

नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू म्हणाले,भारतीय आकाशात जास्तीत जास्त कंपन्यांना प्रोत्साहन देणे हे आमचे ध्येय आहे त्यामुळे प्रवाशांना उत्तम सेवा आणि वाजवी दरात तिकिटे मिळतील. सरकारचा हा निर्णय कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी क्रांतिकारी ठरू शकतो. प्रवाशांचा फायदा होणार आहे तसेच स्पर्धा वाढल्यामुळे विमान प्रवासाचे दर नियंत्रणात राहतील. कनेक्टिव्हिटी सुधारेल आणि देशातील दुर्गम भागातील शहरांना विमान सेवेने जोडणे सोपे होईल. भारताचे विमान वाहतूक क्षेत्र जगातील अन्य कोणत्याही देशापेक्षा अधिक वेगाने विस्तार पावत आहे त्यामुळे अधिक कंपन्या सामावून घेण्याची या क्षेत्राची क्षमता आहे.

# मुलांचे भविष्य आणि सोशल मीडिया

## मद्रास उच्च न्यायालयाची सूचना अत्यंत महत्वाची

**आजचे जग वेगाने डिजिटल होत आहे. स्मार्टफोन, इंटरनेट आणि सोशल मीडिया हे आधुनिक जीवनाचे अविभाज्य घटक बनले आहेत. माहिती, शिक्षण, संवाद आणि मनोरंजन या सर्व गोष्टी आता एका स्क्रीनवर उपलब्ध आहेत.मात्र,या डिजिटल सुलभतेच्या झगमगाटामागे एक गंभीर वास्तव दडलेले आहे ते म्हणजे लहान मुलांचे असुरक्षित होत चाललेले मानसिक, भावनिक आणि सामाजिक आयुष्य. मद्रास उच्च न्यायालयाने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदीचा कायदा करण्याचा विचार केंद्र सरकारने करावा, अशी केलेली सूचना या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाची आणि विचार करायला लावणारी आहे.**

आज भारतात १४ ते १६ वयोगटातील ८२ टक्के मुले स्मार्टफोन वापरत आहेत आणि त्यापैकी ७६ टक्के मुले सोशल मीडियावर सक्रिय आहेत, हे आकडे केवळ आकडेवारी नाहीत; ती एक सामाजिक चेतावणी आहे. बालपण म्हणजे खेळ, संवाद, निसर्गाशी नाते आणि भावनिक वाढीचा काळ. मात्र, हे बालपण आता 'स्क्रीन टाइम'मध्ये अडकत चालले आहे. दररोज तीन तासांपेक्षा जास्त वेळ ऑनलाइन घालवणारी मुले हळुहळू वास्तवापासून दूर जात आहेत. अधीरता, राग, आळस, एकाकीपणा यांसारख्या भावना त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा भाग बनत असल्याचे पालकही मान्य करत आहेत. प्रौढ व्यक्तीसाठी इंटरनेटवरील सामग्री पाहायची की नाही, हा वैयक्तिक अधिकार असू शकतो.मात्र, मुलांच्या बाबतीत तोच निकष लावणे धोकादायक ठरते. मुलांची मानसिक जडणघडण अजून पूर्ण झालेली नसते.



अशा अवस्थेत पोर्नोग्राफिक सामग्री,हिंसक व्हिडीओ, ड्रग्ज, तंबाखू यासारखी माहिती सहज उपलब्ध होणे म्हणजे त्यांच्या मनावर खोल परिणाम होण्याची शक्यता निर्माण करणे. मद्रास उच्च न्यायालयाने 'गेटकीपिंग'च्या अभावाकडे बोट दाखवून हीच गंभीर बाब अधोरेखित केली आहे. अलीकडील काळातील शालेय घटनांमधून मुलांमध्ये आत्महत्येच्या प्रवृत्तीत वाढ होत असल्याचे दिसून येते.सोशल मीडियावर सतत तुलना, अपेक्षांचा दबाव, ट्रोलिंग, सायबर बुलिंग आणि 'परफेक्ट आयुष्य'चे खोटे चित्र यामुळे मुलांचे आत्मभान ढासळते. अपयश स्वीकारण्याची ताकद कमी होते.ही केवळ वैयक्तीक समस्या न राहता सामाजिक संकट बनत आहे. अशा वेळी 'कायदा नको, फक्त जागरूकता पुरेशी आहे' असे म्हणणे वास्तवाशी फारकत घेणारे ठरू शकते.

ऑस्ट्रेलियाने लागू केलेला 'ऑनलाइन सुरक्षा सुधारणा कायदा २०२४' हा जगासाठी एक महत्त्वाचा संदर्भ ठरतो.१६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालून, उल्लंघनाची जबाबदारी थेट सोशल मीडिया कंपन्यांवर टाकण्यात आली आहे. मुलांना किंवा पालकांना गुन्हेगार ठरवण्याऐवजी, 'वय पडताळणी'सारखी तंत्रज्ञाने वापरण्याची जबाबदारी कंपन्यांवर देण्यात आली आहे. हा दृष्टिकोन शिक्षात्मक नसून संरक्षणात्मक आहे आणि म्हणूनच तो अधिक परिणामकारक ठरू शकतो.

भारतासारख्या देशात, जिथे १६ वर्षांखालील मुलांची संख्या सुमारे ३५ कोटी आहे, तिथे हा प्रश्न अधिक व्यापक आणि गुंतागुंतीचा आहे. केवळ बंदी पुरेशी ठरणार नाही. कायद्याबरोबरच पालकांसाठी डिजिटल साक्षरता, शाळांमधून इंटरनेट सुरक्षिततेचे शिक्षण, पालक विंडो आणि कंटेंट फिल्टरिंग आणि सोशल मीडिया कंपन्यांची कठोर जबाबदारी. या सर्व बाबी एकत्रितपणे राबवाव्या लागतील. मुलांचे स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे, पण त्याहून महत्त्वाचे आहे त्यांचे संरक्षण. आज घेतलेले निर्णय उद्याच्या पिढीचे मानसिक आरोग्य, मूल्यव्यवस्था आणि सामाजिक भान ठरवणार आहेत. मद्रास उच्च न्यायालयाने व्यक्त केलेली भूमिका ही केवळ न्यायालयीन टिप्पणी नसून समाजाला आरसा दाखवणारी आहे. 'डिजिटल भारत' घडवताना 'सुरक्षित बालपण' हरवू नये, हीच खरी कसोटी आहे. त्यामुळे आता प्रश्न असा नाही की कायदा करावा की नाही; प्रश्न असा आहे की, आपण आपल्या मुलांसाठी जबाबदार समाज म्हणून उभे राहणार आहोत का?

**■ मच्छिंद्र ऐनापुरे,जत**

राज्य सरकारने ३१ डिसेंबरला मद्याची दुकाने रात्री १ वाजेपर्यंत चालू ठेवण्याची परवानगी दिली आहे तर बिअर बार्स,पब्स,क्लब्स आणि परमिट रूम्स् यांमध्ये पहाटे पाच वाजेपर्यंत मद्य विक्री करण्याची मुभा देण्यात आली आहे. सरकारच्या या निर्णयामुळे मद्यपींमध्ये उत्साहाचे वातावरण असले, तरी सामान्य जनतेमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

# सरकारच्या पायघड्या

दारूमुळे होणारी हानी लक्षात घेऊन अनेक राज्य सरकारांनी आपल्या राज्यात कायमस्वरूपी दारूबंदी केली आहे, असे असताना राज्य सरकारने मद्यपींसाठी घालून दिलेली मोकळीक महाराष्ट्राच्या संस्कृतीला न शोभणारी आहे.३१ डिसेंबरच्या एका रात्रीत लाखो लिटर दारू रिचवली जाते. अति मद्यसेवनामुळे या दिवशी कितीतरी ठिकाणी अपघात घडतात. या अपघातात कितीतरी निरपराधांचे बळी जातात तर कितीतरी आयुष्यभरासाठी जायबंदी होतात. या एका रात्री अनेक ठिकाणी वादावादीचे प्रसंग घडतात त्यामध्ये कित्येकांची डोकी फुटतात. शहरी भागांत ३१ डिसेंबरच्या पार्ट्यांमध्ये वर्षागणिक तरुणींचे प्रमाणही वाढू लागले आहे. पहाटे पाच वाजेपर्यंत परमिट रूम्स चालू ठेवण्याची शासनाने परवानगी दिल्यामुळे अनैतिक कृत्यांसाठी मोकळे रानच उपलब्ध झाले आहे. या सर्वांचा सर्वाधिक ताण पोलीस प्रशासनावर पडतो. कुणी मद्यपान करून वाहन चालवत नाहीत ना, वाहनांचे वेग मर्यादेत आहेत ना, कुठे अंमली पदार्थांची खरेदी-विक्री तर होत नाही ना, हे सर्व पाहण्यासाठी पोलिसांना शहरासारख्या ठिकाणी अधिक कुमक मागवावी लागते. एरव्ही रात्रीच्या वेळी कोणी दारू पिऊन झिंगताना दिसल्यास पोलीस त्याला हटकतात; मात्र आता सरकारनेच पहाटे ५ वाजेपर्यंत झिंगण्याची परवानगी दिल्याने पोलिसांना रात्रीची गस्त वाढवून मद्यपींची भांडणे सोडवण्यासाठी वेगळा वेळ द्यावा लागणार आहे.

३१ डिसेंबरच्या रात्री मद्यपान करून नववर्ष साजरे करणे ही खरेतर पाश्चात्यांची कुप्रथा. ही कुप्रथा जोपासून आपणच आपला ऱ्हास करून घेत आहोत.आपल्या राज्यातील जनतेला सर्व प्रकारच्या हानिकारक गोष्टींपासून दूर ठेवणे, कुप्रथांना प्रोत्साहन देणाऱ्यांना शासन करणे आणि राज्याच्या संस्कृतीचा पुरस्कार करणे हे राजाचे आद्यकर्तव्य आहे; मात्र सध्याचे सरकार हा राजधर्म विसरले आहेत कि काय अशी शंका येते. मद्यविक्रीतून राज्याला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. ३१ डिसेंबरच्या रात्रीकरीता मद्यपींसाठी सरकारने पायघड्या घातल्याने हा नक्की छत्रपती शिवरायांचाच महाराष्ट्र आहे का? असा प्रश्न कोणी बाहेरच्यांनी विचारला तर आश्चर्य वाटायला नको.

**■ जगन घाणेकर**

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**सोमवार,ता.२९.१२.२०२५**, विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५२, शालिवाहन शके १९४७, विश्वावसुनाम संवत्सरे दक्षिणायणे,हेमंत ऋतो,पौष मासे, शुक्ल पक्षे, नवमी तिथी,१०.१३ नंतर दशमी तिथी,रेवती नक्षत्र,७.४२ नंतर अश्विनी नक्षत्र३०.०५ पर्यंत,मीन रास, ७.४२ नंतर मेष रास, परिघ योग,७.३७ नंतर शिव योग २८.३२ पर्यंत, कौलव करण,१०.१३ नंतर तैतिल करण २१.०७ पर्यंत, दिनमान ११.०१, सुर्योदय ७.०४, सुर्यास्त १८.०५, (कोल्हापूरचे) राहूकाळ सकाळी ७.३० ते ९,मध्यम दिवस सकाळी १०.१५ पर्यंत नंतर उत्तम दिवस, सकाळी १०.१५ नंतर सर्व कामास शुभ, ओटी भरणेस, नवीन दुकान घालणेस, व्यापार, पंचक ७.४२ पर्यंत, बुध धनुराशीत प्रवेश ७.२३ पर्यंत.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष**-तुमच्या वैयक्तिक आयुष्यातील नव्या घडामोडीमुळे तुम्ही आणि तुमच्या संपूर्ण कुटुंबाला आनंद होईल. तुम्हाला धन लाभ होऊ शकतो.

**वृषभ**-अनपेक्षित स्रोतांकडून तुम्हाला महत्त्वाची आमंत्रणे मिळतील.नवीन गोष्टी शिकण्याकडे तुमचा कल असून तो उल्लेखनीय ठरेल.

**मिथून**-तुमच्या कुटुंबाच्या भावनिक मागण्यांकडे दुर्लक्ष करू नका. इतरांना मदत करण्यासाठी आपला वेळ आणि शक्ती खर्च कराल.

**कर्क**-घरात नव्याने आलेल्या सदस्यामुळे आनंददायी वातावरण तयार होईल.आरोग्यासंदर्भातील कोणत्याही प्रश्नावर दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घ्या.

**सिंह**-तुमच्या इच्छा प्रत्यक्षात आणण्यासाठी तुमचे विचार आणि ऊर्जा वापरा. तुम्हाला अनपेक्षित स्त्रोतातून पैसा मिळू शकतो ज्यामुळे तुमच्या आर्थिक समस्या दूर होतील.

**कन्या**- एखाद्या धार्मिक स्थळी किंवा एखाद्या नातेवाईकाच्या घरी जाण्याचा विचार पुढे येईल.तुम्हाला आपल्या कामांना वेळेवर पूर्ण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**तुळ**-घरातील कुणी सदस्याच्या व्यवहाराने तुम्ही चिंतीत राहू शकता. दिवसाच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत, कामाच्या ठिकाणी तुम्ही उत्साही असाल.

**वृश्चिक**- एखाद्या कामात तुमची बुद्धिमत्ता वापरलीत तर लोकांना समजावण्यात, पटविण्यात तुम्ही यशस्वी होऊ शकाल. विवादात्मक विषय काढणे टाळा.

**धनु**-तुम्ही नव्या योजना आणि उपक्रमाबद्दल कमालीचे उत्साही असाल. तुमच्या घरातील वातावरणात तुम्ही उपयुक्त बदल कराल. स्थावर मालमत्ता खरेदी कराल.

**मकर**-तुमच्या कामावर लक्ष केंद्रीत केलेत तर यश आणि मान्यता दोन्ही तुमच्याकडे चालत येईल.रिकाम्या वेळेचा सदुपयोग कराल. वादविवाद टाळा.

**कुंभ**-गरजवंतांना मदत करण्याच्या तुमच्या क्षमतेमुळे तुम्हाला आदर मिळेल. कामाच्या ठिकाणी जे तुमजा द्वेष करतात ते तुमच्याशी चांगले वागतील.

**मीन**- आजच्या दिवशी गुंतवणूक केली तर भविष्यात त्याचा फायदा तुम्हाला मिळू शकतो. कामाच्या ठिकाणी वरिष्ठांची मर्जी राहील. सहकारी तुम्हाला मदत करतील.

## वाचकांचा पत्रव्यवहार

# लोकनेते दि.बा.पाटील नावाची टाळाटाळ का?

२५ डिसेंबरला सकाळी ८ वाजता इंडिगोचे बेंगळुरूवरून आलेले पहिले विमान नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रवासी वाहतुकीचा अधिकृतपणे श्रीगणेशा झाला. या विमानाचे पाण्याचे फवारे उडवून, जल सलामी देऊन भव्य स्वागत करण्यात आले.नवी मुंबईकरांचेच नव्हे तर महाराष्ट्राचे अनेक दशकांचे स्वप्न अखेर प्रत्यक्षात आकारास आले.या पहिल्यावहिल्या विमानातून आलेल्या अनेक प्रवाशांनी या विमानतळाचे अनेक व्हिडीओ व्हायरल केले. त्यामुळे अत्याधुनिक पद्धतीने रचना करण्यात कमळाच्या आकाराचे भव्य डिझाईन असलेल्या या विमानतळाचे समाजमाध्यमातून दर्शन झाले.

फक्त एकच गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विमान उड्डाणाच्या या प्रारंभीच्या स्वागतोत्सवात कुठेही लोकनेते स्व. दि. बा. पाटील यांचा उल्लेख आढळला नाही. वास्तविक या विमानतळासाठी जमीन दिलेले नवी मुंबई तसेच रायगड जिल्ह्यातील स्थानिक भूमिपुत्र, विविध प्रकल्पग्रस्त, कष्टकरी आगरी आणि कोळी समाजाच्या हक्कांसाठी अनेक दशके संघर्ष करून न्याय मिळवून देणारे लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्याचा निर्णय सरकार दरबारी आधीच झालेला आहे. मात्र अजूनही त्याची पूर्तता झालेली नाही. सरकारने अधिक टाळाटाळ न करता लवकरात लवकर नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव देऊन जनतेतील संभ्रम दूर करावा.

**■ प्रदीप मोरे**

# उत्तरप्रदेश सरकारचा स्वागतार्ह निर्णय

विद्यार्थी दशेमध्येच मुलांना वाचनाची गोडी लागावी या उद्देशाने उत्तरप्रदेश सरकारने सर्व माध्यमिक आणि प्राथमिक शाळांमध्ये वर्तमानपत्रांचे वाचन बंधनकारक करण्यात आले आहे. हा निर्णय निश्चितच स्वागतार्ह म्हणावा लागेल. शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये त्याचा समावेश करण्यात आला आहे.मुलांचा स्क्रीन टाईम कमी व्हावा हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे राज्य सरकारकडून सांगण्यात आले आहे. माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांनी या संदर्भात आराखडा तयार करुन प्रस्तावित नियोजनाद्वारे शाळांच्या ग्रंथालयामध्ये हिंदी आणि इंग्रजी वर्तमानपत्रांचे वाचन बंधनकारक करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांची शब्द संपदा वाढावी यासाठी प्रत्येक दिवसासाठी एक नवा शब्द प्रयोग राबविण्यात आला आहे. वर्तमानपत्रातून अवघड शब्द निवडून त्याचा अर्थ नोटीसबोर्डवर लावल्यामुळे अनेक अवघड शब्दांची उकल होईल असा जाणकारांचा कयास आहे.



इयता नववी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे संपादकीय मंडळ तयार करण्यात येणार असून लिखाणासाठी प्रोत्साहन देवून त्यांच्यासाठी सुडोकू आणि क्रॉसवर्ड सारख्या स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. खरचं आजच्या डिजिटल जगतात वाचनाची गोडी कमी झाली असल्याचे अनेक वेळा दिसून आले आहे. मुलांना सामान्य ज्ञानाबरोबरच राज्य आणि जागतीक घडामोडींचे ज्ञान आत्मसात करण्यास या उपक्रमामुळे उभारी मिळेल विशेष म्हणजे सतत मोबाईल पाहिल्यामुळे विविध आजारांना आमंत्रण मिळत असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे उत्तरप्रदेश सरकारचा निर्णय फक्त या राज्यापुरता मर्यादित न राहता संपूर्ण भारतभर अंमलात आणणे हिताचे ठरणार आहे.

**■ राजू जाधव, मांगूर**

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५., दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप-पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# शिवसैनिकांनी निवडणुकीसाठी सज्ज रहावे

## डॉ.सुजित मिणचेकर; पट्टणकोडोली येथे शिवसेना पदाधिकाऱ्यांचा मेळावा संपन्न

पट्टणकोडोली,ता.२८(प्रतिनिधी)-

**येत्या पंधरा दिवसात जिल्हा परिषदेच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. युती होईल की नाही याबाबत अद्याप स्पष्टता नसली तरी शिवसेना (शिंदे गट) म्हणून प्रत्येक शिवसैनिकांनी आतापासूनच कामाला लागून निवडणुकीसाठी सज्ज रहावे, असे प्रतिपादन माजी आम. डॉ.सुजित मिणचेकर यांनी केले.**




पट्टणकोडोली येथे शिवसेनेतर्फे आयोजित मेळाव्यात मार्गदर्शन करताना माजी आमदार डॉ.सुजित मिणचेकर शेजारी माजी जिल्हाप्रमुख पुंडलिक जाधव, अर्जुन शिनगारे, महेशकुमार नाझरे व इतर प्रमुख मान्यवर.

पट्टणकोडोली (ता.हातकणंगले) येथे जिल्हा परिषद मतदार संघातील शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांच्या आयोजित मेळाव्यात मार्गदर्शन करताना ते बोलत होते.डॉ.मिणचेकर पुढे म्हणाले, तब्बल आठ वर्षानंतर जिल्हा परिषद निवडणुका होत असल्याने अनेक उमेदवारांनी उमेदवारीसाठी इच्छा व्यक्त केली आहे. मात्र जो इच्छुक उमेदवार आहे त्यांनी आतापासूनच मतदारांची यादी तयार करुन प्रत्यक्ष कामाला लागले पाहिजे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार जो उमेदवार अंतिम होईल त्याच्या पाठीशी शिवसैनिक व भिमसैनिकांची ताकद उभी राहील. पट्टणकोडोली पंचायत समिती व जिल्हा परिषदेत शिवसेनेचा भगवा फडकवण्याचा निर्धार करुन काम केल्यास यश नक्की मिळेल,असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रारंभी उपजिल्हाप्रमुख विजयकुमार स्वामी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. तत्पूर्वी हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी शिवसेना माजी जिल्हाप्रमुख पुंडलिक जाधव यांनी, शिवसेनेच्या ऐतिहासिक घटनांचा ऊहापोह केला. शिवसेना ही संघटना बाळासाहेबांनी कशाप्रकारे घडविली व सेनेसाठी रक्ताचे पाणी करणाऱ्या शिवसैनिकांना शिवसेनेत कसा मान मिळतो हे विशद केले.

प्रत्येक शिवसैनिकांनी कायमस्वरुपी संघर्ष करण्यास तयार व्हावे,असे त्यांनी सांगितले.माजी ग्रामपंचायत सदस्य अर्जुन शिनगारे म्हणाले, पट्टणकोडोली जिल्हा परिषद मतदार संघातील चारही गावांमध्ये शिवसेनेचे वर्चस्व आहे. येथून शिवसेनेचाच जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य निवडून आणून पट्टणकोडोली मतदार संघाचा दुष्काळ पुन्हा एकदा संपवूया, असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी भिमराव संघमित्रा, आक्काताई वडर, इम्रान जमादार, आनंदा आवटे, संकेत शिंदे यांनी शिवसेनेत प्रवेश केला.यावेळी पट्टणकोडोली शहरप्रमुख शिवानंद पणदे, प्रकाश जाधव, महेशकुमार नाझरे, सतिश हुपरे, तानाजी शिंदे, अशोक हुपरे, सुनिल बारैय्या, राजेंद्र शिंदे, चरणदास कांबळे, मारुती तोडकर, महेश पाटील, प्रकाश खुडे, सचिन चव्हाण, पांडुरंग निकम, उदय बागल, विनायक तोडकर, सचिन हळदे, अरविंद जाधव यांच्यासह अन्य पदाधिकारी, मान्यवर व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी ग्रामपंचायत सदस्य किसन तिरपणकर यांनी सूत्रसंचालन केले तर आनंदा मोरे यांनी आभार मानले.

# संकेश्वरचे बसवेश्वर उद्यानवन बनले कचऱ्याचे ठिकाण

संकेश्वर,ता.२८(प्रतिनिधी)-

**संकेश्वर-घटप्रभा रस्त्यावरील नेसरी गार्डन डिलक्सनजीक नियोजित श्री बसवेश्वर पुतळा उभारण्यासाठी श्री बसवेश्वर उद्यानवनची ठिकाण निश्चित करण्यात आले.मात्र भूमीपूजन झाल्यानंतर उद्यानवन कचऱ्याचे ठिकाण बनलेले दिसत आहे.**



या ठिकाणी गवत उगविले असून प्लास्टिकच्या पिशव्या, रिकाम्या पुठ्ठ्याचे बॉक्स, केरकचरा विस्कटलेला दिसत आहे. गोल्बल डिस्काउंटचे फाटलेले बॅनर तसेच झळकताना दिसत आहे.येथे चरावयास येणारी भटकी जनावरे कचरा विस्कटून टाकत आहेत.नियोजित श्री बसवेश्वर पुतळा उभारण्याचे ठिकाण बसवप्रेमींनी स्वच्छ करुन येथे भटक्या जनावरांचा बंदोबस्त करायला हवे असल्याचे नागरिकांतून सांगितले जात आहे.येथे श्री बसवेश्वर आणि श्रींचे छायाचित्रे असलेले फलक झळकविण्यात आले आहे.त्यामुळे यामार्गे ये-जा करणाऱ्या नागरिकांतून दूरावस्थेची चर्चा होतांना दिसत आहे.संकेश्वरातील बसवप्रेमींनी येथे स्वच्छतेचे काम ताबडतोब हाती घेऊन नियोजित ठिकाणी तात्पुरती आवार व्यवस्था करण्याची मागणी केली जात आहे.



यशस्वी विद्यार्थिनींचा सत्कार करताना मुख्याध्यापक विजय जाधव,सौ.सरोजनी आरगे,शिक्षकवृंद व कर्मचारी स्टाप.

## न्यू हायस्कूल शिवनाकवाडीच्या विद्यार्थिनींचे प्रज्ञाशोध परिक्षेत यश

शिवनाकवाडी,ता.२८-

**शिवनाकवाडी(ता.शिरोळ) येथील स्वतिश्री जिनसेन ज्ञान प्रसारक मंडळ,नांदणी संचलित न्यू हायस्कूल शिवनाकवाडीच्या दोन विद्यार्थिनींनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम विज्ञान प्रज्ञा शोध परिक्षेत यश मिळवून त्यांची तालुका स्तरातून जिल्हास्तरासाठी निवड झाली आहे.**

प्रिया रविंद्र गोसावी,नम्रता परशुराम भोईर अशी दोन विद्यार्थिनींची नावे आहेत.यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांचा हायस्कूलच्यावतीने गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यशस्वी विद्यार्थिनींना मुख्याध्यापक विजय जाधव,अभिजीत माने,सुनील माने,आनंदा काशीकर,सौ.सरोजनी आरगे, सौ.मंदाकिनी निगवे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी न्यू हायस्कूलचे कर्मचारी स्टाप उपस्थित होते.

## डॉ.किरणकुमार मुतनाळी आयुर्वेद विश्वरत्न पुरस्काराने सन्मानित

चिकोडी,ता.२८(प्रतिनिधी)-

**येथील केएलई आयुर्वेदिक वैद्यकिय महाविद्यालयाचे प्रा.डॉ.किरणकुमार मुतनाळी यांना विश्वरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. बंगळूर येथील पॅलेस ग्राउंडवर आयुष्य मंत्रालय व राज्य आयुष्य विभाग यांच्या सहकार्याने तसेच के.जे.आयुर्वेद चॅरिटेबल फाउंडेशनच्यावतीने दुसऱ्या जागतिक आयुर्वेदिक संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.**



त्यामध्ये आयुर्वेदिक वैद्यकिय शिक्षण, संशोधन व उपचार क्षेत्रात दिलेल्या योगदानाची दखल घेऊन चिकोडी येथील केएलई आयुर्वेदिक वैद्यकिय महाविद्यालयाचे प्रा.डॉ.किरणकुमार मुतनाळी यांना आयुर्वेद विश्वरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल केएलई संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ.प्रभाकर कोरे व व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी विशेष कौतुक करुन अभिनंदन केले.



सचिन सुतार यांना पुरस्कार प्रदान करताना प्रमुख मान्यवर.

## निढोरीचे सचिन सुतार गुणगौरव पुरस्काराने सन्मानित

निढोरी,ता.२८(वार्ताहर)-

**येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन शंकर सुतार यांना अखिल भारतीय जनहित पार्टी संस्था कोल्हापूर यांच्यातर्फे गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान या संस्थेच्यावतीने दरवर्षी केला जातो.गेल्या एक दशकापासून सचिन सुतार यांचे सामाजिक काम असंघटित पिडीत, दु:खी, कष्टकरी समाज यांच्या व्यथा जाणून घेऊन त्यांनी स्थापन केलेल्या छत्रपती संभाजी महाराज मंच च्या वतीने व्यासपीठ, व्याख्यानमाला, शिबीर कार्यक्रम राबविण्यात ते नेहमी अग्रेसर राहिले आहेत.त्यांच्या कार्यांची दखल घेऊन हा पुरस्कार दिला आहे.

## निधन वार्ता

### ताराबाई कडाळे



कुरुंदवाड,ता.२८(प्रतिनिधी)-

येथील ताराबाई मल्लू कडाळे ( वय ९७) यांचे निधन झाले. नूतन नगरसेवक जय कडाळे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# कोगनोळी आठवडी बाजारात मंदीचे सावट

कोगनोळी,ता.२८(प्रतिनिधी)-

**कोगनोळी येथील शुक्रवारच्या आठवडी बाजारात मंदीचे सावट दिसून आले. मागील आठवड्यापेक्षा या आठवड्यातही भाजीपाला दरात मोठ्या प्रमाणात घसरण झाल्याचे दिसून आले. भाजीपाल्यांचे दर कमी असले तरी म्हणावा तितका ग्राहकांचा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे अनेकांना माल तसाच घेऊन परतावे लागले.**



कोगनोळी येथे भरलेला आठवडी बाजार.

### भाजीपाला दरात घसरण

उत्पादनात वाढ झाल्याने आणि बाजारात मालाची आवक मोठ्या प्रमाणात झाल्याने ग्राहकांचा प्रतिसाद मिळाला नसल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.या बाजारामध्ये वांगी ४० ते ५० रुपये किलो, भेंडी ४० ते ४५ रुपये किलो, दोडका ५० ते ६० रुपये किलो, टोमॅटो २० ते ३० रुपये किलो, कारली ३० ते ४० रुपये किलो, ऊसावरील शेंगा ४० ते ४५ रुपये किलो, चारधारी शेंगा ५० ते ६० रुपये किलो, बेनस ३० ते ४० रुपये किलो, हिरवा वटाणा ३० ते ४० रुपये किलो, हिरवी मिरची ३० ते ४० रुपये किलो, काकडी ४० ते ५० रुपये किलो, ढब्बू मिरची ४० ते ५० रुपये किलो, कोबी १० ते १५ रुपये गड्डा, फ्लॉवर १० ते १५ रुपये गड्डा, मेथी १० ते १५ रुपये पेंडी, कांदा पात १० ते १५ रुपये, दुधी भोपळा १० रुपये नग, पोकळा १० रुपये पेंडी, शेपू भाजी १० रुपये पेंडी, पालक १० रुपये पेंडी, चाकवत १० रुपये पेंडी, कांदे १५ ते २० रुपये किलो, बटाटे २० ते २५ रुपये किलो, लसूण ६० ते ७० रुपये किलो, आले ४० ते ५० रुपये किलो, कोथिंबीर १० रुपये पेंडी याप्रमाणे दर होते. भाजीपाल्यांचे दर आणखी कमी होण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

# कारदगा येथील आठवडा बाजारामध्ये वाहतुकीची कोंडी

ढोणेवाडी,ता.२८(प्रतिनिधी)-

**कारदगा येथील दर शुक्रवारी होणाऱ्या आठवडी बाजारामध्ये रस्त्यावर दोन व चार चाकी वाहन लावण्याचे प्रमाण वाढल्याने व छ.शिवाजी महाराज चौकात ऐन बाजारा दिवशीच अवजड वाहनांची मोठी वर्दळ वाढल्याने मोठी अडचण निर्माण होत आहे.**



आठवडा बाजारामध्ये झालेली वाहतुकीची कोंडी.

याबाबत ग्रामपंचायतीने ठोस भूमिका घेऊन वाहतूक सेवा विनाअडचणीची करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.कारदगा येथील आठवडी बाजार हा शुक्रवारी असतो.आसपासच्या गावातील अनेक व्यापारी व नागरिक बाजार करण्यासाठी येत असतात पण छ.शिवाजी महाराज चौकामध्ये रस्त्यावर दुचाकी व चार चाकी वाहने लावल्यामुळे चौकात वाहतुकीची मोठी कोंडी निर्माण झाली आहे तसेच अवजड व उसाने भरलेल्या ट्रॅक्टर ट्रॉली ही बाजारादिवशीही मुख्य रस्त्यावरून जात असल्याने मोठी अडचण निर्माण झाली आहे.

वाहने पास होत नसल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून राहिल्याने याचा नाहक त्रास बाजार करण्यास येणाऱ्या महिला, पुरुष व लहान मुलांना होत आहे.त्यामुळे बाजारापेक्षा या वाहनांच्या वर्दळीची भिती नागरिकांना लागली आहे. त्यामुळे शुक्रवारी बाजार दिवशी अवजड वाहनांना प्रवेश बंदी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# अमोल खोत यांचा सत्कार

कागल,ता.२८(प्रतिनिधी)-

**छ.शाहू सहकारी साखर कारखाना, कागलचे ऊस उत्पादक सभासद करनूर (ता.कागल) येथील प्रगतशील शेतकरी अमोल कुमार खोत यांना वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे (व्हीएसआय) यांच्या मार्फत दिला जाणारा मानाचा ऊस भूषण पुरस्कार जाहीर झाला.**



शाहू साखर कारखान्याचे विद्यमान ऊस विकास अधिकारी सुजयकुमार पाटील यांना राजारामबापू पाटील कारखान्याकडील २०२४-२०२५ या सेवा कालावधीसाठी उत्कृष्ट ऊस विकास अधिकारी हा पुरस्कार जाहीर झाला.त्याबद्दल शाहू ग्रुपचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे यांनी शेतकरी अमोल खोत यांच्यासह ऊस विकास अधिकारी पाटील यांचा सत्कार केला.त्यांना कारखान्याच्या अध्यक्षा श्रीमती सुहासिनीदेवी घाटगे, समरजितसिंह घाटगे, अमरसिंह घोरपडे, वीरकुमार पाटील, सर्व संचालक व जितेंद्र चव्हाण यांचे प्रोत्साहन लाभले. शेती अधिकारी दिलीप जाधव व शेती विभागाचे मार्गदर्शन मिळाले.प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत व्हीएसआयच्या सोमवारी ता.२९ रोजी मांजरी येथे होणाऱ्या ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पुरस्कार वितरण होणार आहे.

# मराठा समाजाची एकजुटीनेच प्रगती शक्य

## नाम.संतोष लाड; चिकोडीत मराठा समाज बांधवांचा मेळावा संपन्न

चिकोडी,ता.२८(प्रतिनिधी)-

**मराठा समाजाने शिक्षणाला अधिक प्राधान्य दिल्यास आर्थिक, सामाजिक व राजकीयदृष्ट्या पुढे येणे शक्य आहे. सध्या देशात मराठा समाज तळाच्या स्तरावर असून एकजूटीनेच समाजाची प्रगती शक्य आहे, असे प्रतिपादन कामगार मंत्री व मराठा समाजाचे नेते संतोष लाड यांनी केले.**



चिकोडी येथे शिवपुतळ्याचे पूजन करून मेळाव्याचे उद्‌घाटन करताना मंत्री संतोष लाड, अजितसिंह निंबाळकर व इतर मान्यवर.

येथील पद्मा मंगल कार्यालयात आयोजित चिकोडी तालुका मराठा समाज बांधवांच्या मेळाव्यात ते बोलत होते.मंत्री लाड पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज मुस्लिमविरोधी नव्हते. इतिहासाची मोडतोड करून मराठा समाजातील तरुणांची दिशाभूल करणाऱ्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नका. मला राजकारणात कोणताही रस नाही. समाजसेवा हीच माझी पहिली प्राधान्यता आहे.आजवर आलेल्या कोणत्याही सरकारने मराठा समाजासाठी विशेष काही केलेले नाही.इतर समाजांच्या तुलनेत मराठा समाज अधिक मागासलेला आहे. समाज संघटनासाठी ज्यांना आर्थिक मदत देता येत नाही त्यांनी आपला वेळ द्यावा. समाजासाठी वेळ देणारे हे पैशांपेक्षा मोठे योगदान आहे. राज्यभर मराठा समाजाला संघटित व बळकट करण्याची माझी इच्छा आहे.

यावेळी माजी मंत्री श्रीमंत पाटील म्हणाले, मराठा समाज एकत्र आल्यास निश्चितच विकास साधता येईल. आपण स्वाभिमानाने जगले पाहिजे. भांडवल नाही म्हणून हातपाय गाळू नयेत.कमी भांडवलातही रोजगार निर्माण करणारी कौशल्ये उपलब्ध आहेत; ती वापरून आर्थिक प्रगती साधावी.माजी आम.अजितसिंह निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यास कर्नाटक राज्य मराठा विकास महामंडळाचे अध्यक्ष जी.एच.मरियाजीराव,बी. आर.यादव,राम माने,नंदराज निंबाळकर, बाळासाहेब पाटील, सुप्रिया देसाई, टी.एस.मोरे, किशोर पवार, ज्योतिबा खामकर, रणजीत शिरशेट,अनिल पाटील,अण्णा पवार, अप्पासाहेब पवार,पांडुरंग माने, शिवाजी माने, अजित देसाई, अमर यादव यांच्यासह, तालुक्यातील समाजबांधव उपस्थित होते.

## मंडलिक महाविद्यालयात ३१ रोजी आंतरराष्ट्रीय परिषद

मुरगूड,ता.२८(प्रतिनिधी)-

**येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात ता.३१ डिसेंबर रोजी वाणिज्य विभाग,अर्थशास्त्र विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्यावतीने "डिजिटल कॉमर्स आणि ई-बिझनेस इमर्जिंग ट्रेंड्स, टेक्नॉलॉजी अँड मल्टि डिसिप्लनरी परस्पेक्टिव्ह." या विषयावर एकदिवशीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्रा.डॉ.शिवाजी होडगे यांनी दिली.**

या ऑनलाईन परिषदेमध्ये बिजभाषक म्हणून हरियाणा विद्यापीठाचे कुलगुरू मदन मोहन गोयल यांचे मार्गदर्शन लाभणार आहे तसेच साधन व्यक्ती म्हणून श्रीलंकेतील अस्टर्न विद्यापीठाचे डॉ.गणचंद्रन आणि कर्मवीर हिरे महाविद्यालय गारगोटीचे प्राचार्य डॉ.उदयकुमार शिंदे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या परिषदेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन डॉ.शिवाजी होडगे यांनी केले आहे.

# नंद्याळमध्ये फुलवली स्ट्रॉबेरीची शेती

## आंबीलढोके दाम्पत्याचा यशस्वी प्रयोग

से.कापशी,ता.२८(वार्ताहर)-

**नंद्याळ(ता.कागल)गावचे प्रगतशील शेतकरी बाळकृष्ण दादू आंबीलढोके व त्यांची पत्नी सुनिता आंबीलढोके यांनी स्ट्रॉबेरीच्या शेतीचा यशस्वी प्रयोग करून दाखवला आहे.**

बेड पद्धतीने विशेष म्हणजे कुठल्याही रासायनिक खताचा वापर न करता, सेंद्रिय खताचा वापर करून, तेही तीन गुंठ्यात हा प्रयोग करताना हवामानाचा व अख्या गावाचं चॅलेंज स्वीकारून यशस्वी करून दाखवला आहे.थंड हवामानातील हे पीक असल्यामुळे ते त्यांच्यासाठी चॅलेंज होतं. आंबीलढोके यांनी गेल्या वर्षी सेंद्रिय कलिंगडाचा यशस्वी प्रयोग केल्यानंतर, यावर्षी नवीन असा नाविन्यपूर्ण प्रयोग म्हणून स्ट्रॉबेरी या पिकाचा प्रयोग केला आहे. त्याचा उत्तम असा रिझल्ट आलेला आहे.



बरेच शेतकरी म्हणतात की,स्ट्रॉबेरी हे पीक थंड हवामानातील पीक आहे.शिवाय ते रासायनिक खते कीटकनाशके याशिवाय येऊ शकत नाही.पण पूर्णपणे सेंद्रिय शेती करून स्ट्रॉबेरी या पिकाचे भरघोस उत्पादन घेऊ अशी आशा कागल तालुक्यातील नंद्याळ या गावचे प्रगतशील शेतकरी बाळकृष्ण दादू आंबीलढोके व त्यांची पत्नी सुनिता आंबीलढोके या पती-पत्नीने कृषी विभागाच्या मदतीने व्यक्त केली आहे.

नंद्याळ येथे कार्यरत असणाऱ्या कृषी सहाय्यक सुनिता लोकरे यांनी त्यांना सेंद्रिय पद्धतीने स्ट्रॉबेरी हे पीक घेण्यासाठी मार्गदर्शन केले.तसेच जिल्हा कृषी अधिकारी जालिंदर पांगिरे, उपकृषी अधिकारी अरुण भिंगारदिवे, तालुका कृषी अधिकारी शेखर थोरात, आत्माचे अधिकारी उदय गायकवाड यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले, असे ते आवर्जून सांगतात.

तीन गुंठ्यात सातशे रोपाची लागण केली आहे.प्रथमता पूर्व मशागत करून पाच फुटाचे बेड तयार केले. त्या बेडवर स्वतः तयार केलेले गांडूळ खत आणि त्यामध्ये वेस्टेजचे ग्रॅन्युअल, बुरशीनाशक म्हणून ट्रायकोडर्मा हे बेड तयार केले.मल्चिंग व ठिबक करून पाच नोव्हेंबर रोजी स्ट्रॉबेरीची लागण केली. रोपे सांगली व आष्टा या ठिकाणाहून आणली आहेत. संपूर्ण सेंद्रिय पद्धतीचा यामध्ये वापर केला आहे.जीवामृत गोकृपा अर्क, डी कंपोजर गुळ पाणी अर्क तसेच कीटकनाशक म्हणून लिंबोळी अर्क व दशपर्णी अर्क याचा वापर केला आहे.कोणत्याही रासायनिक खताचा वापर न करता अतिशय चांगला रिझल्ट आला आहे.

सेंद्रिय पद्धतीने स्ट्रॉबेरी पिकाचे उत्पादन घेतले असून, पिकाची गुणवत्ता अतिशय चांगली आहे. त्यामुळे बाजारात स्वतः विक्री करणार असून चांगल्या प्रकारचा आर्थिक नफा मिळेल. कापशी खोरा हा ऊसाचा पट्टा आहे. पण ऊस शेती मशागतीचा वाढता खर्च,गगनाला भिडलेले रासायनिक खताचे दर, मजुरांचा वाढता पगार, वन्य प्राण्यांकडून होणारे पिकाचे नुकसान आदी बाबींमुळे ऊस शेती परवडत नाही.उत्पादन खर्चाच्या तुलनेत ऊस पिकापासून अपेक्षित उत्पन्न मिळत नाही.म्हणून शेतकऱ्यांनी पारंपारिक ऊस शेतीला फाटा देऊन सेंद्रिय शेतीचे नवनवीन प्रयोग आपल्या शेतामध्ये करावे, असे शेवटी बाळकृष्ण आंबीलढोके यांनी सांगितले.

## पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

### * खरेदी विक्री *

**सायकल विकणे आहे.** लहान मुलांची डबलशिट २ ते ५ वर्षाच्या मुलांची सायकल संपर्क–९९२११८९९२०

**घर विकणे आहे.** त्रिशुल चौक, अवधुत आखाडा, इचलकरंजी येथे सर्व सोयीनियुक्त २ मजली आरसीसी इमारत विकणे आहे. संपर्क–९९२१६६१०२८

**मेडिकलचे** लाकडी फर्निचर विकणे आहे.काचेचे काऊंटर, कपाट वगैरे संपर्क–७७७६०५७३७५, इचलकरंजी.

**गहाणवट/भाड्याने देणे–** शहापूरमध्ये दुसऱ्या मजल्यावर नवीन, स्वतंत्र वन बीएचके छोट्या फॅमिलीकरीता, मजबूत लोखंडी कॉट विकणे. मो. ८३९०९२८०११

**अब्दुललाट येथील** अरिहंत कॉलनी लगत बसवान मळा येथे १३ गुंठे एनए प्लॉट सर्व सोयीनियुक्त योग्य किंमतीत विकणे आहे. संपर्क. मो. ९५७९३५४१८५ (क्लियर टायटल)

**गुंठेवारी झालेला** ५०० स्क्वे. फूट मोकळा प्लॉट विकणे आहे. सावित्रीनगर, शहापूर. संपर्क–८९९९३९३०९४

**विकणे आहे.** ७२X३०=२२०० स्क्वे. फूट तयार शेड, व्यंकटेश कॉलनी, हनुमान मंदिरमागे, स्टेशन रोड, इचलकरंजी. फोन–९८५०९४९०८०

**हायवेटच जागा देणे आहे.** निपाणीपासून १२ किमी अंतरावरती निपाणी आणि संकेश्वरच्यामध्ये कणगला KIADB समोर पुणे–बंगळूर (NH-04) हायवेटच १४५ फूट फ्रंट असलेली २९ गुंठे जागा देणे आहे. संपर्क–९६०४११४१२१

**१) तयार युनिफॉर्म** लॉटमध्ये मिळतील. २) युनिफॉर्म कापड लॉटमध्ये मिळेल. संपर्क–९४०३३६८९७४

**पुणे–बंगळूर हायवेटच** जागा देणे आहे. कणगला इंडस्ट्रियल एरियानजीक पुणे–बंगळूर हायवेटच जवळपास ७० फूट फ्रंटेज असलेली १४ गुंठे जागा देणे आहे. संपर्क–९११६१२५१६६

**प्लॉट विकणे आहे.** कोरोची, लोकमान्य नगरमधील उत्तरमुखी ५ गुंठे कलेक्टर एनए प्लॉट विकणे आहे. संपर्क–८४५९४५११५६९

**शेत जमिन विकणे–** ८४ गुंठे, बोरगांव ५ वा मैल रोडटच. संपर्क–७५८८४८९८२१, ९५११९८६५९३.

**आरएमसी प्लान्ट,** पाईप कारखाना हॉटेल, फार्म हाऊस इ. साठी योग्य २२ गुंठे ८० फुट, बोरगांव–कुरूंदवाड हायवे टच, सिमेंट पाईप फॅक्टरी, लगत पाचवा मैल,बोरगांव रोड, शेती विकणे आहे. संपर्क–७५५९१३३१९६.

**घर विकणे–** ६ खोल्यांचे १००० स्क्वे. फुटाचे कौलारू घरक षटकोन चौक, इचलकरंजी. मो. ७७९६५३५६६६.

**२ मजली आरसीसी** घर विकणे आहे. २ किचन, २ हॉल, २ बेडरूम, ४ बाथरूम, सर्व सोयींनियुक्त दावतनगर, कबनूर. संपर्क–९८२२२०२७०४.

**शेड विकणे आहे.** ६०X५४ आरसीसी सर्व सोयीनियुक्त सीसीटीव्ही, संडास, बाथरूम ऑफिससहीत संपर्क–९७६४७८१५८३, ९८५०६१७१५१, इचलकरंजी.

**घर विकणे आहे.** ९५० स्क्वे. फूट जागेमध्ये ३ खोल्यांचे घर व मोकळी जागा इरगोंडा पाटीलनगर, इचलकरंजी. फोन–९४२३८५८१३९

**६६०० स्क्वे. फूट** औद्योगिक कलेक्टर एनए १८०० स्क्वे. फूटाचे शेडसह, बांधकाम मंजुरी व नकाशासहीत जमीन विकणे आहे. संपर्क–९३०११७०११७. पत्ता–देवकृपा सायझिंगजवळ, अमित प्रोसेसमागे, इचलकरंजी.

**सावली हौसिंग** सोसायटीजवळ ४ ते ५ हजार स्क्वे. फूट जागा विकणे आहे. संपर्क–९३०११७०११७

**जुने व नवे पॉवरलूम** घेऊ व देऊ तसेच फवारा, कांडीमशिन डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क–८३१७२९१००८

**फाईव्ह स्टार** एम.आय.डी.सी. कागल ते हुपरी रोडटच ५९,००० स्क्वे. फूट प्लॉट व २७,००० स्क्वे. फूट औद्योगिक आरसीसी शेड विकणे, कोल्हापूर. दादा – ९०६७६९९९००.

### * भाड्याने देणे/घेणे *

**भाड्याने देणे–** १ बीएचके सर्व सोयीनियुक्त २४ तास पाणी, भाड्याने देणे. संपर्क–८०८००७१५४१ (मारवाडी समाजासाठी)

**आरसीसी ग्राऊंड फ्लोअर** चार रूम सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. (मोठी फॅमिली चालेल) गांधी विकास नगर, कबनूर, इचलकरंजी. गल्ली नं.२. संपर्क–९६६५३३४७२५

**भाड्याने देणे.** १२०० स्क्वे. फूट रोडटच १९ एचपी लाईटसह CNC, VMC गारमेंट/गोडाऊनसह भाड्याने देणे. डी–मार्टजवळ. ९८२२१११२९०, ७०५७५५२६१९

**भाड्याने देणे–** ३ बीएचके १००० चौ. फूट १६X१६ फूट व १०X२५ फूट गाळे पोटमाळा, संडास बाथरूम संपर्क–चैतन्य आयुर्वेद दवाखाना, शहापूर रोड, इचलकरंजी. ९४२००१०१५०, ९१७५१०६८२९

**शेड भाड्याने देणे–** ३००० व २००० स्क्वे. फूटाचे शेड ३० फूटी रोडटच गोडाऊन/इतर व्यवसायासाठी लक्ष्मी मंदिरजवळ, वैरण बाजारजवळ, इचलकरंजी. फोन–९०९६९४८८०१

**हिरापन्ना लस्सीसमोर** अरोमा बेकरीशेजारी कापड शोरूम, बँक इत्यादीसाठी तसेच ग्राऊंड फ्लोअर व बेसमेंट खाद्य व्यवसायासाठी देणे आहे. भाडे–४५,०००. संपर्क–९०३९६९३९६९

**रूम भाड्याने देणे.** १ बीएचके भोने माळ, सरस्वती हायस्कूलजवळ, इचलकरंजी. फोन–९९२२०९९९०५

**गाळा भाड्याने देणे आहे.** काँग्रेस कमिटीमागे, कुंभार हॉस्पिटलला लागून, इचलकरंजी. फोन–९८२३३७४४७७

**भाड्याने देणे–** ११X१० चा गाळा व २ रूम सर्व सोयीनियुक्त (शाकाहारी) सुर्वेनगर, इचलकरंजी. फोन–९४२१०३७१०८, ९७३०५८१२०४

**घर भाड्याने देणे.** शुध्द शाकाहारी हत्ती चौक परिसर. संपर्क–८३२९४१८९९०

**भाड्याने देणे–** १ बीएचके सर्व सोयीनियुक्त स्वामी अपार्टमेंटजवळ, मणेरे हायस्कूल रोड, इचलकरंजी. फोन–९४०३६०१०५९

**रूम भाड्याने देणे–** मधुबन हौसिंग सोसायटी येथे २ बीएचके सर्व सोयीनियक्त संपर्क–८८८८३८९६९७, इचलकरंजी.

**जागा भाड्याने देणे.** कबनूर दत्तनगर, मेनरोडटच ५ गुंठे मॉल व गोडाऊनसाठी उपयुक्त. संपर्क–९७६६८५४२७७

**१ बीएचके** सर्व सोयीनियुक्त गहाणवट देणे आहे. शहापूर–तारदाळ नाका, तारदाळ रोड, फोन–९११६०५५९३२

**१५X४५ रोडटच गाळा** भाड्याने देणे आहे. तसेच मेडिकलचे फर्निचर विकणे आहे. शिवराज बॅटरीशेजारी, कबनूर. फोन–९५२७८९७५७५

**हॉल, १ बेडरूम,** १ अॅटॅच बाथरूम टोटल १००० स्क्वे. फूट भाड्याने देणे आहे. पत्ता– दत्तनगर डेक्कन मिलमागे, मो. ९९२२४९९८२८

**सर्व सोयी सुविधांनीयुक्त** आरसीसी गोडावून भाड्याने देणेचे आहे. गारमेंट व इतर व्यवसायासाठी. संपर्क–९५९४७५१२०१

**RK सिनेमामधील** ४००० स्क्वे. फुट ग्राऊंड फ्लोअर व ३००० स्क्वे. फुट पहिल्या मजल्यावर हॉल भाड्याने देणे आहे. संपर्क– ९५४५४५८५९५.

**भाड्याने देणे–** २६X७५ व ३६X५८ स्क्वे. फुट आरसीसी शेड हवेशीर टकाटक गारमेंट, यार्न मशिन, गोडाऊन, पेटींग प्रेस इतरसाठी विठ्ठलनगर, शहापूर रोड. मो. ९६०४२७३००७.

**दुकान गाळा भाड्याने** देणे आहे. ३०० स्क्वे. फुट व ११०० स्क्वे. फुट गोडाऊन भाड्याने देणे आहे. संपर्क– ९८५०९२८१५७.

**गोडाऊन पाहिजे–** इचलकरंजी–कबनूर एरियामध्ये १० हजार स्क्वेअर फुटचे गोडावून भाड्याने पाहिजे आहे. संपर्क–९८६००२३०२२.

**भाड्याने देणे आहे–** छोट्या कुटुंबासाठी आरसीसी दोन रूम सर्व सोयीनियुक्त घोरपडे नाट्यगृहाच्या पाठी मागे, इचलकरंजी. मो. ९९२२३१४३४६, ८९७५१३५९४४.

**१ आर.के. भाड्याने** देणे– सर्व सोयीनियुक्त निसर्ग नसरी, गोलघमुट कॉलनी, कोरोची, संपर्क–९३७३०१२१३८, ९४२०९३४२७९.

**पहिल्या मजल्यावर** ऑफिस, जिम, पार्लर क्लासेस व इतर व्यवसाय उपयोगासाठी हॉल भाड्याने देणे आहे. कबूतर ते डेक्कन रोड, कोले बंगल्याजवळ. संपर्क–९७६२१११७११

**मिनी पार्टी** लॉन भाड्याने देणे. इचलकरंजी, सांगली रोडटच खोतवाडी बसस्टॉपशेजारी मो. ९३२५६८२५२५

### आरोग्य विषयक

**मानसिक आजार–** व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलर, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्रचाळेपणा. इ. मानसिक आजारसाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री. इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैगिंक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रूषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमिट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) संपर्क–८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६

### शैक्षणिक

**मोफत वर्कशॉप** फॅशन डिझाईन व बेसिक मॅथ्स दर रविवारी इचलकरंजी व हुपरी नाव नोंदणी आवश्यक. संपर्क–९९२२३४३८११. स्माईल–वर्ल्ड एज्युकेशन.

### इतर

**पाण्याची टाकी** स्वच्छ करून मिळेल. संपर्क– ९६६५९९२३६३

### कर्ज विषयक

**५० लाख ते १ कोटीपर्यंत** लाभ मिळेल. प्रोफाईल तुमची, प्रॉपर्टी आमची यानुसार कर्ज प्रकरण केले जाईल. फोन दुपारी दोन नंतर करणे. संपर्क– ७७९८७५७७६६.

**लोन हवे आहे का?** संपर्क–९६५७१६३९८१

**होमलोन, मॉरगेज,** प्लॉट इमारत खरेदी, चालू कर्ज कमी दराने एनए असो नसो वारस नोंद ७/१२ नोंद खात्रीने. ९०९६०६६५०५, ७०५८७२१३२५

### भविष्यविषयक

**तुळजाभवानी–** ज्योतिष कुंडली, लग्न, नोकरीधंदा, गृहदोष, लक्ष्मीदोष, बाधाबंधन, जागा–जमीन, शिक्षण, व्यसन इतरावर शास्त्रोक्त उपाय, इचलकरंजी. ७८७५५३७७५४

### बोअरवेल विषयक

**राज बोअरवेल–** आमचेकडे ४।।। व ६।। इंची बोअरवेल तसेच अथिंगची कामे माफक दरात करून मिळेल. ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७

**चौगुले बोअरवेल–** ४३ वर्षांची परंपरा आमचेकडे एक दिवसात ४।।। व ६।। इंची बोअरवेल मारून सबमर्सिबल पंप बसवून मिळेल. संपर्क–डॉ. संजय चौगुले, जुन्या स्टॅण्डसमोर, स्टेशन रोड, इचलकरंजी. मो. ९३२५१४६८८४

**छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद**

### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी–विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे–घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

### * नोकरी विषयक *

**जीएमटी कॉर्पोरेशन प्रा. लि.** इंजिनिअरींग फिल्डमध्ये कॉस्ट अकौंटींगचे काम करत असणारा (लेडीज किंवा जेन्टस) हवा आहे. संपर्क–आर.व्ही. कुलकर्णी. ९४२२५८२०८८, ९९२२००१६०२. Mail-r.v.kulkarni@gmtcpl.com

**सेवा भारती संचलित** डॉ. हेडगेवार रुग्णालय इचलकरंजीमध्ये नर्सिंग पदाच्या ३ जागा भरावयाच्या आहेत. सदर पदासाठी/ही पदवी असावी तरी इच्छुकांनी आपले अर्ज ४/१८५, नाट्यगृह चौक , डॉ. हेडगेवार रुग्णालय येथे अर्ज जमा करावेत.

**इलेक्ट्रीक दुकानात** कामगार पाहिजेत. इलेक्ट्रीशियन जागा–२, मार्केटिंग जागा–१ संपर्क–श्री रविराज इलेक्ट्रीक, गणेश नगर, इचलकरंजी. ९९२१९१४२४२

**हॉस्पिटलमध्ये** नर्सिंग स्टाफ व मावशी अर्जंट पाहिजे. संपर्क–९६६५०४६१३९

**पाहिजे.** अकौटींग टॅली प्राईमची अनुभवी विवाहीत लेडीज स्टाफ पाहिजे. अनुभव किमान–२ वर्षे. संपर्क–९८३४५७०१२७

**शिकाऊ/अनुभवी सीएनसी/** व्हीएमसी ऑपरेटर पाहिजेत. भेटा–इंदू सीएनसी शॉप, सुंदरबागेजवळ, हॉटेल थाळी हाऊसच्या मागे, इचलकरंजी. मो. ९३७०१४३०३५

**नामांकित कंपनीच्या** व्यवसायासाठी हुशार व स्मार्ट मार्केटिंगसाठी अनुभवी मुलगा पाहिजे. दुचाकी चालवणारा (फिल्डवर्क) संपर्क–९३२५८३०५९२

**ऑफिसबॉय कम** हेल्पर पाहिजे. अर्जासह समक्ष भेटा. किस्मत टेक्स्टाईल, आदर्श मंगल कार्यालयाशेजारी, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**गारमेंटसाठी** महिला कामगार पाहिजेत. काजबटन–१, हेल्पर–२. संपर्क–८४०८८३०७५२

**अकौटंट पाहिजे.** इंजिनिअरींग शॉपसाठी टॅली प्राईम साठी अनुभव किमान–५ वर्षे. ९ ते १ काम. जीएसटी चे ज्ञान आवश्यक. धनलक्ष्मी कॉर्पोरेशन, जवाहरनगर, इचलकरंजी. ९२२५९२९५९५

**मोफत कॉम्प्युटर प्रशिक्षण** योजने अंतर्गत ५० बॅचेसना प्रवेश सुरू १०० % नोकरी व व्यवसायाभिमुख कोर्सेस Ms-Office, Tally Prime, Graphic Design, Advance Excel. Certificated कोर्सेस. नाममात्र नोंदणी फी. इचलकरंजी बस स्टँडजवळ, बँक ऑफ महाराष्ट्र समोर. युनिव्हर्स कॉम्प्युटर इन्स्टीट्युट. संपर्क–९०७५७८११७७.

**वर्कशॉपमध्ये** कामासाठी वेल्डर कामगार पाहिजेत. ८७९३५११५७००

**ऑफिसबॉय,** ऑफिस कामाकरिता बारावी पास, टू व्हिलर, लायसन आवश्यक. संपर्क– ओम मोटर्स, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**मगदूम आय अॅन्ड डेंटल** हॉस्पिटलमध्ये रिसेप्शनिस्ट पदासाठी हुशार व अनुभवी स्त्री उमेदवार पाहिजे. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. संपर्क फोन–८६२५०६३४६६

**पाहिजेत.** फायनान्समध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत. संपर्क–९६५७१६३९८१

**कामगार पाहिजे.** ज्वेलर्स दुकानात कामाचा अनुभव असलेला जेंटस कामगार पाहिजे. संपर्क–७४९९१६८९६०

**अकौटंट पाहिजे.** अनुभवी–पगार १५ ते २० हजारपर्यंत. संपर्क–जे.पी. संघवी, दाते मळा, सुंदर बागेजवळ, इचलकरंजी. ८००७५३५५५५

**नेट कॅफेमध्ये** लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. ऑनलाईन फॉर्म, इंग्रजी टायपिंग असल्यास प्राधान्य. संपर्क–श्री कृष्ण नेटकॅफे, गोविंदराव हायस्कूलजवळ, इचलकरंजी. ७०५७१०९१८७

**CNC सुपरवायझर** व ऑपरेटर पाहिजे तसेच सिटीझन फ्लॅट बेल्ट मशिन विकणे. संपर्क–७८७५७०५४००

**मेडिकलसाठी** फार्मासिस्ट/नॉन फार्मासिस्ट पाहिजे. संपर्क–श्री गणेश मेडिकल, संग्राम चौक, इचलकरंजी. मो. ९३०९५००८६७

**ड्रायव्हर पाहिजे.** छोटा हत्ती गाडीवर ट्रान्सपोर्ट लायसनधारक ड्रायव्हर पाहिजे. संपर्क–७५१७५०६६८२

**पाहिजे.** CNC, VMC, HMC मशिन ऑपरेटर–४ जागा, अनुभव–मशिन ऑपरेटर १ ते ४ वर्षे. फिटलिंग ऑपरेटर–४ जागा, योग्य पगार PF, ESIC सुविधा सिध्द इंजिनिअरींग, लक्ष्मी इंड, इस्टेट, हातकणंगले. संपर्क–९१५८६२८२९०, ९२७३३८२७३३

**इचलकरंजी येथील** प्युअर व्हेज हॉटेलमध्ये वेटर, कप्तान व टेबलबॉय पाहिजेत. रहाणेची व जेवणाची सोय. संपर्क–७८८१५५१३२९

**एका नामांकित क्लासेससाठी** टॅली कॉलिंगसाठी पार्ट टाईम लेडीज व १२ वी सायन्स करिता केमिस्ट्री फॅकल्टी पाहिजे. संपर्क–९६५७९४४६८७

**पाहिजेत**
**कॉम्प्युटर ऑपरेटर–जागा–२**
**ड्रायव्हर–जागा–१**
**अर्जासह समक्ष भेटा.**
**मनिष मा. मुनोत**
**गुंतवणूक सल्लागार**
**बंगला रोड, माणिक हार्डवेअरजवळ, इचलकरंजी.**
**9689441344**

**शिलाईसाठी लेडीज हेल्पर,** जेंटस कामगार पाहिजे. संपर्क–पायल बॅग्ज, मेन रोड, इचलकरंजी. ९३२५२२९६१९, ८२०८४७७२०२

**पेट्रोल पंपावर** ८ तास ड्युटीसाठी कामगार पाहिजे. संपर्क–९३५६६७०७४६

**पाहिजे.** अनुभवी सिक्युरिटी गार्ड माणगाव, रूई फाटा, इचलकरंजी, मुडशिंगी, शिरोली एमआयडीसी ड्युटी–८ तास व १२ तास आकर्षक पगार. पीएफ, ईएसआयसी सुविधा उपलब्ध. संपर्क–९७३९१३०८४२, ७६२०८०९६४७

**नामवंत अगरबत्ती** डिलेव्हरीकरीता जितो गाडीवर ड्रायव्हर पाहिजे. संपर्क–७७५८०६६१७७

**कामगार/शिकाऊ गवंडी पाहिजे.** बांधकाम साईटवरील वरकाम करण्यासाठी कामगार (हेल्पर)/शिकाऊ गवंडी पाहिजे. संपर्क–८१८००४६०६०, मेसेज करावा.

**हॉस्पिटलमध्ये नर्स,** सिस्टर्स कामासाठी लेडीज पाहिजे. रहाणेची सोय. संपर्क–९४२३८५८१४८, ८८३०३९१४९६, इचलकरंजी.

**ऑफिसबॉयसाठी** मुलगा पाहिजे. संपर्क–सॅम कन्सलटन्सी, राजाराम स्टेडियम गाळा नं. ४९, इचलकरंजी. फोन–९२५७९२४४७७

**कामासाठी मुलगा पाहिजे.** कॉलेज शिकणारे गरजूंनीच फोन करा. संपर्क–९६६५९९२३६३

**RMC प्लांटसाठी** अकाऊंटंट नेमणे आहे. ८६०५६०३१११, ८६६८९७३००३

**गारमेंट फॅक्टरीमध्ये** शिलाई मशिन ऑपरेटर पाहिजेत. (स्त्री/पुरूष) फिक्स पगार. संपर्क–९४०३३६८९७४

**कामगार पाहिजे.** लेडीज/जेंटस आकर्षक पगार व २ हमाल व अकौंटींगसाठी रोज २ तास कामासाठी लेडीज/जेंटस (आपल्या वेळेनुसार काम मिळेल.) समक्ष भेटा. जवाहर प्लास्टिंग, महात्मा फुले पुतळा, इचलकरंजी. ९९७०८९८८६५, ७९७२२१६९६४

**Workers Required** : for Machine shop CNC/VMC Operator-3, Job Indspector - 3, SPM Operator - 2, Helper (Gents/Ladies)-2, Store/ Purchase-1, Producation Supervisor - 1, Maintaince - 1, For Foundry फौंड्रीमध्ये पोरींग कामासाठी माणसे पाहिजेत. (कायम नाईट शिफ्ट) १२ तास Contact - 9158434345, Shri Padmavati Auto Componets Korochi.

**RK सिनेमामध्ये** कॅफे व किचन स्टाफससाठी मुले/मुली पाहिजेत. भेटण्याची वेळ : दुपारी ३ ते ५, संपर्क – ७४४७४४००७०, ९८३३८०७३४०.

**अर्जंट सिक्युरिटी** गार्डस् पाहिजेत. इचलकरंजी पार्वती इंडस्ट्रिज करिता ड्युटी ८ तास व १२ तास. आकर्षक पगार, मो. ९७०२४२४७७२/९५२९५४५४६८.

**वायडिंग कामासाठी** लेडीज कामगार पाहिजेत. जागा–२, पत्ता – वर्धमान चौक, इचलकरंजी. संपर्क – ८८०६६४२७७७.

**अर्जंट सिक्युरिटी** गार्ड भरणे. सर्व सुविधा उपलब्ध लक्ष्मी इंडस्ट्रिज, हातकणंगले. संपर्क – ९६०४६३९१०३.

**अॅमेझॉन कंपनीमध्ये** पार्सल डिलीव्हरी करण्यासाठी त्वरीत मुले पाहिजेत. (आकर्षक पगार) ड्रायव्हिंग लायन्सन आवश्यक. संपर्क – ७९७२७१३८१५, ९०९६१०४४४२.

**रंगाच्या दुकानात** कामासाठी गरजू मुलगा पाहिजे. आकर्षक पगार श्री बालाजी पेंटस्, मो. ८८८८०४४३३०, ७२१९१७१४८७.

**कोअर शॉपसाठी** शिकाऊ व अनुभवी महिला पाहिजेत. पत्ता – लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, हातकणंगले, मो. ७७४५८८४८९६, ९८९०८८७१९६.

**गोडाऊन** कामासाठी व डिलेव्हरी कामासाठी कामगार पाहिजे. संपर्क – ७५८८९२०६३०.

**पाहिजे.** टेक्स्टाईल ट्रेडिंग कंपनीत क्वॉलिटी चेकिंग आणि डिस्पॅच करीता फ्रेशर/अनुभवी दिवाणजी पाहिजे. किमान पदवीधर आणि कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. सांगली रोड, यड्राव सुतगिरणीजवळ. ८४५९२०४०८१, ९०११७१६४६४

**पाळण्यामध्ये बसून** काम करणारा इलेक्ट्रीशियन किंवा प्लंबिंगचा अनुभव असणारा मुलगा पाहिजे. संपर्क–लाईफ सोलार, इचलकरंजी. ८६६८८२४०९८

**पावडर कोटींग प्लॅंटसाठी** अनुभवी/शिकाऊ कामगार पाहिजे. १२००० ते १५००० पगार. फंड व ईएसआसी ची सुविधा शहापूर–इचलकरंजी संपर्क–९०९४७८१००८, ९६५७८३८१३१

**इचलकरंजी एसटी** स्टॅन्डमध्ये टू व्हिलर पार्किंगसाठी कामगार पाहिजेत. ८ तास/१२ तास ड्युटी. संपर्क–८२३७७४४४४४

**पाहिजेत.** १) सुपरवायझर–सिव्हील.२) मार्केटिंग–MBA, BBA ३) ऑफिस वर्क– CAD डिझायनिंग word Excel. ४) कामगार. संपर्क–८३९०७१२५७९, ७५८८२९२११०

**फार्मासिस्ट पाहिजे.** नवीन सुरू होणाऱ्या मेडिकल शॉपसाठी अनुभवी फार्मासिस्ट व सेल्समन (मुले/मुली) पाहिजेत. अनुभवी उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. पत्ता–राधाकृष्ण चौक, इचलकरंजी. फोन–८६६८७६३५२०

**पाहिजेत.** व्हीएस टेक्नोट्रान्स कंपनीसाठी इलेक्ट्रीक आयटीआय–१ जागा, रेफ्रिजरेशन मेकॅनिक–१, वेल्डर/फिटर–१ जागा. ० ते १ वर्षांचा अनुभव. संपर्क–९६७३०२१७३२, इचलकरंजी.

**कामगार पाहिजेत.** पेपर कारखान्यामध्ये पॅकिंगसाठी जेंटस/लेडीज व अकौटींगसाठी१ लेडीज, मेकॅनिक (आयटीआय)–जेंटस–१, इलेक्ट्रीकल (आयटीआय) जेंटस–१ पाहिजेत. संपर्क–८०८७३६७४१८.

**शहापूर, खंजीरे इंडस्ट्रिज,** पार्वती इंडस्ट्रिज, तारदाळ, आवाडे पार्ककरीता सिक्युरिटी गार्ड त्वरीत नेमणे आहे. ८ तास/१२ तास. संपर्क–९८५०९४५२२६, ९५११७५९६७६

**हॉटेल पाटील वाडा** येथे हॉटेलमध्ये कुक व वेटर कामासाठी कामगार पाहिजेत. संपर्क–८४८३९६६५९३, इचलकरंजी.

**कागल ५ स्टार** एमआयडीसीमध्ये बागकाम व देखरेखीसाठी जोडपे पाहिजे. संपर्क–९११५८३०७९६८

**मंडप कापड दुकानमध्ये** सेल्समन व बिगारी कामगार पाहिजे. संपर्क–७३८७९९९५७३

**पिझ्झा व कॉफी** शॉपमध्ये मुले–मुली पाहिजेत. पगार– ५ ते १३ हजार. पत्ता–सुंदरबागेसमोर, इचलकरंजी. संपर्क–९८२२५८०५६६, ८५३०३९५९६०.

**टेक्स्टाईल मशिनसाठी** महिला व पुरूष शिकाऊ कामगार पाहिजेत. मेटे बिल्डींग, सॅमसंग शोरूमशेजारी, षटकोन चौक, इचलकरंजी. संपर्क–९८२२३४५३१२

**हुशार व अनुभवी वेटर** पाहिजेत. (फूल टाईम) राहणेची व जेवणाची सोय. हॉटेल प्रतिनिधी–९४०३४८००००

**गारमेंट कंपनीमध्ये** लेडीज हेल्पर व जेन्टस हेल्पर पाहिजेत आणि QA पाहिजे. पत्ता–थोरात चौक व किसान चौक. नंबर–८३२९०५४७२५

**होलसेल औषध दुकानात** कामासाठी १०/१२ वी झालेली मुले/मुली पाहिजेत. सुशिल फार्मा LLP नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. (संपर्क–११ ते १) संपर्क–९०९६२६१२७२

### यात्रासहल

**कोजागिरी ट्रॅव्हल्स–** १९ जानेवारी–गिरनार, सोमनाथ, द्वारका – १० दिवस, १८ फेब्रुवारी–काशी, अयोध्या, प्रयागराज–१० दिवस. संपर्क–९४०३९५३४१२, ९४२०५९२५२४

## स्वप्निल शहा यांचे निधन

**इचलकरंजी, ता. २८–** आवाडे अपार्टमेंटमागे, लंगोटे मळा येथील प्रतिष्ठित नागरिक स्वप्निल विजयकुमार शहा



(वय ४९) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.



## विद्या विकास अध्यापक विद्यालयात व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम

**सावंतवाडी, ता.२८ –**

**येथील विद्या विकास अध्यापक विद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेल्या ताणतणावाच्या समस्या तसेच व्यसनाची ओढ रोखण्यासाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हावा, या उद्देशाने या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे नियोजन करण्यात आले होते. शिक्षक व विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते.**

निर्मल फाउंडेशनचे डॉ. दीपक मुकादम यांनी, व्यसन कसे हळूहळू व्यक्तीच्या जीवनावर नियंत्रण मिळवते, ताणतणाव कसा कार्यक्षमता कमी करतो तसेच योग्य मानसिक सवयी अंगीकारल्यास हे दोन्ही धोके टाळता येऊ शकतात, याबाबत सोप्या व प्रभावी भाषेत मार्गदर्शन केले.डॉ. मुकादम यांनी, विद्यार्थ्यांना मोबाईल, व्यसन, वाढता स्क्रीन टाइम आणि सोशल मीडियाचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम या महत्त्वाच्या विषयांवरही जागरूक केले.तत्काळ मदत, समुपदेशन आणि योग्य उपचार मिळाल्यास कोणताही व्यक्ती व्यसनातून यशस्वीरीत्या बाहेर पडू शकतो, यावरही त्यांनी भर दिला.



## माणगाव परिषदेची विश्वविक्रमी रांगोळी साकारणार

### आठ टन रांगोळी : १५० महिलांचा सहभाग

**साजणी,ता.२८ (वार्ताहर)–**

**माणगाव (ता.हातकणंगले) येथे महाराष्ट्र युवा प्रतिष्ठान ताराराणी ब्रिगेड कोल्हापूर यांच्या वतीने ऐतिहासिक माणगाव परिषदेची विश्वविक्रमी रांगोळी साकारली जात आहे.३ ते ५ जानेवारी अखेर रांगोळी पाहण्यासाठी खुली करण्यात येणार आहे.**

ऐतिहासिक माणगाव येथे १९२० साली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांची ऐतिहासिक भेट झाली होती.या भेटीची चित्रण विश्वविक्रमी रांगोळीतून साकारण्यात येत आहे.या परिषदेस १०६ वर्ष पूर्ण झालेली आहेत. यांचे औचित्य साधून येथील ५ एकर जागेवर सव्वालाख स्के.फूट जागेवर रांगोळी रेखाटनास प्रारंभ झाला आहे.२ जानेवारी अखेर ही रांगोळी पूर्णत्वास येणार आहे.यासाठी ११ रंगाची साडे आठ टन रांगोळीचा वापर होणार आहे. रांगोळीसाठी समीर काळे यांच्या मार्गदर्शनसह कलाकार मोनाली पाटील व आशा चव्हाण सह प्रतिष्ठानचे सदस्य व १५० युवती ,महिला दररोज १० तास चित्र रेखाटणार आहेत.रांगोळी ची नोंद वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड, इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड, इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये मास रेकॉर्ड मध्ये होणार आहे.

प्रतिष्ठानच्या वतीने नवे पारगाव येथे ११ एकर मध्ये छत्रपती शिवाजी महाराज,लातूर येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची ३६ हजार तर सांगली येथे १८ हजार स्केअर फूट मध्ये रांगोळी साकारण्यात आले होते, अशी माहिती वैभव कांबळे यांनी दिले. बैठकीस सुहास लाटवडेकर,शशिकांत सावंत, अशोक कांबळे , महेश पवार आदि उपस्थित होते.



**कर्नाटकातील चिक्कमंगळूर जिल्ह्यातील शिरगापूर मधील भगवान दत्तात्रेय मठाचे प्रमुख प.पू. श्री अशोक गणपती शर्माजी महाराज यांनी आडी येथील श्री दत्त देवस्थान मठाला शनिवार दि. २७ रोजी सदिच्छा भेट दिली. त्याप्रसंगी त्यांचा सत्कार करताना प.पू. परमात्मराज महाराज. त्यांच्यासोबत श्री बालाजी प्रसाद महाराज (चिक्कमंगळूर) व श्री हर्षप्रसाद महाराज (चिक्कमंगळूर) हे उपस्थित होते.**

## हल्लोखोरांना बेड्या घालून फिरवले

**पेठवडगाव,ता.२८(प्रतिनिधी)–**

**हारतुरे विक्रेत्यावर एडक्याने हल्ला करणाऱ्या दोघा संशयित हल्लोखोरांना पोलिसांनी बेड्या घालून वडगावच्या बाजारपेठेत फिरवले.**

येथील सार्वत्रिक निवडणुकीत प्रभागातील उमेदवार निवडून आल्याने फटाके उडवायला सांगितल्याचा संशय आल्याने हद्दपार आरोपी सागर राजेंद्र खोत याने मित्र आयुब मेहबूब सरकवास याच्या मदतीने चार दिवसापूर्वी एडक्याने रतन आप्पासो पाटोळे यांच्या डोक्यात, तोंडावर वार केल्याने तो गंभीर जखमी झाला. याप्रकरणी चौकशीसाठी पोलिसांनी दोघा संशयितांना बेडया ठोकून घटनास्थळी फिरवले. यावेळी बघ्यांची गर्दी झाली होती.



# अफगाणिस्तानातील खराब बेदाण्याची भारतात विक्री

## द्राक्ष बागायतदार संघाच्या पदाधिकाऱ्यांचा तस्करीचा आरोप

■ सांगली,ता.२८(प्रतिनिधी)–

**अफगाणिस्तानमधून बेकायदेशीररित्या आयात केलेल्या खराब बेदाण्यावर घातक केमिकलचा मारा करून महाराष्ट्रातील कोल्ड स्टोरेजमध्ये साठवून तो भारतीय बॉक्स भरून आपल्या बाजारपेठेत विकला जात असल्याचा आरोप करत हे मोठे रॅकेट असल्याचा दावा द्राक्ष बागायतदार संघाने केला आहे.**

संघाच्या पदाधिकाऱ्यांनी तासगाव परिसरातील कोल्ड स्टोरेज वर छापे टाकून काही बेदाणा व्यापारी व कोल्ड स्टोरेज मालक यांचे कारणामे उघड केले असल्याची माहीती संघाचे राज्य उपाध्यक्ष मारुती चव्हाण, जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय पाटील आणि संचालकांनी दिली आहे. दरम्यान या सर्व प्रकरणाची चौकशी करून दोषी व्यापारी, कोल्ड स्टोरेज मालकांच्यावर कारवाई करून त्यांचे परवाने निलंबित करण्याची मागणी बागायतदार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. मिळालेल्या अधिक माहीतीनुसार , गेली दोन वर्षे प्रतिकूल स्थितीमुळे भारतात द्राक्षाचे उत्पादन कमी होत आहे. यंदाही तीच स्थिती आहे. त्यामुळे बेदाणा उत्पादनावरही परिणाम होणार आहे. उत्पादन घटल्यामुळे बेदाण्याचे दर चढे आहेत. या वाढीव दराचा फायदा घेण्यासाठी अफगाणिस्तानमधील निकृष्ट दर्जाचा बेदाणा छुप्या मार्गाने भारतात आयात करण्यात आलेला आहे. सांगली जिल्ह्यातील अनेक कोल्ड स्टोरेजमध्ये तो बेदाणा आलेला आहे. हा बेदाणा वॉश करून त्याला कृत्रिम रंग देऊन तो पुन्हा भारतीय बाजारात आणण्याचा काही व्यापारी आणि कोल्ड स्टोरेज मालकांचा डाव आहे. तो डाव उधळून लावल्याचा दावा संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे . संघाचे राज्य उपाध्यक्ष मारुती चव्हाण जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय पाटील काही संचालक यांनी कोल्ड स्टोरेज मध्ये प्रत्यक्ष जाऊन अफगाणिस्तान मधून आलेले बॉक्स उघड केले. त्यांनी तासगाव बाजार समितीच्या संचालकांना बोलावून ही माहिती सांगितली. त्यावेळी हा नित्कृष्ट आणि काळा बेदाणा असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी चौकशी करून सर्व दोषीवर कडक कारवाई करावी,त्यांचे व्यापारी परवाने रद्द करावेत अशी मागणी केली आहे.

अफगाणिस्तानमधून आणलेला हा बेदाणा मुळात खराब झालेला असून, त्याला पुन्हा झळाळी देण्यासाठी त्यावर बेकायदा वॉशिंग आणि कृत्रिम रंगांचा वापर केला जात आहे. हा विषारी बेदाणा भारतीय बेदाणा म्हणून ग्राहकांच्या माथी मारण्याचा डाव काही व्यापाऱ्यांनी रचला होता.काही दिवसात नवीन बेदाणा हंगाम सुरू होणार आहे. यावर्षी उत्पादन कमी असल्याने तर जास्त राहणार आहे. त्या पार्श्वभूमीवर बाहेरील निकृष्ट बेदाणा आयात करून जास्त माल आहे असे दाखवून दर पाडण्याचाही व्यापाऱ्यांचा डाव असावा, असा आरोप द्राक्ष बागायत संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

# पुनवत येथे ७ रोजी वक्तृत्व स्पर्धा

■ शिराळा,ता.२८ (प्रतिनिधी)

**पुनवत (ता. शिराळा ) येथील हिंदकेसरी अर्जुनवीर पैलवान गणपतराव आंदळकर विद्यालयाने हिंदकेसरी आंदळकर यांच्या सातव्या स्मृतीदिनानिमित्त आंदळकर चषक वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन बुधवार (ता.७) रोजी करण्यात आले असल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक पाटीलयांनी दिली आहे.**

वक्तृत्व स्पर्धेच्या पाचवी ते सातवी गटासाठी–हिंदकेसरी गणपतराव आंदळकर कार्यकतृत्व, माझ्या स्वप्नातील भारत, गर्जा महाराष्ट्र माझा, माझा आदर्श, माझे आदर्शवत व्यक्तीमत्व, भ्रष्टाचार एक भारताला लागलेला कलंक आदी विषय आहेत.त्याचबरोबर आठ ते दहा गटासाठी ही वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

# वर्षाच्या शेवटच्या रविवारी जोतिबा दर्शनासाठी भाविकांची गर्दी

■ जोतिबा,ता.२८ (वार्ताहर)–

**सरत्या वर्षाच्या रविवारी जोतिबा दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. सलग पडलेल्या सुट्टी, वर्षाच्या शेवटच्या रविवारमुळे भाविक व पर्यटकांनी जोतिबा डोंगर गर्दीने फुलला होता. दर्शन रांगेचे नेटके नियोजनामुळे भाविकांना सुलभ दर्शनाचा लाभ झाला.**



जोतिबा डोंगरावर वर्षाच्या शेवटच्या रविवारी दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी केली होती.सलग पडलेल्या नाताळ सुट्टी मुळे भाविक व पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती.मंदिरा बाहेर लांबच लांब दर्शन रांगा लागल्या होत्या. अभिषेक विधीचा वेळी होणारा गोंधळ दर्शन रांगेच्या नेटक्या नियोजनामुळे थांबला.सकाळी ८ ते ९ आणि दुपारी ३ ते ४ या अभिषेक विधी च्या वेळी दर्शन रांग थांबऊन अभिषेक विधी सुव्यवस्थित पार पाडला.मंदिरा मध्ये रविवार निमित्त धुपारती सोहळा संपन्न झाला.वाहन पार्किंग वर गाड्याची रेलचेल होती.मंदिर मार्ग गर्दीने फुलून गेला होता.मुख दर्शना साठी ही मोठी रांग लागली होती.पुजेचे साहीत्य, मेवा मिठाई, शितपेय, खेळणीची विक्री मोठ्या प्रमाणात झाली.एसटी.महामंडळाने जादा बसेस सोडल्या होत्या.खाजगी वाहनातून येणाऱ्या भाविक पर्यटकांची गर्दी मोठी होती. शैक्षणिक आणि खाजगी सहली चे प्रमाण मोठ्या प्रमाणात पहायला मिळत आहे. प्रवासी कर नाक्यावर वाहनाची मोठी वर्दळ झाली होती.दर्शन रांग व्यवस्थेसाठी पोलिस, देवस्थान समिती, पुजारी समितीचे कर्मचारी तैनात होते.

# सांगलीत एकास बेदम मारहाण

■ सांगली, ता. २८(प्रतिनिधी)–

**महाविद्यालयामध्ये येवून दादागिरी का करतोस ? असा जाब विचारून चौघांनी एकास बेदम मारहाण केली. त्याला वाचविण्यासाठी पुढे आलेल्या त्याच्या मित्रासही दगड फेकून मारल्याने तो जखमी झाला. ही घटना शहरातील बदाम चौक ते कन्यापुरोहित प्रशाला या रस्त्यावर शुक्रवारी रात्री ११.३० वाजता घडली. या प्रकरणी चौघा संशयितांवर सांगली शहर पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत जखमी फिर्यादी केतन विवेक शेंडगे (वय २२, रा. आर. के. प्लाझा, शंभर फुटी रस्ता, गणपती मंदिरानजीक, विश्रामबाग, सांगली. मूळ गाव : पेड भालेखडा वस्ती, ता. तासगाव) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. घटनेची माहिती अशी, फिर्यादी केतन शेंडगे यांना चौघा संशयितांनी फोन करुन बदाम चौक ते कन्यापुरोहित प्रशालेकडे जाणाऱ्या रस्त्यावर शुक्रवारी रात्री बोलवून घेतले. केतन हा तेथे आल्यावर चौघांनी त्याला, तू महाविद्यालयामध्ये येवून दादागिरी का करतोस ? असे म्हणून त्यास शिवीगाळ करुन लाथाबुक्कयांनी मारहाण केली. यावेळी त्याच्या मदतीस आलेल्या त्याचा मित्र लक्ष्मीकांत मोकाशी यालाही संशयितांनी दगड फेकून मारला. तसेच केतन यास एकाने पाठीमागून दोन्ही हातांनी धरले. तर दुसऱ्याने त्याच्या हातात असलेल्या स्टीलच्या कड्याने डोक्यात, डोळ्याच्या वरील बाजूस आणि छातीजवळ मारुन जखमी केले. तसेच त्याचे डोके देखील भिंतीवर आपटले. यानंतर त्यांनी जीवे मारण्याची धमकी देवून संशयित तेथून पसार झाले.

पोलिसांनी संशयित रोहन रमेश कदम (वय २२, रा. राजवाडा चौक, सांगली), निखील कदम (वय २३, रा. संजयनगर, सांगली), सर्वेश मंगेश पाठक (वय २३, रा. आटपाडी) आणि अनिरुध्द घोलप (वय २६, रा. जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) यांच्यावर मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.

# चंदाची दहशत;वनविभागाचा अघोषित कर्फ्यू

## स्थानिकांसाठी बंदी तर अधिकाऱ्यांच्या सग्यासोयऱ्यांना व्हीआयपी ट्रीटमेंट

■ चरण,ता.२८ (वार्ताहर)–

**शिराळा येथील अंबावाडी परिसरात चंदा वाघिणीच्या वाढत्या हालचालींमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून प्रत्यक्षात वनविभागाने अघोषित कर्फ्यूच लागू केल्याची भावना स्थानिकांतून व्यक्त होत आहे. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून चंदा वाघिणीने अंबावाडी येथील बबन गावडे यांच्या म्हैशीला आपले भक्ष बनवले असून त्यानंतर पुन्हा अंबावाडीतील पाणवठ्यावरच ठिय्या घेतल्याने परिसरातील ग्रामस्थांना घराबाहेर पडण्यास मज्जाव करण्यात आला आहे.**

या भागात सामान्य पर्यटकांना प्रवेश नाकारला जात असताना, वनविभागाच्या काही अधिकाऱ्यांचे सगेसोयरे व ओळखीच्या व्यक्तींना मात्र, व्हीआयपी वागणूक देत वाघिणीचे दर्शन घडवले जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. एकीकडे विद्यार्थ्यांना



शाळा,कॉलेजला जाण्यासाठी सुट्टी घ्यावी लागत असून दुसरीकडे नागरिकांना बाहेर पडू नका असा सल्ला दिला जात आहे. त्यामुळे स्थानिकांसाठी कर्फ्यू आणि अधिकाऱ्यांच्या ओळखींसाठी व्हीआयपी ट्रीटमेंट हा कोणता न्याय? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.वनविभागाकडून मार्गभ्रमण करताना नागरिकांना बिस्किटांचे पुडे देऊन स्वतःची काळजी घ्या, वाघीण लवकरच आपले ठिकाण बदलेल असा सल्ला दिला जात असला, तरी प्रत्यक्षात ग्रामस्थांचे दैनंदिन जीवन ठप्प झाले आहे. शेतकरी, मजूर, विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिक सगळेच भीतीच्या छायेत वावरत आहेत. दरम्यान, वाघिणीने वस्तीमध्ये येऊन ज्या म्हशीला भक्ष बनवले त्या प्रकरणी अद्याप संबंधित शेतकऱ्याला कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. नुकसान भरपाईबाबत पंचनामा करण्यात आलेला नसल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष आहे. वनअधिकाऱ्यांकडून याबाबत ठोस कार्यवाही न झाल्याने रोष अधिकच वाढत आहे.वनविभागाने केवळ सूचना व निर्बंध लादण्याऐवजी नागरिकांच्या सुरक्षिततेसह नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तातडीने दिलासा द्यावा, पारदर्शक पंचनामा करून नुकसानभरपाई जाहीर करावी तसेच सर्वांसाठी समान नियम लागू करावेत, अशी जोरदार मागणी अंबावाडी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात येत आहे.

# विस्कळीतपणामुळे मराठा समाजाची अधोगती : नाम.लाड

■ संकेश्वर,ता.२८(प्रतिनिधी)–

**संपूर्ण राज्यात मराठा समाजाची लोकसंख्या निश्चितच निर्णायक आहे. मात्र, समाजातील विस्कळीतपणामुळे आपली ताकद प्रभावीपणे समोर येत नाही. याच कारणाने समाज शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, शासकीय नोकऱ्यांमध्ये मागे पडला आहे. त्यामुळे समाजासह संघटना मजबूत करण्याचे आवाहन राज्याचे कामगार कल्याण मंत्री संतोष लाड यांनी केले.**

येथील शंकरलिंग समुदाय भवनात आयोजित हुक्केरी तालुका मराठा समाजाच्या चिंतन शिबिरात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत




**संकेश्वर हुक्केरी तालुका मराठा समाजाच्या चिंतन शिबिरात बोलताना मंत्री संतोष लाड. शेजारी माजी मंत्री श्रीमंत पाटील, अमर नलवडे, सीमा हतनुरे, श्रीकांत हतनुरे व इतर**

होते. अध्यक्षस्थानी समाजाचे अध्यक्ष अमर नलवडे होते. मान्यवरांनी दीपप्रज्वलन व छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन केले.

नाम.लाड म्हणाले, हिंदू हे मुस्लिम विरोधी नसले तरी तसे बिंबवले जात आहे.त्यामुळे मराठा समाजाकडे वेगळ्या दृष्टीकोन पाहिले जात आहे.याकरिता मराठा समाज बांधवांनी आपण कोणत्याही समाजाविरोधात नसल्याचे कृतीतून दाखवून देण्याची गरज निर्माण झाली आहे.समाज शैक्षणिक ,सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या मागास राहिला आहे. छ. शिवाजी महाराजांचा नुसता जयजयकार करुन चालणार नाही.शिवरायांचे आचार विचार अंमलात आणून आपापल्या कार्यात प्रगती साधायला हवी आहे.समाज शैक्षणिक सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या सबल करावयाचा असेल तर समाज बांधवांनी संघटीत होणे गरजेचे आहे.जोपर्यंत आपल्यात युनिटी होत नाही तोपर्यंत आपल्या व्होट बँकचा फारसा लाभ घेता येणार नाही.आपण संघटीत झालो तर भरपूर विकास निधी मिळविणे शक्य होणार आहे.

यावेळी माजी मंत्री श्रीमती पाटील, शिंदे सर, शशिकला मोरे,वैजयंती पाटील, प्रसाद खाडे यांनी आपले विचार मांडले.

मेळाव्याला कर्नाटक मराठा निगमचे जी. एच. मरीयोजीराव, शशिराजे पाटील, शिवाजीराव कळवीकट्टेकर, माजी नगराध्यक्षा सीमा हतनुरी, अमर नलवडे, श्रीकांत हतनुरी, अप्पा मोरे, सुभाष कासारकर, दयानंद पाटील, सुधाकर ओतारी, राजेश गायकवाड, राजू बांबरे, दिपक भिसे, पुष्पराज माने, ए.पी चौगुले, शिवराम शेलार, प्रकाश पाटील, आरती नलवडे, प्रमोद जाधव, प्रमोद भोसले, प्रशांत कदम यांच्यासह अनेक मान्यवर समाज बांधव महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निपाणीत खरी कॉर्नरवरील उड्डाणपूल वाहतूकीसाठी बंद

■ निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)–

**निपाणी शहरातील पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील महात्मा गांधी हॉस्पीटल, खरी कॉर्नर,शिरगुप्पी रोडपर्यंत महामार्गाचे काम सुरू असल्याने खरी कॉर्नर उड्डानपूलाखालून सुरू असलेली वाहतूक रविवारी २८ रोजी बंद करण्यात आली.**



**निपाणी: वाहतूकीसाठी बंद केलेला खरी कॉर्नर उड्डानपूल.**

त्यामुळे रस्ता ओलांडताना वाहनधारकांना महात्मा गांधी हॉस्पिटल व मुरगुड रोड उड्डाणपूलाखालून प्रवास करावा लागत असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.तसेच या परिसरात काही काळ वाहतूक कोंडी झाली होती.त्यामुळे वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या.गेल्या अनेक दिवसापासून पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग सहापदरीकरणाचे काम वेगाने सुरू आहे.या कामासाठी रस्त्याकडील असणारी अनेक अतिक्रमणे हटविण्यात आली आहेत. खरी कॉर्नर येथे दुचाकी व लहान चारचाकी वाहने जाण्यासाठी उड्डाणपूल कार्यरत आहे.या उड्डानपूलाखालून वाहने ये-जा करतात.महामार्ग कामामुळे हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.त्यामुळे वाहतूक महात्मा गांधी हॉस्पिटल समोरून व मुरगुड रोड उड्डाणपुलाखालून वळविण्यात आली आहे.त्यामुळे एक किलोमीटर इतक्या अंतरावरून नागरिकांना फेरा मारावा लागत आहे.

# सांगलीत संशयितरित्या फिरणाऱ्या इसमास अटक

■ सांगली, ता.२८ (प्रतिनिधी)–

**शहरातील ट्रक अड्डा परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास संशयितरित्या वावरणाऱ्या एका मजूराला पोलिसांनी ताब्यात घेतले.**

अबधराज गणपत कोल (वय ४६, रा. मंगळवार बाजार, नेहरुनगर, सांगली. मूळ गाव : मटहेना पोस्ट, मोंद, ता. सोहावल, जि. सतना, राज्य - मध्यप्रदेश.) असे संशयिताचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस कर्मचारी कपील साळुंखे यांनी संजयनगर पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली आहे. पोलीस पथक गस्तीवर असताना शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास जवाहर हौसिंग सोसायटी परिसरात असणाऱ्या ट्रक अड्डा येथे एकजण अंधाराचा फायदा घेवून लपून बसलेला असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी त्यास ताब्यात घेवून चौकशी केली असता त्याने आपण मजुरीचे काम करीत असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्यास ताब्यात घेवून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# देशाला आज काँग्रेस विचाराची गरज-सपकाळ

मुंबई,ता.२८–

**देशात आज जात, धर्म, भाषा व पंथ यावरून समाजा समाजात विभाजन केले जात आहे. सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम सत्ताधारी भाजपा सरकार करत आहे. देशासमोर आज मोठे संकट उभे ठाकले असून या परिस्थितीत देशाला तारणारा एकच विचार असून तो काँग्रेसचा विचार, त्याची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त पक्ष कार्यालय टिळक भवन येथे झालेल्या कार्यक्रर्मात ते बोलत होते. यावेळी सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ॲड. गणेश पाटील, राजन भोसले, सरचिटणीस संदेश कोंडविलकर, श्रीरंग बरगे, जोजो थॉमस यांच्यासह सेवादल व काँग्रेसचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, १५ ऑगस्ट १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले पण व्यवस्था परिवर्तनाची लढाई अद्याप सुरुच आहे. राजसत्ता व धर्मसत्ता मूठभर लोकांच्याच हातात असावी हा भाजपा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विचार असून हा देश सर्वांचा आहे. सत्ता, संपत्तीवर सर्वांचा अधिकार आहे, हा काँग्रेस पक्षाचा विचार आहे. काँग्रेसचा विचार संविधानाचा विचार आहे. आपला विचार अध्यात्मिक आहे, जगाच्या कल्याणाचा विचार आहे. तर भाजपाच्या विचारात स्त्री-पुरुष समानता नाही, महिलांना दुय्यम स्थान आहे, स्पृश्य-अस्पृश्यतेचा विचार आहे, या विचाराविरोधात काँग्रेसचा विचार आहे. आपल्या विचाराला त्याग व बलिदानाची परंपरा आहे आणि आपण काँग्रेसचे कार्यकर्ते आहोत याचा अभिमान बाळगा असे सपकाळ म्हणाले.

सपकाळ पुढे म्हणाले की, नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेस पक्षाला ओजस्वी यश मिळाले आहे. सत्ताधारी पक्षाकडे प्रचंड पैसा, प्रशासन, निवडणूक आयोगाची मदत व दडपशाही होती पण त्यासमोर काँग्रेसचा कार्यकर्ता झुकला नाही, दबला नाही तर ताठ मानेने उभा राहिला, हाच बाणा कायम ठेवा. 'लढेंगे और जितेंगे', असा निर्धार काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला.

# कोयता घेवून फिरणाऱ्यास अटक

■ सांगली,ता.२८(प्रतिनिधी)–

शहरातील देवकुळे रुग्णालयासमोर शुक्रवारी रात्री ११ च्या सुमारास कोयता घेवून फिरणाऱ्या युवकास पोलिसांनी ताब्यात घेतले. रोहन चंद्रकांत गायकवाड (वय २२, रा. यश मंगल कार्यालयाच्या पाठीमागे, संजयनगर, सांगली) असे संशयिताचे नाव आहे. याप्रकरणी संजयनगर पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविण्यात आली आहे. शुक्रवारी रात्रीच्या सुमारास संशयित रोहन गायकवाड हा कोयता घेवून फिरत असल्याचे गस्तीवर असणाऱ्या पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी रोहन यास ताब्यात घेवून त्याच्याकडून कोयता हस्तगत केला. याबाबत पोलीस कर्मचारी सुशांत लोंढे यांनी फिर्याद दिली आहे.

# 'शक्तीपीठ' रद्दसाठी जाधव यांच्या विरोधात रस्त्यावर उतरू-कॉ.मोरे

■ गारगोटी,ता.२८ (प्रतिनिधी)–

**सवंग लोकप्रियत्ता आणि राजकीय महत्वकांक्षेपोटी दौलतराव जाधव यांनी शक्तिपीठ महामार्ग जुन्या आलायमेन्टनुसार करावा अशी पुन्हा एकदा मागणी करत आहेत. पुढे जाऊन ते असेही म्हणतात कि राजकीय दबावाखाली राहून निर्णय बदलू नये असा सल्ला खुद्द मुख्यमंत्री यांनाच देत आहेत. यावरून प्रा.जाधव यांची अपेक्षा काय असु शकते याचा अदांज येतो.**

काही वैयक्तीत स्वार्थ डोळ्यासमोर ठेवून प्रा.जाधव काम करत असतील तर पुन्हा एकदा संविधानिक आंदोलनाची भूमिका घेऊन आम्ही रस्त्यावर उतरू असे मत शक्तिपीठ मार्ग विरोधी संघर्ष समितीचे समन्वयक कॉ. सम्राट मोरे यांनी व्यक्त केले.गोकुळ दूध संघांचे माजी संचालक दौलतराव जाधव यांनी शक्तिपीठ महामार्ग जुन्या रचनेनुसारच करावा अशी मागणी नुकतीच शासनाकडे केली आहे, त्या विरोधात कॉ. मोरे बोलत होते.

गेली दोन वर्ष कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकरी आपली जमीन वाचवणेसाठी लोकशाही मार्गाने आंदोलने करत आहेत.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री जिल्ह्यातील आमदार, खासदार व मंत्री यांना भेटून वेळोवेळी शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा यासाठी मोर्चे काढून निवेदने दिली आहेत.अगदी मुंबई आझाद मैदान येथे ही अधिवेशन काळात आंदोलन केले आहे. हा महामार्ग झाला तर कोल्हापूर जिल्ह्यात कोणती संकटे येणार आहेत हे सर्व पटवून दिल्या नंतर मंत्री मुश्रीफ आणि आबिटकर यांनी ही शक्तिपीठ महामार्ग विरोधाची भूमिका घेऊन शेतकरी वर्गाची पाठराखण केली आहे.ह्या सर्व परिस्थितीचा अभ्यास केल्यानंतर मा.मुख्यमंत्री यांनी विचार पूर्वक निर्णय घेतला असताना प्रा. जाधव हा मुद्दा पुन्हा उकरून काढून काय साध्य करू इच्छित आहेत असा आम्हाला प्रश्न पडला आहे. त्यांची काही राजकीय महत्वाकांक्षा असेल तर त्यांनी तसे काम करावे आम्ही त्यांना मदत करू पण स्वतःच्या मालकीची नापिक जमिनीचा मोबदला मिळवणेसाठी शेतकरी वर्गाच्या चुलीत पाणी ओतू नये असे आमचे आवाहन त्यांना आहे.आणि जर ते आपली भूमिका घेऊन पुढे येत असतील तर पर्यायाने आंदोलनाची भूमिका घेऊन रस्त्यावर उतरावे लागेल याची नोंद घ्यावी.अजून आम्ही आंदोलनाचे हत्यार म्यान केलेले नाही हे लक्षात ठेवावे.असेही मोरे म्हणाले.

## जाहीर नोटीस

**मौजे कबनुर** येथील **गट नं. ६७१ मधील प्लॉट नं. १ ते ३३ पैकी प्लॉट नं. १,१७,३२ व ३३ हे प्लॉट वजा जाता राहणारे क्षेत्र २६५०.५९ चौ. मीटरची** खुली जागा मिळकत. यासी चतु: सिमा- **पुर्वेस** -रस्ता व रमेश केटकाळे यांची मिळकत, **पश्चिमेस** - रावसाहेब केटकाळे यांची मिळकत, **दक्षिणेस**- अजित केटकाळे व बेसुरे यांची मिळकत, **उत्तरेस** - सनत व भरत केटकाळे यांची मिळकत. सदर मिळकत ही मूळची १. दिव्याराणी वैभव गणाचारी २. पुनम ओंकार पुजारी ३. प्रवीण महादेव लवटे ४. मनोहर दत्तात्रय कुंभोजे ५. श्रीनिवास बाळासो वाघमोडे ६. तात्यासाहेब दत्तात्रय कुंभोजे ७. स्वप्नील कल्लेश्वर वाघमोडे ८. ओंकार रमेश पुजारी रा. कबनूर यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांच्याशी तोंडी करार केलेला आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही बोजा, हक्क, दावा, पोटगी, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता. २७/१२/२०२५

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**
**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ, सांगली रोड, इचलकरंजी**
**मोबा. ९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन - जि. व तु. कोल्हापूर पोट तुकडी ता. शिरोळ पैकी यड्राव येथील क.ग.नं.७५/२ पैकी क्षेत्र ४१.३४ आर म्हणजेच ४४११६ चौ. फुटाची खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस - सरकारी रस्ता, पश्चिमेस - गट नं.७०, ७१, ७३ व ५४ ची मिळकत, दक्षिणेस-गट नं. ६३ ची मिळकत व उत्तरेस- गट नं.७६ ची मिळकत येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत, त्यातील तदंगभूत वस्तुसह व सर्व प्रकारचे हक्कांसह सर्व.

२) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही श्री. अभिजीत राजेंद्र जेधे रा. सोलापूर यांच्या कब्जा वहिवाटीची असून सदरची मिळकत निर्वेध, निष्कर्जी व निर्जोखमी असलेचे सांगून खरेदी देण्याचे ठरवून संचकार पावतीने संचकार रक्कम स्विकारली आहे. सबब सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध तारण, गहाण, दान, बोजा, हिस्सावगैरे हितसंबंध असलेस तो त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांचे आत खालील पत्यावर सर्व अस्सल कागदपत्रासह लेखी कळवावा. मुदतीनंतर कोणाचीही, कसलीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस. ता.२७/१२/२०२५.

**ॲड.संजय र. गजबी**

**ऑफिस - ७/७१, लक्ष्मी मार्केट,निवास - कमलकुंज, ८/१५२०/१/१, मधुबन हौ. सोसा. जवळ, इचलकरंजी.**
**मो. ९४२२०५१९८३.**

# नेत्यांच्या नातेवाईकांनाच उमेदवारी मिळणार?

## निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता; उमेदवारीची माळ कोणाच्या गळ्यात पडणार

कोल्हापूर,ता.२८(एस.आर.माने)

**आतापर्यंत घराणेशाहीचा मुद्दा प्रामुख्याने काँग्रेसपुरताच मर्यादित असल्याचे चित्र होते; मात्र बदलत्या राजकीय वास्तवात आता जवळपास सर्वच पक्षांमध्ये घराणेशाहीचे प्रमाण वाढत असल्याचे स्पष्ट होत आहे. येणाऱ्या कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या तिकीट वाटपाच्या चर्चांमुळे हा विषय पुन्हा ऐरणीवर आला आहे. विविध पक्षांमध्ये नेत्यांच्या कुटुंबातील सदस्यांना किंवा जवळच्या नातेवाईकांना उमेदवारी देण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

महापालिकेतील अनेक विद्यमान तसेच माजी नगरसेवकांना राखीव प्रभाग, युतीआघाडीचे समीकरण किंवा पक्षांतर्गत निर्णयांमुळे स्वतः निवडणूक लढवणे शक्य नसल्याने त्यांनी पत्नी, मुलगा, मुलगी किंवा



इतर नातेवाईकांना उमेदवारी मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू केल्याची चर्चा आहे. त्यामुळे पक्षासाठी अनेक वर्षे निष्ठेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर अन्याय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

विशेषतः 'निवडून येण्याची क्षमता' हा निकष तिकीट वाटपात अग्रक्रमावर ठेवल्याने निष्ठावंत कार्यकर्ते मागे पडत असल्याची भावना वाढत आहे. काही ठिकाणी तर एका घरातील दोन सदस्यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या परिस्थितीमुळे सर्वसामान्य कार्यकर्ते संधीपासून वंचित राहत असून, उमेदवारी जाहीर झाल्यानंतर तीव्र नाराजी व्यक्त होण्याची शक्यता शहरात चर्चिली जात आहे.

दरम्यान, सोशल मीडियावर विविध नेत्यांच्या नातेवाईकांची नावे चर्चेत आली आहेत. राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष आमदार राजेश क्षीरसागर यांचे पुत्र ऋतुराज क्षीरसागर आणि माजी आमदार जयश्री जाधव यांचे पुत्र सत्यजित जाधव यांच्या नावांचीही चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.यंदाची महापालिका निवडणूक प्रभागनिहाय पद्धतीने होत असल्याने 'जिंकण्याची क्षमता' हाच प्रमुख निकष ठरला आहे. सत्ता मिळवण्याच्या दृष्टीने पक्षांनी हा निकष अग्रक्रमावर ठेवल्याने अनेक अनुभवी व चारपाच वेळा निवडून आलेले माजी नगरसेवक अडचणीत आले आहेत. स्वतःचा हक्काचा प्रभाग राखीव ठरणे किंवा युतीमुळे उमेदवारी न मिळणे, या पार्श्वभूमीवर काही नेते व माजी नगरसेवकांनी आपल्या नातेवाईकांसाठी प्रयत्न वाढवले आहेत.

अनेक माजी नगरसेवकांनी खाजगीत बोलताना पक्ष आणि नेत्यांचा आदेश मानावा लागत असल्याची भावना व्यक्त केली आहे. मात्र निष्ठावंत कार्यकर्त्यांची नाराजी पक्षांना परवडणारी ठरणार नाही, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. उमेदवारीची अंतिम माळ कोणाच्या गळ्यात पडते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रेशन दुकानदारांना अल्प व्याजदरात पतपुरवठा करु

### विठ्ठलराव भोसले

इचलकरंजी,ता.२८-

**राज्यातील रेशन धान्य दुकानदारांच्या उत्पन्न वाढीसाठी महाराष्ट्र स्टेट कंज्युमर फेडरेशन मदत केली जाणार आहे. याचबरोबर राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून रेशन धान्य दुकानदारांना अल्प व्याजदरात पतपुरवठा केली जाईल, अशी घोषणा फेडरेशनचे अध्यक्ष विठ्ठलराव भोसले यांनी केली. संस्था प्रतिनिधींच्या बैठकीत ते बोलत होते.**

महाराष्ट्र स्टेट कंज्युमर फेडरेशनचे अध्यक्ष विठ्ठलराव भोसले कोल्हापूर दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील रेशन धान्य दुकानदार संघटनांसह



विठ्ठलराव भोसले यांच्या सत्कारप्रसंगी डॉ.रवींद्र मोरे व इतर.

अन्य घटकांची बैठक घेवून, फेडरेशनच्यावतीने राबवण्यात येत असलेल्या योजनांची तसेच भविष्यकालीन उपक्रमांची माहिती दिली.यामध्ये बोलताना भोसले यांनी, राज्यातील रेशन धान्य दुकानदारांच्या उत्पन्न वाढीसाठी महाराष्ट्र स्टेट कंज्युमर फेडरेशन मदत करेल. तसेच राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून रेशन धान्य दुकानदारांना अल्प व्याजदरात पतपुरवठा केला जाईल, असे जाहीर केले.राज्यातील महापालिका निवडणुकांची आचारसंहिता संपल्यानंतर पश्चिम महाराष्ट्र विभागीय मेळावा घेवून, विविध प्रश्न मार्गी लावले जातील, असेही भोसले यांनी स्पष्ट केले. यावेळी रेशन महासंघाचे जिल्हाध्यक्ष डॉ.रविंद्र मोरे, जनता बाजारचे चेअरमन नाना उलपे, रमाई सूतगिरणीचे अनिल कवाळे, आकाराम पाटील, प्रशांत कुलकर्णी, गजानन हवालदार, दिपक शिराळे, मदन चोडणकर, दिपक मिरजे, लक्ष्मण शिंदे, संभाजी पिष्ठे, रमेश पांढरे, किशोर खेडेकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# अकोळात कामगारांना साहित्याचे वितरण

अकोळ,ता.२८(वार्ताहर)-

**माजी खास.अण्णासाहेब जोल्ले, आम.शशिकला जोल्ले यांच्या प्रयत्नाने मंजूर करण्यात आलेल्या येथील २९ उज्ज्वला गॅस धारकांना तर १९ बांधकाम गवंडी कामगारांना अत्यावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. येथील शादी महल सभाभवनात साहित्य वितरण करण्यात आले. स्वागत दीपक जाधव यांनी केले.**

प्रास्ताविकात हालशुगरचे संचालक सुहास गुगे यांनी मतदार संघाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असणाऱ्या जोल्ले दाम्पत्यांनी गरजू लाभार्थ्यांना यापूर्वीही योजनेचा लाभ मिळवून दिला आहे तर यावेळी २९ गॅसधारकांना तर



अकोळ येथे गॅस धारकांना गॅस किट वितरणप्रसंगी रावसाहेब फराळे, निरंजन कमते, विकास संकपाळ व इतर मान्यवर.

१९ गवंडी बांधकाम कामगारांना योजनेचा लाभ मिळाला आहे. यापुढील काळातही गरजू व्यक्तींना या योजनेचा त्यांच्याकडून पाठपुरावा होणार असल्याचे सांगितले.

यावेळी रावसाहेब फराळे, निरंजन कमते, प्रकाश आवटे, विकास संकपाळ, संजय पिसाळ, संदीप सदावर्ते, बसवराज पाटील, राजू भोसले, रमेश मेस्त्री, राघू खिलारे, संतोष घवे, शैलेंद्र करडे, सचिन कोरे, बाळासो जाधव, रविंद्र सडोलकर आदींसह भाजपा कार्यकर्ते व लाभार्थी उपस्थित होते. आभार अॅड.विकास संपकाळ यांनी मानले.

# जल उपसा सिंचन योजनेतून खिंडी व्हरवडे हिरवेगार करणार

### नाम.प्रकाश आबिटकर

शिरगाव,ता.२८(प्रतिनिधी)-

**उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून खिंडी व्हरवडे गाव हिरवेगार करून विकासाचे स्वप्न साकार करूया. या योजनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांना बारमाही सिंचनाची सुविधा उपलब्ध होणार असून शेती उत्पादनात लक्षणीय वाढ होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तसेच कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.**

खिंडी व्हरवडे (ता. राधानगरी) येथील कोरडवाहू शिवार सिंचनाखाली आणून शेतीला



खिंडी व्हरवडे येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना नाम.प्रकाश आबिटकर व्यासपीठावर उपस्थित प्रमुख मान्यवर.

बळकटी देण्याच्या उद्देशाने जलसंपदा व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या शंभर टक्के शासन अनुदानित जल उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षण शुभारंभ पालक मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते झाला, याप्रसंगी ते बोलत होते.

प्रास्ताविक आर.डी.पाटील यांनी केले. नाम. आबिटकर पुढे म्हणाले, खिंडी व्हरवडे गाव हे आजवर पावसावर अवलंबून आहे. या उपसा सिंचन योजनेमुळे कोरडवाहू शेती सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीसोबतच परिसराचा सर्वांगीण विकास साधला जाणार आहे. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती यावेळी जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंता स्मिता माने यांनी दिली.

यावेळी तहसीलदार अनिता देशमुख, कार्यकारी उपअभियंता प्रविण पारकर, सरपंच सीमा शेटके, दिग्विजय पाटील, दीपक शेट्टी, संभाजी आरडे, विलास डवर, किरण पारकर, मंगेश चौगले, सचिन पालकर, युवराज पाटील, तानाजी पाटील, मनोहर कांबळे, संदीप खांडेकर, एस. के. पाटील, अमित पाटील, राजाराम सावंत, हर्षवर्धन पाटील, अमृत शेटके, अवी कांबळे, विश्वजीत सावंत यांच्यासह जलसंधारण विभागाचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते. आभार अशोक चव्हाण यांनी मानले.


दि.२९ डिसेंबर २०२५ ते दि.१ जानेवारी२०२६
श्रीमंत घोरपडे नाट्यगृह, इचलकरंजी.
मनोरंजन मंडळ । श्री दगडूलाल मर्दा फौंडेशन
रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल
इचलकरंजी, कोल्हापूर, सांगली, सातारा, मुंबई, ठाणे, पुणे, रत्नागिरी, सोलापूर इ. भागातील स्पर्धक कलाकारांचा उत्स्फूर्त नाट्य आविष्कार पाहण्याची संधी!


राज्यस्तरीय मराठी एकांकिका
दररोज दुपारी १ ते रात्री ११ पर्यंत - प्रवेश विनामूल्य


## पीआरएसआय कार्यकारिणीवर विवेक सिद्ध यांची निवड

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)



**देशातील जनसंपर्क क्षेत्रातील अग्रगण्य संस्था पब्लिक रिलेशन सोसायटी ऑफ इंडिया (पीआरएसआय)च्या कोल्हापूर चॅप्टरची स्थापना व नवीन कार्यकारिणीची घोषणा राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.अजित पाठक यांनी केली. या कार्यकारिणीवर विवेक सिद्ध यांची निवड करण्यात आली आहे.**

पीआरएसआय ही संस्था १९६६ पासून देशपातळीवर कार्यरत असून, जनसंपर्क क्षेत्राचा विकास, व्यावसायिक मूल्यांची जोपासना, जनजागृती, ज्ञान व अनुभवाचे आदान-प्रदान, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, उत्कृष्ट कार्याचा गौरव तसेच संशोधन व प्रकाशन यांसाठी कार्य करते.नव्या कार्यकारिणीत अध्यक्षपदी डॉ. निशा मुडे पवार, उपाध्यक्षपदी डॉ.जगन्नाथ पाटील तर सचिवपदी विश्वजीत भोसले यांची निवड झाली आहे. सदस्यांमध्ये डॉ.प्रताप पाटील,सचिन अडसूळ, दशरथ पारेकर,राजेंद्रकुमार चौगुले व डॉ.अंबादास भास्के यांचा समावेश आहे. 'ना नफा, ना तोटा' तत्त्वावर चालणाऱ्या या संस्थेमुळे जनसंपर्क व पत्रकारिता क्षेत्रातील व्यावसायिक, प्राध्यापक, पत्रकार आणि विद्यार्थ्यांना नवी संधी व मार्गदर्शन मिळणार आहे.

## सुरुपलीत तीन जानेवारीला मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

मुरगूड,ता.२८(प्रतिनिधी)-

**सुरुपली (ता.कागल) येथे शनिवारी ता.३ रोजी मोफत आरोग्य शिबिर होणार आहे. राजे विक्रमसिंह घाटगे यांच्या ७७ व्या जयंतीनिमित्त प्राथमिक शाळेत या शिबिराचे आयोजन केले आहे.**

शाहू ग्रुपचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे, राजे बँकेचे अध्यक्षा नवोदितादेवी घाटगे यांच्या मार्गदर्शनाखाली राजे फाउंडेशन व राजे बँकेच्यावतीने या शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिरात मोफत डोळे, हृदयविकार,अस्थिविकार,जनरल व मूत्रविकार तपासणी करण्यात येणार आहे.या शिबिरामध्ये अथायु हॉस्पिटल उजळाईवाडी नंदादीप आय केअर हॉस्पिटल कोल्हापूर, मोरया हॉस्पिटल कोल्हापूर, प्राथमिक आरोग्य केंद्र नानीबाई चिखली, प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळगाव , संकल्पसिद्धी मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल कागल यांचे तज्ज्ञ तपासणी करणार आहेत. सकाळी साडेदहा ते दुपारी तीन वाजेपर्यंत हे शिबिर होईल. या आरोग्य शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## रिव्हर्स तवेरा शर्यतीत चेतन देवर्डे प्रथम

अकोळ,ता.२८(वार्ताहर)-

**येथील श्री सद्गुरू पंत महाराज बाळेकुंद्रीकर यांच्या यात्रेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रिव्हर्स तवेरा शर्यतीत चेतन देवर्डे अकोळ यांनी ९.६० सेकंदात अंतर पार करून प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकावले.**

द्वितीय क्रमांकाचे बक्षीस चेतन स्वामी अकोळ यांनी १२.१३ सेकंदात अंतर पार करून तर तृतीय क्रमांकाचे बक्षीस रवींद्र पुंडे अकोळ यांनी १४.४३ सेकंदात पूर्ण करून पटकावले.येथील मराठी कन्नड प्राथमिक शाळेच्या पटांगणात आयोजित करण्यात आलेल्या शर्यतीचे उद्घाटन इंद्रजीत सोळांकुरे, युवराज पाटील,चेतन स्वामी, तुषार पाटील, बाहुबली मगदूम आदींच्या हस्ते करण्यात आले.

# प्रजासत्ताक दिन परेड शिबिरासाठी अकरा विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर,ता.२८(प्रतिनिधी)

**एनसीसी ग्रुप मुख्यालय, कोल्हापूरच्या अंतर्गत ११ विद्यार्थ्यांची प्रजासत्ताक दिन परेड (२०२६) शिबिरासाठी निवड झाली आहे. यामध्ये ५ विद्यार्थी तर ६ विद्यार्थिनींचा समावेश आहे. या तुकडीत राज्यभरातून १२७ एनसीसी विद्यार्थी सहभागी झाले आहेत. कोल्हापूर मुख्यालयासाठी हा अत्यंत अभिमान व गौरवास्पद क्षण आहे.**

निवड झालेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे -सीनियर अंडर ऑफिसर हिमेश राठोड,रिद्धी पदमुखे,सर्जंट राधिका क्षत्रिय (डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी), मधुरा बाटे (न्यू कॉलेज कोल्हापूर), सीनि. अंडर ऑफिसर ओंकार पवार (वाय.सी.कॉलेज ऑफ सायन्स, कराड), प्रसाद वांगेकर (गव्हर्मेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड), प्रमोद चव्हाण, सुष्मिता राठोड, आर.पी.गोगटे जोगळेकर कॉलेज रत्नागिरी ज्युनि.अंडर ऑफिसर तनिष्का चव्हाण (सी.एस.कॉलेज सातारा), ज्युनि.अंडर ऑफिसर निशांत चव्हाण (विलिंग्डन कॉलेज सांगली), ज्युनि.अंडर ऑफिसर सृष्टी पाठक(महावीर कॉलेज कोल्हापूर) यांची निवड झाली आहे. प्रजासत्ताक दिन परेड शिबिर ता.२९ डिसेंबर ते ता.२९ जानेवारी २०२६ या कालावधीत नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल ब्रिगेडियर आर.के. पैठणकर, ग्रुप कमांडर, एनसीसी ग्रुप मुख्यालय कोल्हापूर यांनी निवड झालेल्या कॅडेट्स व त्यांच्या प्रशिक्षकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.


श्रीहरी
शुक्रवार, ता.२६/१२/२०२५ पासून दुपारी १ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
महबूबा
प्रौढांसाठी
सायं. ४ व ७ वा.
A तडपती पडोसन A

श्रीदत्त
शुक्रवार, ता. २६ पासून
रोज ४ खेळ १२*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
लेसन्स ऑफ लस्ट
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 गर्दीचा ४ था आठवडा
अॅडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरु राहील
ऑनलाईन बुकींग book my show
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज 3 खेळ 12 • 3.30 व रात्री 9.



५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
भाग्यरेखा DOLBY DIGITAL
वाढत्या गर्दीचा ४ था आठवडा
नवीन डॉल्बी डिजिटल साऊंड सिस्टीम
रोज ३ खेळ *११.४५ *३.१५ *६-३० वा.



कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत शुक्रवार ता.२६ पा
१२,३,६,९ वा
पहिल्या भागापेक्षाही जबरदस्त दुसरा भाग फुल्ल अॅक्शन चित्र



गुरु
शुक्रवार ता.२६ पासून
ऑनलाईन बुकींग book my show
रोज ३ खेळ १२ * ३.४५ * ९ वा.
यापूर्वीच्या सर्व चित्रपटांचे रेकॉर्ड ब्रेक केलेला महाविक्रमी चित्रपट.



RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 book my show


" धुरंधर " ( हिंदी )
10:00 AM, 12:30 PM
02:00 PM, 04:15 PM
06:30 PM, 09:45 PM
10:30 PM
" तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी " ( हिंदी )
08:00 PM
"अवतार: फायर अँड अॅश " 3D (हिंदी )
10:45 AM, 02:30 PM
06:00 PM, 10:15 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on book my show
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11


अवतार ३ (3D) (HIN) (U/A)
11.15am, 05.00, 10.30pm
धुरंधर (HIN) (A)
10.45am, 02.30, 05.15, 06.30, 09.00, 10.30pm
तू मेरी मैं तेरा मैं तेरा तू मेरी (HIN) (U/A)
02.30pm
आशा (MAR) (U/A)
02.45pm
अॅनाकोंडा (HIN) (U/A)
08.30pm
कोणताही सिनेमा पहा 100 रु. पासून पुढे

# 'पंचायतराज अभियान'चे मॉडेल ठरतेय लक्षवेधी

## 'यशवंत' कृषी प्रदर्शनात जि.प.कडून मांडणी

कराड,ता.२८(प्रतिनिधी)-

**येथे बाजार समिती, जिल्हा परिषद व शासनाच्या कृषी विभागाच्या माध्यमातून सुरू असलेल्या यशवंतराव चव्हाण कृषी, औद्योगिक व पशुपक्षी प्रदर्शनात सातारा जिल्हा परिषद कृषी विभागाकडून 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान'चे सविस्तर लाईव्ह मॉडेल उभारण्यात आले आहे.**

या मॉडेलमधून शासनाच्या महत्त्वाकांक्षी ग्रामविकास उपक्रमांची सजीव व प्रत्यक्ष माहिती मिळत असल्याने शेतकरी,ग्रामस्थ व नागरिकांकडून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.



**कराडः सातारा जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने साकारलेले मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचे लक्षवेधी मॉडेल.**

या लाईव्ह मॉडेलमध्ये ग्रामपंचायत भवन, शेतकरी उत्पादक कंपन्या,बाजार गाळे, नाविन्यपूर्ण उपक्रम, बायोगॅस प्रकल्प, जलशुद्धीकरण व पाणीपुरवठा योजना,मुक्त संचार गोठे, बिहार पॅटर्न वृक्ष लागवड, बंधारे,ठिबक सिंचन, गटशेती, पाणंद रस्ते आदी ग्रामविकासाशी संबंधित विविध योजनांची प्रतिकृतीद्वारे प्रभावी मांडणी करण्यात आली आहे. ग्रामपातळीवरील विकास योजनांचा परस्पर संबंध,त्यातून होणारे सकारात्मक परिणाम व लोकसहभागातून घडणारा सर्वांगीण विकास या मॉडिलमधून स्पष्टपणे अधोरेखित करण्यात आला आहे.

या लाईव्ह मॉडेलच्या उभारणीसाठी सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अतिक्ति मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गावडे,प्रकल्प संचालक विश्वास सिद, कृषी विकास अधिकारी गजानन ननावरे व उपमुख्य कार्यकारी अधिकारी देसाई यांचे मार्गदर्शन लाभले आहे.तसेच कराड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रताप पाटील,सहाय्यक गटविकास अधिकारी प्रसाद खेडेकर,कृषी अधिकारी पवन गायकवाड, संतोष कदम तसेच कृषी विस्तार अधिकारी किरवे यांच्यासह जिल्ह्यातील अन्य कृषी अधिकारी व विस्तार अधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले आहे.

### जिल्ह्यातील शेती उत्पादनांनी वेधले लक्ष

जिल्हा परिषद कृषी विभागाच्या स्टॉलवर सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी घेतलेल्या विविध नाविन्यपूर्ण फळे,फुले व भाजीपाल्यांचे नमुने मांडण्यात आले असून ते विशेष आकर्षण ठरत आहेत. यामध्ये भरतगावचा फणस, गोंदीची चेरी टोमॅटो, चिमणगावचा टरबूज, पोतलेची केळी, पेडगावचा निशिगंध व पेरू,पाडळीचा फणस व लक्ष्मणफळ, कासवंडची रासबेरी, करवडीची झुकेनी तसेच रिसवडचा ड्रॅगन फ्रुट आदी उत्पादनांचा समावेश आहे.या स्टॉलमधून स्थानिक शेतकरी कोणत्या नाविन्यपूर्ण पद्धतीने शेती करून समृद्धीकडे वाटचाल करत आहेत,याची थेट माहिती मिळत आहे.

# परिवर्तनशील जीवनाचे मार्गदर्शक : बाबुराव सावंत



**१६ डिसेंबर २०२५ म्हणजे इचलकरंजीच्या औद्योगिक परिवर्तनातील प्रगतीचे पुढचे पाऊल टाकणारे जी महत्वाची घराणी आहेत त्यापैकी जिद्दीने साम्राज्य उभा केलेल्या आमच्या बापूंच्या निर्वाणाचा दिवस होय. बापू म्हणजे बाबुराव तुकाराम सावंत.सगळी इचलकरंजी त्यांना बापू या नावाने ओळखत होती. स्वभावाने शांत, वृत्तीने दिलदार, औदार्याने दानशूर आणि शेवटपर्यंत कुटूंबाला आणि सहकाऱ्यांना नवी दिशा देणारे ज्येष्ठ उद्योगपती म्हणजे बाबुराव तुकाराम सावंत होय.**

१९६० नंतर बापू इचलकरंजीत आले. बापू आले ते वयाच्या १५ व्या वर्षी. त्यांचे मामा म्हणजे हिंदूराव शेळके यांचे कुटूंबिय. या शहरात शेळके कुटूंबिय हे सर्वांना मदत करणारे एकमेव ठिकाण म्हटले पाहिजे. आपल्या भाच्याला त्यांनी या शहरात शिकवण्यासाठी म्हणून आणले आणि बापूंनी हातमागाचे ट्रेनिंग सुरु केले. अत्यंत लहान वयात सगळ्या हातमागाचे शिक्षण घेतले, स्वत: हातमागावर काम केले आणि या प्रवासात योगायोगाने ते काम करत असतानाच महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांची आणि त्यांची मुलाखत झाली आणि त्या मुलाखतीत चव्हाण साहेबांनी बापूंच्या पाठीवर हात मारुन शाब्बासकी दिली आणि प्रगतीचा आशिर्वाद दिला. बापू सावंत हे हातमाग करत असतानाच मागावरच्या साडीला बंदी आली, अत्यंत कष्टमय जीवन, खिशात पैसा नाही, मामांनी जीवनाची दिशा दिली,तो मार्ग अवलंबत काटकसरीने जीवन केले. हातमागावर ट्रेनिंग पूर्ण झाल्यावर साडीचा व्यवसाय करत ब्लाऊज पिस, परकर याची निर्मिती सुरु केली आणि त्यातून सावंत वेर्णेकर कंपनीबरोबर उत्पादनात सहकार्य सुरु केले. जीवनाचा प्रवास मागे न पाहता त्यांनी पुढे चालू ठेवला. संसार पहात पहात, लहान मुलांना मोठे करत करत त्यांनी कर्नाटक आणि संपूर्ण महाराष्ट्र कापड व्यापारात पादाक्रांत केले. कापड कमी पडू लागले, मग स्वत:च खरेदी सुरु केली आणि त्यावर प्रोसेसिंग सुरु केले. येथे नंबर लवकर लागेना, मग आपलीच हँड प्रोसेस काढली. धुलाई सुरु केली, कलरिंग सुरु केले. टेक्स्टाईल प्रोसेसिंगमध्ये त्यांचा प्रवेश झाला आणि त्यातून कापड व्यवसायातील सर्वोच्च स्थान त्यांना मिळू लागले. सावंत प्रोसेस हा आधुनिक औद्योगिक प्रकल्प त्यांनी सुरु केला ज्यावर २०० कामगार आज काम करतात आणि तितके कुटूंब जगवण्याचे काम त्यांनी केले. हे करताना गावाकडच्या कोणत्याही गोष्टीची अपेक्षा केली नाही, त्या ठिकाणी असलेल्या कुटूंबियांना सगळे देवून टाकले आणि सगळ्या पाहूणे मंडळींच्या भावामध्येसुद्धा त्यांची जी काम करणारी मुले आहेत त्यांना येथे कामाची संधी दिली.

मा. निकम हे त्यांचे पाहूणेच, त्यांच्या सहकार्याने पंचवटी टॉकीजची सुरुवात केली, आज गावातील अत्यंत आधुनिक अशी ही टॉकीज आहे. हे सर्व करत असताना राजेश आणि सुदेश या आपल्या दोन्ही मुलांना त्यांनी व्यवसायात पूर्ण ज्ञान देवून तयार केले. ॲटोलूम घातले गेले,इतर निरनिराळे व्यवसाय सुरु केले आणि परिवर्तनशील माणसाला काम करत असताना संकटांना तोंड देत संघर्षाचा सामना करत प्रगती कशी करता येते हे सामान्य माणसांना त्यांनी दाखवून दिले.

मराठी चित्रपट सृष्टीतील चित्र महर्षि दादा कोंडके हे त्यांचे अत्यंत जवळचे मित्र. कोल्हापुरात आल्यानंतर ते सावंत बापूंच्या बरोबर जेवल्याशिवाय जात नसत. बापूंनी अनेक संस्थांना देणग्या दिल्या. सहकार महर्षि दत्ताजीराव कदम आणि दे.भ. बाबासाहेब खंजिरे, कल्लाप्पाण्णा आवाडे या मंडळींचा विचार घेत त्यांनी आपल्या कुटूंबाचे परिवर्तन केले आणि ते १६ डिसेंबर रोजी ईहलोक सोडून गेले. त्यांचे जीवन हाच त्यांचा संदेश आहे. त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत.

**■शामराव कुलकर्णी**

## कोयना दूध संघाचा उपक्रम कौतुकास्पद-ॲड.पाटील

कराड,ता.२८(प्रतिनिधी)-

**जिल्ह्यात सहकारी तत्त्वावर सुरू असलेल्या एकमेव कोयना दूध संघाने विविध उपक्रम राबवून सर्वसामान्य दूध उत्पादक शेतकऱ्यांचे हित जोपासले आहे. ग्रामीण भागातील सहकारी दूध संस्थांना उपयोगी ठरेल अशी दिनदर्शिका प्रकाशित करून एक चांगला उपक्रम राबवला आहे, असे प्रतिपादन रयत कारखान्याचे चेअरमन ॲड.उदयसिंह पाटील यांनी केले.**

कराड येथे कोयना दिनदर्शिकेचे प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संघाचे अध्यक्ष लक्ष्मण देसाई, उपाध्यक्ष शिवाजी जाधव, प्रा.धनाजी काटकर, सचिन पाटील, कोयना दूध संघाचे संचालक संपतराव इंगवले, सुदाम चव्हाण, शिवाजी गावडे, जनरल मॅनेजर नितीन बनगर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# कोकरुडमध्ये अप्पर तहसिल कार्यालयासाठी हालचालींना वेग

शिराळा,ता.२८(प्रतिनिधी)-

**शिराळा तालुक्यातील पश्चिमेकडील दुर्गम भागातील नागरिकांची अनेक वर्षांची प्रतीक्षा आता संपण्याची चिन्हे आहेत. कोकरूड येथे अप्पर तहसीलदार कार्यालय सुरू करण्याच्या हालचालींना वेग आला असून, त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केला आहे. यामुळे कोकरूड आणि चरण मंडळातील ६३ गावांना मोठा दिलासा मिळणार आहे. याबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी चर्चा झाली असून प्रस्ताव ही दिला आहे, अशी माहिती आमदार सत्यजित देशमुख यांनी दिली.**

### वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव सादर

ते म्हणाले,शिराळा तालुका भौगोलिकदृष्ट्या लांब आणि डोंगरी आहे. दुर्गम भागातील नागरिकांना साध्या कामासाठीही ४० ते ५० किलोमीटरचा प्रवास करून शिराळा शहरात यावे लागते. यामुळे वेळ आणि पैसा दोन्हीचा अपव्यय होतो. ही अडचण ओळखून २५ मे रोजी शासनाकडे पत्रव्यवहार करून या कार्यालयाची मागणी केली होती.कोकरूड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची शासकीय जागा या कार्यालयासाठी उपलब्ध आहे. यामध्ये २ महसूल

### अनेक वर्षांची प्रतीक्षा संपण्याची चिन्हे

मंडळे, १६ सजा आणि एकूण ६३ गावे, वाड्या-वस्त्यांचा समावेश असेल. चांदोली धरणाच्या पाण्याखाली गेलेल्या १८ गावांचाही यामध्ये समावेश आहे.कार्यक्षेत्रातील महत्त्वाची गावे कोकरूड मंडल : कोकरुड, बिळाशी, मांगरूळ, खूजगाव, रीळे, येळापूर, मेनी. चरण मंडल : चरण,काळुंद्रे, पनुंब्रे तर्फे शिराळा, आरळा, सोनवडे, मणदूर, पाचगणी, पेटलोंड, निवळे. धरणग्रस्त १८ गावे : पेटलोंड, कोन्होली, सिद्धेश्वर, आळोली, नांदोली, देव्हारे, आंबोली, भोगाव, निवळे, चांदोली खुर्द, चांदोलीबुद्रुक, रुंदिव,जावळी, वेत्ति,झोळंबी,गवे,लोटीव, टाकळे.

**२० पदे प्रस्तावित :**या कार्यालयासाठी तहसीलदार, निवासी नायब तहसीलदार, महसूल नायब तहसीलदार, निवडणूक नायब तहसीलदार, संजय गांधी निराधार योजनेचे नायब तहसीलदार, अव्वल कारकून ३, लिपिक ४, शिपाई ४ आणि वाहनचालक अशी पदे प्रस्तावित आहेत



चरण आणि कोकरूड परिसरातील जनतेला छोट्या कामांसाठी शिराळ्याला यावे लागते, ज्यामुळे त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. यामुळे नागरिकांनी मागणी केली होती. त्यामुळे ही गैरसोय दूर करण्यासाठी आम्ही कोकरूड येथे अप्पर तहसीलदार कार्यालय सुरू करण्याची मागणी केली होती. त्यानुसार शासनस्तरावर सकारात्मक हालचाली सुरू असून लवकरच हे कार्यालय कार्यान्वित होईल. याबाबत मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही अनुमती दर्शवली असून लवकरच हा प्रश्न मार्गी लागेल. **- आमदार सत्यजित देशमुख**

# शिराळ्यात उपनगराध्यक्ष पदासाठी मोर्चेबांधणी

## इच्छुकांची जोरदार तयारी : नेत्यांची मनधरणी

शिराळा,ता.२८(प्रतिनिधी)-

**शिराळा नगरपंचायतमध्ये उपनगराध्यक्ष पदाकरिता भाजपाचे जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक यांचे समर्थक केदार नलावडे व रमेश कांबळे, राजसिंह पाटील या नूतन सदस्यांची मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. इच्छुकांनी नेत्यांकडे धाव घेतली आहे.**

भाजप व शिवसेना युतीचे नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक झाल्याने बहुमत असणाऱ्या सदस्या पैकी एक उपनगराध्यक्ष पदी युतीचाच उपनगराध्यक्ष विराजमान होणार आहे. त्या दृष्टीने इच्छुकांनी जोरदार मोर्चे बांधणी व फिल्डिंग लावली आहे. नगराध्यक्ष पदासाठी ज्यांची संधी सुकली त्यापैकी केदार नलावडे एक आहेत.नगरपंचायतीत भाजप, शिवसेना सत्ता आली असून आता उपनगराध्यक्ष कोण होणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उपनगराध्यक्षसाठी भाजपचे नगरसेवक व संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष केदार नलावडे यांचे नाव चर्चेत आहे. ते सम्राट महाडिक गटाचे कार्यकर्ते असून नगरसेवक




म्हणून काम केले आहे. येथे ११ नगरसेवक भाजप व शिवसेना गटाचे, तर ६ नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत. भाजप, शिवसेना गटाकडे उपनगराध्यक्ष पद जाणार आहे.

शिवसेना गटाकडून राजसिंह पाटील तसेच रमेश कांबळे,सौ. मनस्वी निकम यांचींही नावे चर्चेत आली आहेत. यामध्ये निवडून आलेल्या नवनिर्वाचित महिलांपैकी कोणाला संधी मिळणार का? याकडे लक्ष लागले आहे.

# महाबळेश्वरचा पाणीपुरवठा पुन्हा सुरळीत

## नगराध्यक्ष शिंदे यांच्या हस्तक्षेपाने दिवसाआडचा निर्णय रद्द

महाबळेश्वर,ता.२८(वार्ताहर)-

**महाबळेश्वर पालिकेतील पाणीपुरवठा गेल्या काही महिन्यांपासून थकबाकीच्या कारणावरून वादाच्या भोवऱ्यात अडकला असून, संबंधित प्राधिकरणाकडून वारंवार पाणीपुरवठा बंद केला जात असल्याने शहरातील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. यामुळे पालिकेचे दैनंदिन नियोजन विस्कळीत झाले होते.**

ऐन पर्यटन हंगामात पाणीपुरवठा खंडीत होत असल्याने पर्यटकांमध्येही चुकीचा संदेश जाऊन महाबळेश्वरच्या प्रतिमेला धक्का बसत असल्याची चिंता व्यक्त होत होती.

या पार्श्वभूमीवर प्रशासक योगेश पाटील यांच्यावर मोठा ताण निर्माण झाला होता. या प्रश्नात मध्यंतरी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी लक्ष घालून मुंबईतील मंत्रालयात संबंधित प्राधिकरण व खात्याच्या मंत्र्यांसोबत बैठकांचे नियोजन केले होते. मात्र अपेक्षित गतीने ठोस निर्णय न झाल्याने परिस्थितीत फारसा बदल झाला नव्हता. दरम्यान,पुन्हा एकदा पाणीपुरवठा दिवसाआड करण्याचा निर्णय जाहीर झाल्याने शहरात अस्वस्थता पसरली होती. अशा वेळी नवनिर्वाचित नगराध्यक्ष सुनील शिंदे यांनी अद्याप अधिकृत पदभार स्वीकारलेला नसतानाही शहरातून येणाऱ्या तक्रारींची तातडीने दखल घेतली. त्यांनी संबंधित खात्याचे अधिकारी तसेच प्रशासक योगेश पाटील यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी पुढाकार घेतला.या हस्तक्षेपानंतर या हंगामातील दिवसाआड पाणीपुरवठ्याचा निर्णय रद्द करण्यात आला असून, २७ ते ३१ डिसेंबरदरम्यान नियोजित असलेला दिवसाआडचा पाणीपुरवठा नियमित स्वरूपात सुरू होणार असल्याची माहिती नगराध्यक्ष सुनील शिंदे यांनी बैठकीनंतर जाहीर केली. यामुळे शहरवासीयांनी समाधान व्यक्त केले असून, त्यांच्या तत्परतेचे स्वागत होत आहे.

# सरकारकडून निधीची फक्त वल्गना-पाटील

उंब्रज,ता.२८(प्रतिनिधी)-

**सध्या राज्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असून, अनेक योजनांना निधी नसल्याने गेले वर्षभर जुन्या आमदारांचीच विकास कामे सुरू आहेत. सरकार तुमचे असताना इंदोली-पाल योजना व हणबरवाडी-धनगरवाडी योजनेला निधी आणला असल्याच्या फक्त वल्गना झाल्या. परंतु अजून पाणी नाही? असा प्रश्न उपस्थित करून आम्ही विकास कामांकडे राजकारण म्हणून कधीही पाहात नसल्याच्या उपरोधिक टोला माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांनी लगावला.**

इंदोली (ता.कराड) येथे विविध विकासकामांच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी देवराज पाटील, मानसिंगराव जगदाळे,सौ.संगीता साळुंखे, प्रणव ताटे, सोमनाथ जाधव, उद्धवराव फाळके, जयंतराव जाधव, विजयराव निकम, पै.संजय थोरात, सरपंच पांडुरंग माने, बाबासाो निकम, संजय कदम आदिंची उपस्थिती होती. बाळासाहेब पाटील म्हणाले, कराड नगरपरिषद निवडणुकीत लोकशाही व यशवंत आघाडीला चांगले यश मिळाले. मात्र या निवडणुकीत शहराचे व तालुक्याचे स्वास्थ्य बिघडविण्याचे काम काही मंडळींनी केले. अशा मंडळींना कराडकरांनी बाजूला ठेवून, सुसंस्कृत लोकांच्या हातात सत्ता दिली आहे. सध्या अनेक योजनांना निधी नसल्याने जुन्या आमदारांचीच विकास कामे सुरू आहेत. एखादे विकास काम मंजूर झाले की त्याला निधी आला का, काम सुरू झाले आहे का याची शहानिशा कार्यकर्त्यांनी केली पाहिजे, असे सांगून ते पुढे म्हणाले, सध्या पळापळा कोण पुढे पळे या युक्तीप्रमाणे अनेक जण विशिष्ट पक्षात गेले आहेत. यामध्ये बरेचजण कॉन्ट्रॅक्टर व त्यांची मुले आहेत. कारण काय तर आमची कामे होत नाहीत. उठायचे आणि गळ्यात पट्टा घालून जायचे असा ट्रेंड असून, यामध्ये फायदा कमी, तोटा जास्त असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी देवराज पाटील, मानसिंगराव जगदाळे, सौ. संगीता साळुंखे, संजय कदम यांनी मनोगत व्यक्त केले.प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध विकास कामांचे उद्घाटन करण्यात आले.



**डॉ.सुखात्मे स्कूल लिंब येथे क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन करताना श्रीरंग काटेकर, समवेत घनश्याम चव्हाण, नितीन शिवथरे आदी.**

# शारीरिक,मानसिक तंदुरुस्तीसाठी क्रीडा संस्काराची गरज-काटेकर

सातारा,ता.२८(प्रतिनिधी)-

**शैक्षणिक ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक तंदुरुस्ती महत्त्वाची असून त्यासाठी त्यांना क्रीडा संस्काराचे महत्त्व प्राप्त करून देण्यासाठी क्रीडा स्पर्धा उपयुक्त ठरतात, असे मत गौरीशंकरचे जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर यांनी व्यक्त केले.**

लिंब(ता.जि सातारा) येथील गौरीशंकरचे डॉ. पी. व्ही. सुखात्मे इंग्लिश मिडियम स्कूल लिंब येथे २ जानेवारीपर्यंत आयोजित केलेल्या क्रीडा सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी स्कूलचे प्रभारी प्राचार्य घनश्याम चव्हाण,क्रीडा प्रमुख नितीन शिवथरे, अमित मडके, अविनाश सावंत, रूपाली मोरे, आरती चव्हाण,अश्विनी सवाखंडे, पल्लवी जाधव,कृतीका साळुंखे, निना जगताप आदी प्रमुख शिक्षक उपस्थित होते.शालेय क्रीडा सप्ताहमध्ये कबड्डी, खोखो, व्हॉलीबॉल, ॲथलेटिक्स, क्रिकेट या मैदानी खेळाबरोबरच बुद्धिबळ, कॅरम,मल्लखांब स्पर्धांचे ही आयोजन केले आहे. क्रीडा सप्ताहाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. प्रारंभी क्रीडांगणाचे पूजन श्रीफळ वाढवून संस्थेचे जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक व आभार प्रभारी प्राचार्य घनश्याम चव्हाण यांनी मानले.

## केळी पीक स्पर्धेत कल्याणींचा प्रथम क्रमांक

कराड,ता.२८(प्रतिनिधी)-

**येथे आयोजित यशवंतराव चव्हाण कृषी, औद्योगिक व पशुपक्षी प्रदर्शनात झालेल्या केळी पीक स्पर्धेत उद्योजक गौरीशंकर निळकंठ कल्याणी विंग, (ता. कराड) यांच्या बागेतील केळीच्या घडाने प्रथम क्रमांक पटकावला.**

या स्पर्धेत कराड तालुक्यातील येणके येथील केळी उत्पादक बबन सिताराम गरुड यांच्या बागेतील केळीच्या घडाला द्वितीय क्रमांक मिळाला. तर आणे (ता.कराड) येथील संकेत शिवाजी देसाई व येणके येथीलच प्रशांत हिंदुराव गरुड यांच्या केळी घडांना तृतीय क्रमांक विभागून देण्यात आला. तसेच आळसूंद (ता.खानापूर) येथील अशोक आनंदराव जाधव व पोतले (ता.कराड) येथील शंकर रामचंद्र पाटील यांच्या बागेतील केळी घडांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली.

# निवडणूक प्रक्रिया निर्भय वातावरणात पार पाडावी

## आयुक्त सत्यम गांधी यांचे निर्देश : सांगलीत समन्वय बैठक संपन्न

सांगली,ता.२८(प्रतिनिधी)-

**महापालिकेची निवडणूक प्रक्रिया निर्भय, पारदर्शक आणि खुल्या वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी परस्परांमध्ये समन्वय ठेवणे आवश्यक आहे. आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर तात्काळ कायदेशीर कारवाई होईल, याची सर्व संबंधित यंत्रणांनी खबरदारी घेऊन आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे आदेश महापालिकेचे आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी सत्यम गांधी यांनी दिले आहेत.**




सांगली: समन्वय बैठकीत बोलताना आयुक्त सत्यम गांधी.

### शस्त्रास्त्र व मद्यविक्रीवर निर्बंध

निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत शस्त्र बाळगण्यास बंदी असून शस्त्र जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे. मतदानाच्या आदल्या दिवशी, मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी 'ड्राय डे' पाळला जाईल. अवैध मद्यविक्री रोखण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाला सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सांगली,मिरज,कुपवाड शहर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक प्रशासन, पोलीस यंत्रणा व विविध संलग्न विभागांची महत्त्वपूर्ण समन्वय बैठक पार पडली. महापालिकेचे आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सत्यम गांधी आणि पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत आदर्श आचारसंहितेची कडक अंमलबजावणी, सुरक्षा व्यवस्था, परवानग्या, प्रचार नियंत्रण व कायदेशीर कारवाई याबाबत सविस्तर चर्चा करून स्पष्ट निर्देश देण्यात आले. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे, उपायुक्त (निवडणूक) अश्विनी पाटील, उपायुक्त स्मृती पाटील,सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी,पोलीस उपअधीक्षक आदी अधिकारी उपस्थित होते.

पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी निवडणूक काळातील सुरक्षेचा सविस्तर आराखडा सादर केला.ईव्हीएम ठेवण्यात येणाऱ्या स्ट्राँग रूमला २४ तास कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार असून शहरातील संवेदनशील मतदान केंद्रांची ओळख करून तेथे अतिरिक्त पोलीस दल तैनात केले जाणार आहे. भरारी पथके व स्थिर सर्वेक्षण पथके, अवैध रोख रक्कम, मद्य व भेटवस्तूंच्या वाहतुकीवर कडक लक्ष ठेवून तात्काळ कारवाई केली जाणार आहे.

**प्रचारासाठी आवश्यक परवानग्या देण्यासाठी महापालिकेने तीन ठिकाणी 'एक खिडकी' कक्ष सुरू केले आहेत. मंगलधाम इमारत (जिल्हा परिषद समोर), सांगली, मिरज विभागीय कार्यालय, कुपवाड विभागीय कार्यालय येथे 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर सभा, मिरवणूक व ध्वनीक्षेपकासाठी परवानग्या दिल्या जातील.**

# आदर्श विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत यश

मसूर,ता.२८(प्रतिनिधी)-

**हणबरवाडी (ता.कराड) येथील आदर्श विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय कुमार महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत यश मिळवले.**

या स्पर्धेत गौरव माणिक माळी याने ९२ किलो वजनी गटात सुवर्णपदक मिळवले. तर संचित स्वप्निल धस याने ४५ किलो वजनी गटात कांस्यपदक मिळवले. त्याबद्दल त्यांचा मसूरच्या जय हनुमान तालमीच्यावतीने सन्मान करण्यात आला. यावेळी वस्ताद ज्ञानदेव शेडगे, विक्रमसिंह काळभोर, दिगंबर निसरड, हेमलता शिंदे, अर्जुन देसाई, राकेश साठे, माणिक जाधव उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी खेळात व अभ्यासात विशेष प्राविण्य मिळविले तरच त्यांच्या आयुष्याचे सार्थक होते, असे मत वस्ताद इंद्रजीत तनपुरे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.विक्रमसिंह काळभोर यांनी प्रास्ताविक केले. हेमलता शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. दिगंबर निसरड यांनी आभार मानले.

# व्यावसायिक मालमत्ता विकल्यास एलटीजीएसवर कर सवलत मिळू शकते का?




व्यावसायिक मालमत्ता (कमर्शियल प्रॉपर्टी) विकल्यानंतर होणारा नफा आणि त्यावर लागणारा कर हा अनेक गुंतवणूकदारांसाठी चिंतेचा विषय असतो. व्यावसायिक मालमत्तेच्या विक्रीतून मिळालेल्या दीर्घकालीन भांडवली नफ्यावर थेट कलम ५४ अंतर्गत सवलत मिळत नसली, तरी कलम ५४ एफ अंतर्गत कर सवलत मिळवण्याचा मार्ग उपलब्ध आहे.

प्राप्तिकर कायद्याचे कलम ५४ प्रामुख्याने निवासी घरांच्या विक्रीतून मिळणाऱ्या नफ्याशी संबंधित आहे. जर एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या वापरासाठी असलेले किंवा भाड्याने दिलेले घर विकले आणि त्यातून मिळालेला नफा पुन्हा दुसरे घर घेण्यासाठी ठराविक मुदतीत वापरला, तर या कलमांतर्गत कर सवलत मिळते. मात्र, ही तरतूद व्यावसायिक मालमत्तेसाठी लागू होत नाही. व्यावसायिक मालमत्ता विकून मिळालेल्या पैशातून जर तुम्हाला कर वाचवायचा असेल, तर तुम्हाला कलम ५४ एफ चा आधार घ्यावा लागेल. दोन्ही कलमांमधील अटी काही प्रमाणात सारख्या असल्या तरी, त्यामध्ये एक मूलभूत आणि महत्त्वाचा फरक आहे.

कलम ५४ अंतर्गत सवलत मिळवण्यासाठी तुम्हाला केवळ नफ्याची रक्कम नवीन घरात गुंतवावी लागते. परंतु, कलम ५४ एफ नुसार व्यावसायिक मालमत्ता विकून मिळालेली एकूण रक्कम नवीन निवासी घरामध्ये गुंतवणे अनिवार्य आहे. जर तुम्ही विक्रीतून मिळालेली पूर्ण रक्कम गुंतवली नाही, तर तुम्हाला मिळणारी कर सवलत ही गुंतवणुकीच्या प्रमाणात कमी केली जाते. यासोबतच कलम ५४ एफ अंतर्गत सवलत मिळवण्यासाठी एक कडक अट अशी आहे की, मालमत्ता विकतेवेळी संबंधित व्यक्तीकडे एकापेक्षा जास्त घर नसावे (ज्यामध्ये नवीन खरेदी केलेले घर मोजले जात नाही). जर तुमच्याकडे आधीच दोन किंवा अधिक घरे असतील, तर तुम्ही या कलमांतर्गत व्यावसायिक मालमत्तेवर सवलत घेऊ शकत नाही.

आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे, जर तुम्ही खरेदी करत असलेल्या नवीन निवासी घराची किंमत १० कोटी रुपयांपेक्षा जास्त असेल, तर कर सवलतीची मर्यादा केवळ १० कोटी रुपयांपर्यंतच मर्यादित करण्यात आली आहे. थोडक्यात, व्यावसायिक मालमत्ता विकून मिळालेल्या पैशाचा वापर जर निवासी घर घेण्यासाठी केला आणि वरील अटींची पूर्तता केली, तर निश्चितपणे कर सवलत क्लेम करता येते. तरीही, मोठी गुंतवणूक करण्यापूर्वी कर सल्लागाराचा प्रत्यक्ष सल्ला घेणे हिताचे ठरते. ◆◆◆

# नोकरी गमावल्यानंतर आरोग्य विम्याच्या सुरक्षेचे काय?

***कॉर्पोरेट विश्वात सध्या सुरू असलेल्या कर्मचारी कपातीच्या लाटेने केवळ उत्पन्नाचा मार्गच रोखलेला नाही, तर कर्मचाऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसमोरही मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे. नोकरी सोडणे किंवा अनपेक्षित टाळेबंदीचा सामना करणे ही बाब मानसिकदृष्ट्या धक्कादायक असतेच, परंतु त्याहीपेक्षा मोठी चिंता असते ती तुमच्या आरोग्य विम्याची.***




तुमचा नियोक्ता किंवा कंपनी तुम्हाला जो आरोग्य विम्याचा कवच पुरवते, तो नोकरी सुटल्यानंतर अचानक नाहीसा होतो. अशा वेळी कोणत्याही वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत तुम्ही आर्थिकदृष्ट्या अडचणीत येऊ शकता.

तज्ज्ञांच्या मते, बहुतांश कंपन्यांचा गट विमा (ग्रुप मेडिकल कव्हर) हा तुमचा नोटीस पिरीयड संपताच संपुष्टात येतो. काही मोठ्या संस्थांमध्ये थोडा सवलतीचा काळ मिळत असला तरी, स्टार्टअप्स किंवा छोट्या क्षेत्रांमध्ये ही सुरक्षा एका झटक्यात संपते. अशा परिस्थितीत वाढते वय आणि आरोग्याच्या तक्रारी लक्षात घेता, विम्याच्या हप्त्यावर (प्रीमियम) मोठा परिणाम होतो. म्हणूनच विम्याचा योग्य पर्याय निवडणे ही केवळ गरज नसून ती आर्थिक सुरक्षिततेची अट बनली आहे.

भारतात अमेरिकेसारखी कोब्रा सुविधा उपलब्ध नसली तरी, कर्मचाऱ्यांकडे काही कायदेशीर पर्याय उपलब्ध आहेत. कोणताही कर्मचारी आपली नोकरी सोडण्यापूर्वी आपल्या ग्रुप इन्शुरन्स योजनेला वैयक्तिक पॉलिसीमध्ये रूपांतरित किंवा पोर्ट करू शकतो. ही प्रक्रिया नोकरी सोडण्यापूर्वीच सुरू करणे आवश्यक असते, जेणेकरून आधीपासून असलेल्या आजारांचे कव्हर आणि नो-क्लेम बोनसचे फायदे कायम राखता येतात.

दुसरा पर्याय म्हणजे नवीन वैयक्तिक किंवा फॅमिली फ्लोटर पॉलिसी खरेदी करणे. परंतु यामध्ये पुन्हा वेटिंग पिरीयड आणि वैद्यकीय तपासणीच्या अटी लागू होतात.

महत्त्वाचे म्हणजे, वैयक्तिक पॉलिसींचे दर कंपनीच्या ग्रुप प्लॅनपेक्षा जास्त असतात, कारण ग्रुप प्लॅनचे दर कंपनीने मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांसाठी घाऊक दरात वाटाघाटी करून ठरवलेले असतात. त्यामुळे नोकरी गेल्यानंतर जेव्हा तुम्ही वैयक्तिक विमा घेता, तेव्हा त्याचा प्रीमियम विशेषतः ज्येष्ठ कर्मचाऱ्यांसाठी किंवा जुने आजार असलेल्यांसाठी मोठ्या प्रमाणात वाढू शकतो.

विमा कंपन्यांच्या दृष्टिकोनातून पाहिले तर, मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या टाळेबंदीचा परिणाम त्यांच्या जोखीम मूल्यांकनावर होतो. जर एखाद्या कंपनीतून तरुण आणि निरोगी कर्मचारी बाहेर पडले आणि केवळ वयोवृद्ध किंवा आरोग्य समस्या असलेले कर्मचारी शिल्लक राहिले, तर त्या ग्रुपचे प्रीमियम रिन्यूअलच्या वेळी वाढवले जाऊ शकतात. विमा कंपन्या केवळ एका घटनेवरून निर्णय घेत नाहीत, तर त्या दोन-तीन वर्षांचा डेटा तपासून पुढील धोरण ठरवतात.

सध्या भारतात असा कोणताही कडक कायदा नाही जो नोकरी सुटल्यानंतर कंपनीला आरोग्य विमा सुरू ठेवण्यास भाग पाडेल. अनेक कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्कांबद्दल किंवा कव्हरेजच्या कालावधीबद्दल माहिती नसते. त्यामुळे कंपन्यांनी एक्झिट पॅकेजच्या वेळी याबद्दल स्पष्टता देणे गरजेचे आहे.

**काही स्टार्टअप्स कर्मचाऱ्यांना काही आठवड्यांसाठी कव्हरेज सुरू ठेवण्याची सवलत देतात, पण हे पूर्णपणे कंपनीच्या मर्जीवर अवलंबून असते. मध्यमवर्गीय कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांसाठी आयुष्मान भारत सारख्या सरकारी योजनांचा ५ लाख रुपयांपर्यंतचा विमा अपुरा पडू शकतो, त्यामुळे वेळीच पोर्टिंग करून स्वतःची वैयक्तिक पॉलिसी सुरू ठेवणे हाच संकटात आर्थिक स्थैर्य देणारा सर्वात प्रभावी मार्ग ठरतो.** ◆◆◆

# हॅकिंगनंतर मोबाईल वापरताना...




**अलीकडील काळात सायबर फसवणुकीच्या घटनांना उधाण आले आहे. एखादी लिंक मोबाईलवर पाठवून डाऊनलोड करावयास सांगून क्षणार्धात बँक खाते निकामे करणाऱ्या ठकसेनांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. कित्येक जण अशा प्रकारे पैसे गेल्यानंतर बोभाटाही करत नाहीत. पण या फसलेल्या प्रत्येकासमोर एक प्रश्न असतो की, आता मोबाईल पुन्हा सुरू करून पेमेंट ॲप्स वापरावे की नाही? कारण काही फसवणुकीच्या प्रकरणात स्क्रीनशेअरींग केलेले असल्याने मोबाईलमधील सर्व माहिती ठकसेनांनी पळवलेली असते. अशा वेळी नव्याने ॲप वापर सुरू केल्यास पुन्हा पैसे जाण्याची भीती असते. मग नेमके काय करावे?**

मोबाईल हॅक झाल्यानंतर आणि आर्थिक फटका बसल्यानंतर, 'गुगल पे' किंवा 'फोन पे' यांसारखी युपीआय ॲप्स पुन्हा सुरू करण्यापूर्वी काही गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात.

सर्वप्रथम मोबाईल पूर्णपणे फॉरमॅट करा. कारण ज्या ॲपमुळे हॅकिंग झाले, त्याचे अंश फोनमध्ये असू शकतात. त्यामुळे फोनमधील महत्त्वाच्या डेटाचा बॅकअप घेऊन फोन 'फॅक्टरी रिसेट' करणे सर्वात सुरक्षित आहे.

फोन फॉरमॅट करणे शक्य नसेल, तर ते धोकादायक ॲप तातडीने काढून टाका. अनेकदा ही ॲप्स एनीडेस्क, टीमव्ह्यूअरसारखी 'स्क्रीन शेअरिंग' असतात. यानंतर तुमचे सिम कार्ड दुसऱ्या फोनमध्ये टाकून एकदा तपासा की टेलिकॉम सेवा सुरक्षित आहे का.

याखेरीज तुमच्या बँकेला या चोरीबद्दल अधिकृत माहिती देऊन शक्य असल्यास जुने यूपीआय आयडी बंद करून नवीन तयार करण्याची विनंती करा. हॅकरने कार्डचा तपशील चोरला असेल, तर जुने डेबिट कार्ड ब्लॉक करून नवीन कार्ड मागवून घ्या. नवीन पिन नंबर सेट करताना तो जुन्यापेक्षा वेगळा ठेवा.

तुमचे जीपे किंवा फोन पे ज्या गुगल खात्याला जोडलेले आहे, त्याचा पासवर्ड त्वरित बदला आणि 'टू-स्टेप व्हेरिफिकेशन' (दुहेरी सुरक्षा प्रणाली) सुरू करा.

ॲप पुन्हा सुरू करण्यासाठी नेहमी 'गुगल प्ले स्टोअर' किंवा 'ॲपल ॲप स्टोअर' वरूनच डाऊनलोड करा. कोणत्याही त्रयस्थ लिंकवरून (एपीके फाईल) ॲप घेऊ नका. यूपीआय व्यवहार सुरू करताना जुना 'यूपीआय पिन' वापरू नका. पूर्णपणे नवीन आणि क्लिष्ट पिन तयार करा. तो शक्यतो तुमच्या जन्मतारखेशी किंवा मोबाईल नंबरशी संबंधित नसावा. पेमेंट ॲप उघडण्यासाठी फिंगरप्रिंट किंवा फेस लॉकचा वापर करा, जेणेकरून फोन कोणाच्या हातात लागला तरी ॲप उघडता येणार नाही. ◆◆◆

- भविष्यात कोणत्याही अनोळखी व्यक्तीने पाठवलेली लिंक क्लिक करू नका. 'कॅशबॅक' किंवा 'बक्षीस' मिळवण्यासाठी कधीही पिन टाकू नका; पैसे मिळवण्यासाठी पिनची गरज नसते, फक्त पैसे पाठवण्यासाठी असते. अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून स्क्रीन शेअरिंग ॲप डाऊनलोड करू नका.

# परताव्यापेक्षा शिस्त आणि वाढीव योगदान महत्त्वाचे

भांडवल बाजारात गुंतवणूक करताना अनेक गुंतवणूकदार केवळ 'जास्त परतावा' (रिटर्न) कुठे मिळेल, याच्या मागे धावताना दिसतात. मात्र, दीर्घकालीन संपत्ती निर्मितीसाठी परताव्याच्या दरापेक्षा तुम्ही किती रक्कम आणि किती नियमितपणे गुंतवणूक करता, हे अधिक महत्त्वाचे ठरते. केवळ परताव्यावर अवलंबून न राहता गुंतवणुकीच्या रकमेत दरवर्षी ठराविक वाढ केल्यास अपेक्षित उद्दिष्ट सहज गाठता येते.

**उदाहरणातून समजून घ्या गणिते**

समजा, 'अ' आणि 'ब' असे दोन गुंतवणूकदार आहेत. दोघांनीही दरमहा ५,००० रुपयांची एसआयपी सुरू केली आणि २० वर्षांपर्यंत गुंतवणूक कायम ठेवली. गुंतवणूकदार 'अ' हा २० वर्षे नियमितपणे ५,००० रुपये गुंतवतो. त्याला वार्षिक १४ टक्के परतावा मिळतो. २० वर्षांत त्याची एकूण गुंतवणूक १२ लाख रुपये होते आणि हातात मिळणारा निधी ६५.८२ लाख रुपये होतो.




दुसरीकडे 'ब'ला वार्षिक १० टक्के परतावा (अ च्या तुलनेत ४ टक्के कमी) मिळतो. मात्र, तो दरवर्षी आपल्या गुंतवणुकीच्या रकमेत १० टक्क्यांनी वाढ (स्टेप-अप) करतो. २० वर्षांत त्याची एकूण गुंतवणूक ३४.३६ लाख रुपये होते आणि अखेरीस त्याच्याकडे ८०.७३ लाख रुपयांचा निधी जमा होतो. यावरून स्पष्ट होते की, कमी परतावा मिळूनही केवळ गुंतवणुकीतील वाढीमुळे 'ब' कडे 'अ' च्या तुलनेत १५ लाख रुपये अधिक जमा झाले आहेत.

सुरवातीला जास्त परतावा आकर्षक वाटतो, परंतु दीर्घकाळात संपत्तीची वाढ ही तुम्ही दरवर्षी गुंतवणुकीत किती भर टाकता, यावर अवलंबून असते. गुंतवणूकदारांनी केवळ परताव्याचा विचार न करता आपल्या वार्षिक उत्पन्नातील वाढीनुसार गुंतवणुकीचा आकडाही वाढवला पाहिजे. जर गुंतवणूकदार 'ब' प्रमाणे दरवर्षी १० टक्के गुंतवणूक वाढवली असती आणि त्याला १४ टक्के परतावा मिळाला असता तर २० वर्षांनंतर हा निधी १.१३ कोटी रुपयांच्या घरात जातो. यालाच 'कम्पाउंडिंग'ची जादू म्हणतात. परताव्यामुळे संपत्ती वाढते, परंतु गुंतवणुकीतील वाढीमुळे तिचा वेग अनेक पटींनी विस्तारतो. ◆◆◆

**तज्ज्ञांचा काय आहे सल्ला?**

- गुंतवणुकीसाठी मुहूर्त पाहण्यापेक्षा लवकरात लवकर सुरुवात करणे फायद्याचे ठरते.
- बाजार कितीही खाली-वर झाला तरी १५ ते २० वर्षे गुंतवणुकीत सातत्य ठेवा.
- बाजारातील परतावा आपल्या हातात नसला, तरी किती रक्कम गुंतवायची आणि ती किती काळ टिकवायची, हे सर्वस्व गुंतवणूकदाराच्या हातात असते.

# रिटर्नमध्ये दुरुस्ती करावयाची असल्यास...




**आयकर विभागाने कर निर्धारण वर्ष २०२५-२६ साठी प्राप्तिकर विवरणपत्र (रिटर्न) भरणाऱ्या करदात्यांच्या व्यवहारांमधील काही संशयास्पद बाबींवर बोट ठेवले आहे. ज्या करदात्यांनी नियमबाह्य पद्धतीने वजावट (डिडक्शन) किंवा सवलतींचा (एग्जेम्प्शन) दावा केला आहे, अशा करदात्यांना विभागाकडून ई-मेल आणि संदेश पाठवण्यात येत आहेत. करदात्यांनी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत आपले विवरणपत्र तपासून त्यात आवश्यक दुरुस्ती (रिवाईज्ड रिटर्न) करावी, असे आवाहन विभागाने केले आहे.**

**संशयास्पद देणग्या आणि सवलती रडारवर**

**आयकर विभागाच्या 'रिस्क ॲनालिटिक्स' यंत्रणेला तपासणीदरम्यान काही धक्कादायक बाबी आढळल्या आहेत. अनेक करदात्यांनी सवलत मिळवण्यासाठी अशा राजकीय पक्षांना देणग्या दाखवल्या आहेत, जे नोंदणीकृत असूनही कर सवलतीसाठी पात्र नाहीत. याव्यतिरिक्त, उत्पन्नाच्या तुलनेत वजावटीचे प्रमाण विसंगत असणे किंवा नियमात न बसणाऱ्या सवलतींचा दावा करणे, असे प्रकारही समोर आले आहेत.**

**'नज' मोहिमेद्वारे मदतीचा हात**

**करदात्यांवर थेट दंडात्मक कारवाई करण्याऐवजी त्यांना स्वतःहून चूक सुधारण्याची संधी देण्यासाठी विभागाने 'नज' हा विशेष उपक्रम सुरू केला आहे. या मोहिमेअंतर्गत करदात्यांना केवळ सूचित केले जात आहे. ज्यांच्याकडे आपल्या दाव्यांच्या समर्थनार्थ योग्य कागदपत्रे आहेत, त्यांनी घाबरण्याचे कारण नाही. मात्र, ज्यांच्याकडून अनावधानाने किंवा जाणीवपूर्वक चूक झाली आहे, त्यांनी ती वेळीच सुधारावी, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. ३१ डिसेंबरनंतर अतिरिक्त कराचा बोजा**

**करदात्यांसाठी ३१ डिसेंबर २०२५ ही महत्त्वाची मुदत आहे.**

**सुधारित विवरणपत्र (रिवाईज्ड रिटर्न): मूळ विवरणपत्रात चूक असल्यास ३१ डिसेंबरपर्यंत सुधारित विवरणपत्र भरता येईल. यासाठी कोणताही अतिरिक्त दंड आकारला जाणार नाही. अद्ययावत विवरणपत्र (अपडेटेड रिटर्न): १ जानेवारी २०२६ पासून सुधारित विवरणपत्र भरता येणार नाही. त्याऐवजी 'अपडेटेड रिटर्न' भरावे लागेल, ज्यासाठी करदात्याला अतिरिक्त कराचा भरणा करावा लागू शकतो.**

**तज्ज्ञांचा सल्ला काय?**

**कर तज्ज्ञांच्या मते, प्राप्तिकर विभाग आता अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि विदा विश्लेषणाचा (डेटा ॲनालिटिक्स) प्रभावी वापर करत आहे. त्यामुळे फॉर्म १६ मधील माहितीशी विसंगत असलेले दावे सहज पकडले जात आहेत. ज्या करदात्यांना असे ई-मेल प्राप्त झाले आहेत, त्यांनी आपल्या गुंतवणुकीच्या कागदपत्रांची पुन्हा एकदा पडताळणी करणे हिताचे ठरेल.** ◆◆◆

# वैयक्तिक कर्जाची मुदतपूर्व परतफेड करावी का?

अचानक उद्भवणाऱ्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी वैयक्तिक कर्ज (पर्सनल लोन) हा आजच्या काळात सर्वात सोपा आणि जलद पर्याय मानला जातो. हे कर्ज 'अनसिक्युअर्ड' श्रेणीत मोडत असल्याने त्यासाठी कोणत्याही तारणाची गरज नसते, मात्र त्याचे व्याजदर तुलनेने जास्त असतात. अशा परिस्थितीत, अतिरिक्त रक्कम हाती आल्यास अनेक जण मुदतीपूर्वीच कर्ज फेडण्याचा (प्रीपेमेंट किंवा प्री-क्लोजर) विचार करतात. परंतु, असा निर्णय घेताना आपल्या 'क्रेडिट स्कोर'वर (पतमानांकन) काय परिणाम होईल, याची चिंता अनेकांना सतावते. जेव्हा एखादी व्यक्ती कर्जाचा कालावधी पूर्ण होण्याआधीच संपूर्ण रकमेचा भरणा करते, तेव्हा तिला व्याजापोटी द्याव्या लागणाऱ्या मोठ्या रकमेची बचत करता येते. उदाहरणार्थ, जर एखाद्याने पाच वर्षांसाठी कर्ज घेतले असेल आणि ते दोन वर्षांतच फेडले, तर उर्वरित तीन वर्षांचे व्याज वाचते. यामुळे कर्जदाराची आर्थिक स्थिती भक्कम होते आणि कर्जाचा बोजा लवकर उतरतो.



कर्ज लवकर फेडल्याने क्रेडिट स्कोर घसरतो, हा एक मोठा गैरसमज आहे. प्रत्यक्षात तुमचा क्रेडिट स्कोर तुम्ही किती नियमितपणे हप्ते (ईएमआय) भरले आहेत, यावर अवलंबून असतो. जर तुम्ही सर्व हप्ते वेळेवर भरून कर्ज बंद केले, तर त्याचा नकारात्मक परिणाम होत नाही. ज्यांची क्रेडिट हिस्ट्री अगदी नवीन आहे, अशा ग्राहकांनी कर्ज लवकर बंद केल्यास त्यांच्या खात्यातील 'ॲक्टिव्ह' कर्जांची संख्या कमी होते. अशा वेळी क्रेडिट स्कोरमध्ये तात्पुरती किंचित घट होऊ शकते.

**फायदे आणि घ्यावयाची काळजी**

मुदतीपूर्वी कर्ज फेडल्यास व्याजाचा बोजा कमी होतो. कर्जाच्या ओझ्यातून लवकर मुक्तता मिळाल्याने मानसिक शांतता लाभते. अनेक बँका किंवा वित्तीय संस्था (एनबीएफसी) मुदतीपूर्वी कर्ज फेडल्यास काही शुल्क आकारतात. त्यामुळे कर्ज करारातील अटी नीट वाचाव्यात. जर तुमच्याकडे एकापेक्षा जास्त कर्जे असतील, तर ज्या कर्जाचा व्याजदर सर्वाधिक आहे, त्याची परतफेड आधी करणे फायद्याचे ठरते.

**थोडक्यात काय?**

हाती जास्तीची रक्कम असल्यास वैयक्तिक कर्जाची मुदतपूर्व परतफेड करणे हा एक शहाणपणाचा निर्णय आहे. ज्यांचा कर्ज फेडण्याचा इतिहास स्वच्छ आहे, त्यांच्या क्रेडिट स्कोअरवर याचा सकारात्मकच परिणाम होतो. मात्र, नवीन कर्जदारांनी पतमानांकातील किरकोळ चढ-उतारांची नोंद घेऊनच निर्णय घ्यावा. ◆◆◆

# दहा लाखांहून अधिक किंमतीची कार घेताय?

**जाणून घ्या टीसीएसचे गणित आणि रिटर्नमध्ये कसे दाखवायचे?**

भारतामध्ये घरानंतर कार खरेदी हा बहुतेक नागरिकांसाठी आयुष्यभरातील दुसरा मोठा आर्थिक टप्पा मानला जातो. परंतु ही कार घेताना निर्माण होणाऱ्या उत्साहात अनेकजण एक अत्यंत महत्त्वाचा करभार दुर्लक्षित करतात आणि तो म्हणजे 'टीसीएस' अर्थात 'टॅक्स कलेक्टेड ॲट सोर्स'. विद्यमान उत्पन्नकर नियमांनुसार दहा लाख रुपयांपेक्षा जास्त किंमतीची कार खरेदी केल्यास विक्रीकिंमतीच्या एक टक्का रक्कम कार डीलर ग्राहकाकडून 'टीसीएस' म्हणून वसूल करून ती थेट सरकारकडे जमा करणे बंधनकारक असते. ही कटौती अनेकदा ग्राहकांच्या लक्षात येत नाही किंवा आयकर विवरणपत्र भरताना या क्रेडिटचा दावा करणे ते विसरतात. अशा वेळी नाहक कर जास्त भरला जातो किंवा मिळणारा रिफंड हुकतो आणि नंतर गोंधळ वाढतो.



दहा लाखांपेक्षा जास्त किंमत असलेली कार विकत घेताना टीसीएस आपोआप वसूल केला जातो. या कपातीची नोंद झाली आहे का, हे तपासण्यासाठी करदात्याने उत्पन्नकर विभागाच्या पोर्टलवर 'फॉर्म २६एएस' डाउनलोड करणे आवश्यक असते. इनकम टॅक्स अकाऊंटमध्ये लॉग इन केल्यानंतर 'ई-फाईल' या विभागात जाऊन संबंधित मूल्यांकन वर्ष निवडल्यास टीसीएसची स्पष्ट नोंद दिसते. ही नोंद दिसताच आयकर विवरणपत्र भरताना त्या रकमेचे समायोजन आपोआप होते. 'फॉर्म २६एएस' हे मूलतः पॅनशी जोडलेल्या सर्व कर व्यवहारांची वार्षिक नोंद ठेवणारे विवरणपत्र असून यात टीडीएस, टीसीएस, सेल्फ-ॲसेसमेंट टॅक्स, रिफंड आणि उच्च-मूल्य व्यवहार अशा अनेक नोंदी असतात. कार डीलरने वसूल केलेला टीसीएस येथे दिसत असल्याने इनव्हॉइस हरवला किंवा कपातीचा तपशील विसरला, तरी शासनाच्या नोंदीत हा डेटा सुरक्षित राहतो.

फॉर्म २६एएसमध्ये टीसीएसची नोंद झाल्यानंतर त्याचा दावा करणे सोपे आणि सरळ असते. आयटीआर भरताना 'टॅक्स पेड' या विभागात टीसीएसची रक्कम प्रणाली आपोआप भरते. करदात्याने फक्त फॉर्म २६एएसमध्ये दर्शविलेली रक्कम आणि आयटीआरमध्ये दाखविलेले आकडे यांची जुळवाजुळव करायची असते. जर वर्षभरातील तुमचा टीडीएस आणि टीसीएस एकत्रितपणे तुमच्या करदायित्वापेक्षा जास्त असेल, तर रिफंड आपोआप मोजला जातो. उलटपक्षी करदायित्व जास्त असल्यास टीसीएस क्रेडिटमुळे अंतिम करभरणा कमी होतो. म्हणून ही नोंद तपासणे आणि क्रेडिट योग्यप्रकारे क्लेम करणे अत्यावश्यक ठरते.

महागड्या कारच्या व्यवहारासोबतच काही इतर व्यवहारांवरही टीसीएस लागू होतो. लिबरलाइज्ड रेमिटन्स स्कीम अंतर्गत परदेशात पाठविलेली रक्कम, विदेशी टूर पॅकेज, काही विशिष्ट व्यावसायिक व्यवहार आणि बँकांमार्फत प्रक्रिया झालेले आंतरराष्ट्रीय रेमिटन्स या व्यवहारांवरही टीसीएस आकारला जातो. फॉर्म २६एएसमध्ये २००९-१० पासून सर्व टीडीएस आणि टीसीएस नोंदी उपलब्ध असल्याने कार डीलर असो किंवा ट्रॅव्हल एजन्सी सर्व कपातींची माहिती एका ठिकाणी सहज दिसते.

जसे आर्थिक व्यवहारांचे प्रमाण वाढत आहे तसे त्यावर लागू होणाऱ्या टीसीएसचा व्यापही वाढत आहे. या विस्तारामुळे टीसीएसचा मागोवा ठेवणे आणि आयकर विवरणपत्रात त्याचा अचूक दावा करणे ही करनियोजनाची अपरिहार्य बाजू बनली आहे. म्हणूनच दहा लाख रुपयांपेक्षा अधिक किमतीची कार खरेदी करत असाल तर टीसीएसची एक टक्का कपात नक्की झाली आहे का, तो तपशील फॉर्म २६एएसमध्ये योग्यरीत्या दिसतोय का आणि आयटीआरमध्ये त्याचा दावा नीट केला आहे का याची खात्री करणे महत्त्वाचे ठरते. आर्थिक शिस्तीतला हा छोटासा पण महत्त्वपूर्ण तपशील पुढील काळात तुमचे हजारो रुपये वाचवू शकतो. ◆◆◆

# इचलकरंजीत सहा लाखाच्या प्लंबिंग साहित्याची चोरी

इचलकरंजी,ता.२८–

**स्टेशन रोड परिसरात अज्ञात चोरट्यांनी सुमारे ६ लाख ३६ हजार २५५ रुपयांचा प्लंबिंग साहित्याचा साठा चोरून नेल्याची नोंद शिवाजीनगर पोलीस ठाण्यात झाली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.**

याप्रकरणी पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, फिर्यादी किशोर रविलाल पटेल (वय ४३, रा.इचलकरंजी) यांचे स्टेशन रोडवरील श्री जलाराम ट्रेडर्स हे प्लंबिंग साहित्याचे दुकान आहे. शुक्रवारी रात्री ८ वाजता दुकान बंद करून ते घरी गेले. त्याच मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी दुकानाच्या गोडावूनच्या उत्तर बाजूचा लोखंडी पत्रा कटरने कापून आत प्रवेश केला.

त्यानंतर दुकानातील मौल्यवान साठ्यावर डल्ला मारत विविध कंपनीचे विविध मॉडेलचे ३६० पितळी नळ व फ्लश कॉक मोठ्या प्रमाणात लंपास केले. अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने ही घरफोडी केल्याचे दिसून येते.

# बेलवळे बुद्रुक येथे लोक कलाकार संघटनेचा मेळावा

साके,ता.२८(वार्ताहर) –

**कोल्हापूर जिल्हा लोक कलाकार संघाच्यावतीने जिल्ह्यातील लोक कलाकारांचा मेळावा बेलवळे बुद्रुक (ता. कागल) येथे संपन्न झाला. हा मेळावा भाजपाचे जिल्हाध्यक्ष नाथाजी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. मेळाव्याला जिल्ह्यातील हजारोहून अधिक लोक कलाकारांनी सहभाग घेतला होता.**

प्रारंभी गावातून कलाकारांनी जागृती दिंडी काढली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व समाधान कांबळे यांनी सादर केलेल्या गाण्याने झाली. प्रास्ताविक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विलासराव पाटील यांनी केले. यावेळी नाथाजी पाटील यांनी लोक कलाकारांनी समाजामध्ये निर्माण होत असलेल्या विकृत समस्यांची जाणीव जागृती लोककलेच्या माध्यमातून करावी असे आवाहन केले.

यावेळी चंदगड, आजरा, शाहुवाडी, गगनबावडा, राधानगरी या दुर्गम तालुक्यासह कोल्हापूर जिल्ह्यातील कलाकारांनी वासुदेव, गोंधळी, जोगवा, भजन, गण, गवळण, लावणी, शाहिरी, गौरी गीत, धनगरी नृत्य यासह अन्य प्रकारच्या कला सादर केल्या.

मेळाव्यास संगीतकार महेश हिरेमठ, डॉ. अनंत गिरी, शाहीर धोंडीराम मगदूम, ढोलकी सम्राट सुरेश कांडगावकर, अनिता मगदूम, तमाशगीर शंकर डावाळे, पांडू आवळकर, मानधन कमिटीचे सर्व सदस्य, संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन गीता खोत यांनी केले. आभार विलास पाटोळे यांनी मानले.

# नाम.संतोष लाड यांनी जिंकली निपाणीवासियांची मने

## अस्सल मराठीत भाषणासह कार्यकर्त्यासोबत केले भोजन



निपाणी: निकू पाटील यांच्या घरी जमीनीवर बसून कार्यकर्त्यासोबत भोजन करताना नाम.संतोष लाड.सोबत सुजय पाटील.

निपाणी,ता.२८(प्रतिनिधी)–

**शनिवार दि.२७ रोजी निपाणी दौऱ्यावर मराठा समाजाच्या चिंतन मेळाव्यास आलेले राज्याचे कामगार मंत्री व मराठा समाजाचे धुरंदर नेते नामदार संतोष लाड यांनी कन्नड,इंग्रजी व मराठी या तिन्ही भाषेत केलेले दमदार भाषण व कार्यकर्त्यांसोबत बसून केलेले भोजन त्यांच्या या अशा कृतीमुळे त्यांनी निपाणी वासियांची मने जिंकली आहेत.**

नाम.लाड हे आतापर्यंत चार वेळा आमदार राहिले असून राज्यातील मराठा समाजाचे बुलंद नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.राज्यात ते मराठा समाजाचे एकमेव आमदार आहेत.ते शनिवारी निपाणी दौऱ्यावर आले असता निपाणी भागातील मराठीपणा ओळखून त्यांनी कन्नड इंग्रजी व मराठी भाषेमध्ये नागरिकांना आपल्या रांगड्या भाषेमध्ये मार्गदर्शन केले.तसेच तुम्ही कुठल्याही पक्षात राजकारण करा मात्र, ते समाजहिताचे राजकारण करा,समाजाचा फायदा कसा होईल याकडे लक्ष द्या असाही त्यांनी सल्ला दिला.कार्यक्रमानंतर त्यांनी निपाणी टाऊन प्लॅनचे अध्यक्ष निकु पाटील यांच्या घरी भोजन केले.त्यांची डायनिंग टेबलवर भोजनाची व्यवस्था केली होती, मात्र त्यांनी त्यास नकार देत जमिनीवर बसूनच कार्यकर्त्यांसोबत भोजनाचा आस्वाद घेतला.

तसेच सोबत असलेल्या अनेक कार्यकर्त्यांसोबत त्यांनी विविध विषयावर चर्चा करून त्यांची आस्थेने विचारपूस केली.दिवंगत माजी आमदार काकासाहेब पाटील यांच्या अनेक आठवणींना त्यांनी उजाळा दिला.चार वेळा आमदार व मंत्री राहिलेल्या लाड यांचा कोणताही बडेजाव दिसून आला नाही.लाड यांचा हा साधेपणा निपाणीकरांना चांगलाच भावलेला दिसून आला.

# तीन आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई,ता.२८

**राज्यातील नगरपालिका निवडणुकांचे निकाल हाती आले असून आता महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्यातच, राज्यातील तीन सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.**

आयएसआय अधिकारी कश्मीरा संखे यांच्याकडे आता नाशिक जिल्ह्यातील आयटीडीपी या प्रकल्पावर सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. संखे यांच्यासह वरिष्ठ सनदी अधिकारी शैला ए. सचिव (वित्तीय सुधारणा, वित्त मंत्रालय) यांना मंत्रालयातील नियोजन विभागाच्या सचिव आणि विकास आयुक्तपदी नियुक्त करण्यात आली आहे. यांसह २०२३ च्या बॅचचे आएएएस अधिकारी अरुण एम यांना गडचिरोलीत सहाय्यक जिल्हाधिकारी पदावर नियुक्ती देण्यात आली आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच राज्यातील ५ सनदी अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश जारी करण्यात आले होते. त्रिगुण कुलकर्णी राहुल रंजन महिवाल, प्रकाश खपले, डॉ. मंजिरी मानोलकर, अंजली रमेश या अधिकाऱ्यांचीही बदली करण्यात आली होती.



# दोघा संशयित हल्लोखोरांना पोलिसांनी बाजारपेठेत फिरवले

पेठवडगाव,ता.२८ (प्रतिनिधी)–

**हारतुरे विक्रेत्यावर एडक्याने हल्ला करणाऱ्या दोघा संशयित हल्लेखोरांना पोलिसांनी बेड्या ठोकून वडगावच्या बाजारपेठेत फिरवले.**

येथील सार्वत्रिक निवडणुकीत प्रभागातील उमेदवार निवडून आल्याने फटाके उडवायला सांगितल्याचा संशय आल्याने हद्दपार आरोपी सागर राजेंद्र खोत याने मित्र आयुब मेहबूब सरकवास याच्या मदतीने चार दिवसापूर्वी एडक्याने रतन आप्पासो पाटोळे यांच्या डोक्यात, तोंडावर वार केल्याने तो गंभीर जखमी झाला. याप्रकरणी चौकशीसाठी पोलिसांनी दोघा संशयितांना बेडया ठोकून घटनास्थळी फिरवले. यावेळी बघ्यांची गर्दी झाली होती.

# भौतिक चंगळवादाच्या जगात पुस्तक नाहीशी होत आहेत

डॉ. राजन गवस

इचलकरंजी, ता. २८–

**समाजातील शिक्षित नवीन मध्यमवर्गांनी घरापासून तुटून गावची भाषा सोडली आहे. जुन्या मध्यमवर्गीयांमुळे भाषा आणि संस्कृती जिवंत आहे. भौतिक चंगळवादाच्या जगात पुस्तक नाहीसे होत असून ९९ टक्के शिक्षकांच्या घरात पुस्तक नाही, ही शोकांतिका आहे. अशा लोकांच्या घरात मराठीला भवितव्य नाही, असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी व्यक्त केले.**



मराठी साहित्य संमेलन स्मृती जागर सांगता कार्यक्रमात बोलताना डॉ. राजेंद्र गवस शेजारी व्यासपीठावर इतर. (छाया : गजनान खोत)

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या सुवर्ण महोत्सवी स्मृतीजागर सांगता समारंभात डॉ. राजन गवस बोलत होते. अध्यक्षस्थानी समारंभाचे निमंत्रक दिलीप शेंडे होते.

याप्रसंगी सुप्रसिध्द कवी पोलीस उपअधीक्षक (लातूर) समीरसिंह साळवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. गवस पुढे म्हणाले, मराठी भाषा अभिजात होती. आता फक्त त्यावर शासनाने शिक्का मारला आहे. आज महाराष्ट्रात माणूस कोणत्याही अर्थाने मराठी माणूस आणि मराठीचा अभिमान राहिला नाही. मराठीचा माणूस समाजात बॅटरी देऊन शोधण्याची वेळ आली आहे. भाषा दूर जात असल्याने संस्कृतीचे सर्व घटक दूर जात आहेत.आत्मघातकी वाटेवर चालणाऱ्या समाजाला दुरुस्त करायचे असेल तर मराठी भाषेला ज्ञानभाषा करायला हवी आणि जगभरातील ज्ञान मराठीत आणण्याची व्यवस्था निर्माण करायला हवी.

प्रसाद कुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. आभार वैशाली नायकवडी यांनी मानले. समारंभाच्या शेवटच्या सत्रात पोलीस उपअधीक्षक समीरसिंह साळवे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन झाले.

# भाजपच्या संभाव्य उमेदवार यादीवर सकारात्मक चर्चा

इचलकरंजी,ता.२८–

**शहरातील सर्व प्रभागांतील उमेदवार निवडीसंदर्भात भाजप पदाधिकाऱ्यांसमोर पुन्हा एकदा सविस्तर आणि सकारात्मक चर्चा झाल्याचे सांगण्यात आले. भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत कोल्हापूर येथे बैठक झाली.**



मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीप्रसंगी आम. राहूल आवाडे, सुरेशराव हाळवणकर, प्रकाश आवाडे व इतर.

इचलकरंजी महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजपच्या वतीने संभाव्य उमेदवारांची नावे निश्चित झाल्याचे समजल्यानंतर निष्ठावंतांना डावलून काही चुकीच्या किंवा पक्ष विरोधी काम करणाऱ्यांना उमेदवारी दिल्याबद्दल पदाधिकारी व कार्यकर्त्यांमधून संतप्त सवाल उपस्थित करण्यात आले. त्यातून नाराजीचा सूर उमटू लागल्याने सर्व घटनांचा आढावा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी संभाव्य यादीला स्थगिती दिली. भाजप उमेदवार निवडीसंदर्भात रविवारी मुंबईत तातडीचे बैठकही बोलाविली होती. सदरची बैठक मुंबईऐवजी कोल्हापूर येथे झाली.

भाजपकडे प्रत्येक प्रभागातून इच्छुकांची संख्या लक्षणीय असून ६५ जागांसाठी तब्बल ४२९ जणांनी मागणी केली आहे. उमेदवारांच्या मुलाखती, प्रभागनिहाय सर्व्हे आणि विजयी होण्याची क्षमता या निकषावर अंतिम झालेली यादी प्रदेशाध्यक्षांकडे पाठविण्यात आली होती. त्यावर प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत बैठक होऊन जवळपास ९० टक्के यादी निश्चित झाली होती. त्यानुसार संबंधितांना तयारीला लागण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानंतर निष्ठावंत पदाधिकारी व कार्यकर्त्यांमधून प्रचंड रोष निर्माण झाला होता.या सर्व पार्श्वभूमीवर रविवारी कोल्हापुरात मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यावेळी पक्ष निरीक्षक मकरंद देशपांडे, आमदार राहुल आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, भाजप प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर, जिल्हाध्यक्ष राजवर्धन नाईक-निंबाळकर आदी उपस्थित होते. बैठकीत १ ते १६ या सर्वच प्रभागनिहाय उमेदवार निवडीसंदर्भात पुनश्च सविस्तर चर्चा झाली. सर्व जागांबद्दलही सकारात्मक चर्चा झाली आहे. कार्यकर्त्यांनी कोणताही निर्णय घाई गडबडीत न घेता संयम बाळगावा, असे आवाहन आमदार राहुल आवाडे यांनी केले आहे.

# घातक मिश्रित दुधाचा पर्दाफाश

मुंबई,ता.२८–

**मुंबईकरांच्या आरोग्याशी खेळणारा एक भयानक प्रकार समोर आला आहे.**

अंधेरी पश्चिम येथील कपासवाडी परिसरात स्थानिक रहिवासी आणि पोलिसांनी छापा टाकून बनावट दूध तयार करणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. चक्क डिटर्जंट पावडर, युरिया आणि रिफाईंड तेल वापरून हे पांढरे विष तयार केले जात असल्याचा खळबळजनक खुलासा झाला आहे.

# कोकरूड येथील स्व. शिवाजीराव देशमुख क्रिडांगणाचे उद्घाटन

शिराळा ,ता.२८(प्रतिनिधी)–

**शिराळा तालुक्यातील कोकरूड फाटा येथे साकारण्यात आलेल्या भव्य स्व. शिवाजीराव देशमुख क्रिडांगणाचे उद्घाटन निनाईदेवी कारखान्याचे माजी चेअरमन फत्तेसिंगराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आ. सत्यजित देशमुख, सौ. रेणुकादेवी देशमुख, शिराळा नगरीचे नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती.**

कोकरूड येथील हे क्रिडांगण साकारण्यासाठी आ. सत्यजित देशमुख यांनी सुमारे ३४ लाखांचा निधी उपलब्ध करून दिला होता. कोकरूड येथे भव्य क्रिडांगण व्हावे यासाठी कोकरूड येथील निनाईदेवी स्पोर्ट्सचे पदाधिकारी यांनी आ. सत्यजित देशमुख यांच्याकडे मागणी केली होती. याप्रसंगी शिराळा नगरीचे नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक तसेच भाजप – शिवसेनेच्या निवडून आलेल्या नगरसेवकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अनिलराव देशमुख, विकासराव देशमुख, विकास नांगरे, प्रा. ए. सी. पाटील, पोपट पाटील, नंदकुमार पाटील, मोहन पाटील, राजवर्धन देशमुख, विश्व प्रतापसिंह नाईक, डॉ. प्रशांत ठोंबरे, नथुराम सावंत, राम यमगर, बंडा मुलाणी, सचिन घोडे, तोसिफ मकानदार निनाईदेवी स्पोर्ट्सचे पदाधिकारी अमीर मुलाणी, संजय घोडे, पवन कोरे ,विष्णु सूर्यवंशी, गणेश सुतार, विकास जाधव, अनिरुध्द माने, संजय नांगरे, प्रमोद पाटील, महेश घोडे, अमोल वकुलकर, सिकंदर मुल्ला, युवराज गमे, मुन्ना पठाण, अमोल घोडे, निलेश मोरे, सुभाष सुतार आदींसह कोकरूड परिसरातील ग्रामस्थ, क्रिकेट खेळाडू उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास जाधव व आनंदा पाटील यांनी केले.


**कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालय – ४१६ ००३.**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

| | |
|---|---|
| दूरध्वनी क्र. : (०२३१) २६६६८५५<br>ई मेल : spkolhapur.ee@mahapwd.gov.in | फॅक्स नं. : (०२३१) २६५०१४०<br>वेब साईट : www.mahapwd.com |
| जा. क्र. लेखा/निविदा/सु.क्र.३६/३८७८/२०२५ | दिनांक : २४/१२/२०२५ |

**ई – निविदा सूचना क्रमांक ३६, सन २०२५–२६ (ऑनलाईन)**

कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, कोल्हापूर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खालील नमुन्यातील (B-1) निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. निविदाधारकांना सुचित करण्यात येते की, ऑनलाईनमध्ये प्रसिद्ध केलेल्या व कॉन्ट्रॅक्ट डाटामधील अटी तांत्रिक स्पेसिफिकेशन व शेड्युलड – बी मधील परिमाण हे बिड डाटा निविदा संचामध्ये समाविष्ट करणेत आलेले आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रू. लक्ष | इसारा रक्कम | निविदा फी रूपये | काम पुर्ण करणेचा कालावधी | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | यवलूज ता. पन्हाळा येथे समाज मंदीर बांधकाम करणे. | २१.१० (रुपये एकवीस लक्ष दहा हजार) | २२,०००/- | ५००/- +GST | १२ महिने | वर्ग – ५ अ |
| २ | पोर्ले तर्फ बोरगांव, ता. पन्हाळा येथील दलित वस्तीमधील अंतर्गत रस्ता खडीकरण, डांबरीकरण, कॉंक्रिटीकरण करणे व आर.सी.सी. गटर्स बांधणे. | १६.८८ (रुपये सोळा लक्ष अठठ्याऐंशी हजार) | १७,०००/- | ५००/- +GST | ६ महिने | वर्ग – ५ अ |
| ३ | पणुत्रे, ता. पन्हाळा येथील दलित वस्तीमधील अंतर्गत रस्ता खडीकरण, डांबरीकरण, कॉंक्रिटीकरण करणे व आर.सी.सी. गटर्स बांधणे. | १२.६६ (रुपये बारा लक्ष सासष्ट हजार) | ०/- | ५००/- +GST | ६ महिने | सु.बे.अ. (कोल्हापूर जिल्हा फक्त) |
| ४ | घरपण, ता. पन्हाळा येथील दलित वस्तीमधील अंतर्गत रस्ता खडीकरण, डांबरीकरण, कॉंक्रिटीकरण करणे व आर.सी.सी. गटर्स बांधणे. | १२.६६ (रुपये बारा लक्ष सासष्ट हजार) | ०/- | ५००/- +GST | ६ महिने | सु.बे.अ. (कोल्हापूर जिल्हा फक्त) |
| ५ | मौ.निळे येथे चावडी बांधकाम करणे., ता.शाहुवाडी जि. कोल्हापूर | ११.८७ (रुपये अकरा लक्ष सत्याऐंशी हजार) | ०/- | ५००/- +GST | ६ महिने | सु.बे.अ. (कोल्हापूर जिल्हा फक्त) |

**ई – निविदेचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ठेकेदारांनी ऑनलाईन निविदा डाऊनलोड करणेचा कालावधी | दिनांक :–३०/१२/२०२५ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते दिनांक ०७/०१/२०२६ (सायं. १८.०० वा. पर्यंत) |
| निविदा इसारा रक्कम, निविदा शुल्क व प्रतिज्ञापत्र इत्यादीचे मुळ दस्तएवेज सादर करावयाचे ठिकाण व दिनांक | कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.)विभाग,कोल्हापूर कार्यालयाचा पत्ता– ताराबाई पार्क, मुख्य पोस्ट कार्यालयाजवळ, रमणमळा, कोल्हापूर – ४१६००३ वरील कार्यालयात दि. ०८/०१/२०२६ रोजी (१५.०० पर्यंत) |
| तांत्रिक व आर्थिक निविदा उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ **(शक्य झाल्यास)** | कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालयात दिनांक **०८/०१/२०२६** रोजी सकाळी १५.०० नंतर (शक्य झाल्यास). |

टीप :–
१) सर्व पात्र / इच्छूक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या Main Portal - https://mahatenders.gov.in वर enrolled करणे आवश्यक आहे.
२) निविदाकारांना वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरित करण्यासंदर्भात काही शंका / अडचणी असल्यास त्यांनी ईमेल support-eproc@nic.in व दूरध्वनी क्रमांक ०१२०-४२००४६२, ०१२०-४००१००२ वर संपर्क साधावा.
३) निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्ताऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा रक्कमेची ऑनलाईन पावती, ऑनलाईन कोरा निविदा संच, डाऊन लोड केलेली पावती, स्वतःच्या नावाची गोपनियता पाळून ई निविदा वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
४) निविदेचे वेळापत्रक, इतर अटी व शर्ती तसेच अनुषंगीक बदल ई-निविदा पोर्टलवर https://mahatender.gov.in पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करणेचे अधिकार सक्षम अधिकारी कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवलेले आहेत. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
५) वरील कामांची ई-निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या इंटरनेटवरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/–
(चं. अ. आयरेकर)
कार्यकारी अभियंता,
विशेष प्रकल्प (सा. बां.) विभाग, कोल्हापूर.

विमाका/कोल्हापूर/२१९/२०२५-२०२६



**ई–निविदा संक्षिप्त जाहिरात**

| | |
|---|---|
| विभागाचे / कार्यालयाचे नाव | कार्यकारी अभियंता, सा. बां. (दक्षिण) विभाग, कोल्हापूर. |
| ई-निविदा मागविणारी सूचना | **ई-निविदा सूचना क्र. ५३, सन २०२५-२०२६ (ऑनलाईन) प्रसिद्ध करणेबाबत.** |
| **कार्यकारी अभियंता, सा. बां. (दक्षिण) विभाग, कोल्हापूर हे ऑनलाईन निविदा मागवित आहेत.** | |
| कामाचे संक्षिप्त वर्णन :- | राधानगरी व चंदगड तालुक्यातील साकव बांधकाम करणे व आय. टी. आय. इमारतीचा विकास करणेची कामे (एकूण ०२ कामे) |
| निविदा शुल्क व निविदेचा प्रकार | फॉर्म फी रुपये १२००/- व ६००/- फक्त (बी-१ निविदा) |
| १. कोणत्याही स्पष्टीकरणाकरिता निविदाधारकांनी दूरध्वनी क्रमांक (०२३१) २६५००४२ शी संपर्क साधावा. | |
| २. पत्रव्यवहाराकरिता संपर्क व्यक्ती व पत्ता . | |
| कार्यकारी अभियंता, सा. बां. (दक्षिण) विभाग, कोल्हापूर. | फॅक्स क्रमांक (०२३१) २६५०१४० |
| दूरध्वनी क्रमांक (०२३१) २६५००४२ | ई-मेल पत्ता southkolhapur.ee@mahapwd.gov.in |

**निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा डाऊनलोड करणेचा कालावधी | दिनांक ३०/१२/२०२५ वेळ सकाळी १०.०० वा.पासून ते दिनांक ०६/०१/२०२६ वेळ सायंकाळी १७.५५ वाजेपर्यंत |
| २ | निविदा पूर्व चर्चा बैठक स्थळ, दिनांक व वेळ (ऑनलाईन) | – निरंक – |
| ३ | निविदा इसारा रक्कम निविदा शुल्क व प्रतिज्ञापत्र इत्यादीचे मुळ दस्ताएवेज सादर करावयाचा दिनांक ०७/०१/२०२६ रोजी व वेळ सकाळी १०.०० वाजता. | (१) कार्यकारी अभियंता, सा.बां.(दक्षिण) विभाग, कोल्हापूर<br>(२) कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प (सा.बां) विभाग,कोल्हापूर<br>(३) मा.अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, कोल्हापूर<br>वरील तिन्ही कार्यालयाचा पत्ता – ताराबाई पार्क, मुख्य पोस्ट कार्यालय जवळ, कोल्हापूर. |
| ४ | तांत्रिक व आर्थिक निविदा उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | कार्यकारी अभियंता, सा. बां. (दक्षिण) विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालयात दिनांक ०७/०१/२०२६ रोजी सकाळी १०.०५ पासून ऑफलाईन उघडणेत येतील (शक्य झाल्यास) |

सही/–
(बी. एल. हजारे)
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग,
कोल्हापूर.

विमाका/कोल्हापूर/२१८/२०२५-२०२६

# स्मृतीपुढे लंकेचे लोटांगण

## वर्ल्ड रेकॉर्डसह संघाला मिळवून दिला मोठा विजय, भारताचा विजयी चौकार

तिनुअनंतपुरम,ता.२८–

**स्मृती मानधनाने धडाकेबाज फटकेबाजी करत श्रीलंकेच्या संघाला आपल्यापुढे लोटांगण घालायला भाग पाडले. स्मृतीला यावेळी शेफाली वर्माची चांगली साथ मिळाली. या दोघांनी १६२ धावा करतसंघाला दमदार सुरुवात करून दिली. त्यामुळे भारताला २२१ धावांचा डोंगर उभारता आला. या आव्हानाचा पाठलाग करताना श्रीलंकेला पुन्हा अपयश आले आणि भारताने सहजपणे हा सामना ३० धावांनी जिंकला.**

स्मृती मानधना आणि शेफाली वर्मा यांनी श्रीलंकेच्या संघावर दुहेरी हल्ला चढवला. भारताने या मालिकेत प्रथम फलंदाजी स्विकारली होती, या संधीचा चांगलाच फायदा स्मृती आणि शेफाली या दोघींनी उचलल्याचे पाहायला मिळाले. स्मृती आणि शेफाली यांनी पहिल्या षटकापासूनच आक्रमक फटकेबाजी करायला सुरुवात केली. स्मृतीने यावेळी २७ धावा केल्या आणि एक मोठा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला. कारण आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद १० हजार धावा करणारी स्मृती मानधना ही जगभरातील पहिलीच खेळाडू ठरली. यापूर्वी भारताच्या मिताली राजने १० हजार धावा पूर्ण



केल्या होत्या, पण त्यासाठी तिला ३१४ सामने खेळावे लागले होते. पण स्मृतीने फक्त २८० सामन्यांतच ही दर्जेदार कामगिरी करून दाखवली. स्मृतीने त्यानंतर धडाकेबाज फटकेबाजी पूर्ण करत आपले अर्धशतकही झळकावले.

स्मृती आणि शेफाली या दोघींनीही आपले अर्धशतक झळकावले आणि दोघीही शतकाच्या दिशेने कूच करायला लागल्या होत्या. पण या दोघींना यामध्ये यश आले नाही. पण या दोघींनी मिळून संघाला तब्बल १६२ धावांची सलामी दिली. भारताला पहिला धक्का शेफाली वर्माच्या रुपात बसला. शेफालीने या सामन्यात १२ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ४६ चेंडूंत ७९ धावांची दमदार खेळी साकारली. शेफाली वर्माचे हे सलग तिसरे अर्धशतक ठरले. स्मृतीने त्यानंतर काही काळ फलंदाजी केली, पण तिला शतकापासून वंचित राहावे लागले. स्मृतीने यावेळी ४८ चेंडूंत ११ चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर ८० धावांची खेळी साकारली. त्यानंतर रिषा घोषने १६ चेंडूंत ४० धावांची वादळी खेळी साकारली आणि त्यामुळेच भारताला २२१ धावांचा डोंगर उभारता आला.

भारताच्या २२२ धावांचा पाठलाग करण्यासाठी श्रीलंकेचा संघ उतरला, कर्णधार चमिरा अटापटूने यावेळी वादळी अर्धशतक झळकावत संघाला विजयाची आशा दाखवली होती. पण चमिरा ५२ धावांवर बाद झाली आणि त्यानंतर भारताच्या दिशेने हा सामना झुकायला सुरुवात झाली.अटापट्टू ५२ आणि दुलानी २९ धावा करून बाद झाली.१२९ धावांवर २ विकेट पडल्यानंतरही श्रीलंकेने वेगाने फलंदाजी केली. खालच्या फळीत निलाक्षी डी सिल्वाने २३ धावा केल्या.संघाने ६ विकेट गमावून १९१ धावा केल्या. चौथा सामना जिंकून भारताने मालिकेत ४–० अशी अजिंक्य आघाडी घेतली. पाचवा सामना ३० डिसेंबर रोजी तिरुवनंतपुरममध्येच खेळला जाईल.



### स्मृती मानधनाने वर्ल्ड रेकॉर्डसह रचला इतिहास

स्मृती मानधनाने पुन्हा एकदा मैदान गाजवल्याचे पाहायला मिळाले. कारण स्मृतीने श्रीलंकेविरुद्धच्या चौथ्या टी २० सामन्यात एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केल्याचे पाहायला मिळाले.

स्मृती मानधनाने वनडे वर्ल्ड कप चांगलाच गाजवला होता. भारताकडून सर्वाधिक धावा या स्मृतीच्या नावावर होत्या, त्याचबरोबर ती या विश्वविजेत्या संघाची उपकर्णधारही होती. वनडे वर्ल्ड कप तिने चांगलाच गाजवला होता. त्यानंतर आता ती या मालिकेत फलंदाजीला उतरली. पण गेल्या काही सामन्यांत तिला लय सापडली नव्हती, पण या सामन्यात मात्र तिला चांगलात सूर गवसला होता आणि त्यामुळेच तिने एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

स्मृतीने आता पर्यंत वनडे आणि टी २० क्रिकेटमध्ये दमदार फलंदाजी केली आहे. स्मृतीने या सामन्यात १० हजार धावा पूर्ण करण्याचा मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. यापूर्वी भारताकडून मिताली राजने ३१४ सामन्यांत १० हजार धावांचा पल्ला ओलांडला होता. पण स्मृतीने मात्र २८० सामन्यांतच हा मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. जगभरात कोणालाही एवढ्या कमी सामन्यांत १० हजार धावा करता आल्या नाहीत आणि त्यामुळे भारताकडून सर्वात जलद १० हजार धावा पूर्ण करण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड आता स्मृती मानधनाच्या नावावर असणार आहे. त्यामुळे स्मृती मानधनाने भारतीय क्रिकेटमध्ये एक नवा अध्याय लिहिला आहे. त्यामुळे आता भारताकडून सर्वात जलद १० हजार पूर्ण करण्याचा महा रेकॉर्ड आता स्मृती मानधनाच्या नावावर असणार आहे. स्मृतीने या सामन्यात २७ धावा पूर्ण केल्या आणि हा महारेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.स्मृती मानधनाने या सामन्यात दमदार फलंदाजी केली. त्यामुळे भारताला पहिल्या पॉवर प्लेमध्ये ६१ धावा करता आल्या.

# गौतम गंभीर भारताचा कसोटी प्रशिक्षक म्हणून कायम राहणार

### बीसीसीआयने अखेर सोडले मौन

नवी दिल्ली,ता.२८–

**भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्याभोवती सुरू असलेल्या अटकळींवर आता भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने प्रतिक्रिया दिली आहे. बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी स्पष्ट केले की, गंभीर यांना प्रशिक्षकपदावरून हटवण्याच्या बातम्या पूर्णपणे निराधार आणि तथ्यहीन आहेत.गौतम गंभीर भारताचा कसोटी प्रशिक्षक म्हणून राहील.**

अलीकडेच दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत पराभवानंतर, बीसीसीआयमधील एका अधिकाऱ्याने माजी भारतीय फलंदाज व्ही.व्ही.एस. लक्ष्मण यांच्याशी कसोटी संघाच्या प्रशिक्षकपदाबाबत चर्चा केल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये गंभीर यांचा प्रशिक्षक म्हणून रेकॉर्ड चांगला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघाने एक आयसीसी आणि एक एसीसी ट्रॉफी जिंकली आहे. मात्र, तगड्या देशांविरुद्ध १० कसोटी सामने गमावल्यानंतर लाल चेंडूच्या क्रिकेटमध्ये गंभीर यांच्या प्रशिक्षक म्हणूनच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.



वृत्तसंस्था पीटीआयच्या अहवालानुसार, बीसीसीआयमधील महत्त्वाच्या पदावर असलेल्या एका व्यक्तीने अनौपचारिकरीत्या व्ही.व्ही.एस. लक्ष्मण यांच्याशी संवाद साधून, ते लाल चेंडूच्या संघाचे प्रशिक्षकपद स्वीकारण्यास इच्छुक आहेत का, याची चाचपणी केली होती. मात्र पुढे असे समोर आले की, लक्ष्मण सध्या बंगळुरू येथील 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये हेड ऑफ क्रिकेट या पदावर समाधानी आहेत.

गंभीरबाबत आता सैकिया यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. त्यांनी वृत्तसंस्था एएनआयशी बोलताना सांगितले, ''ही बातमी पूर्णपणे चुकीची आहे. काही प्रतिष्ठित माध्यमांनीही ती पसरवली असली, तरी त्यात कोणतेही तथ्य नाही. बीसीसीआयने असा कोणताही निर्णय घेतलेला नाही. ही पूर्णपणे मनघडंत कथा आहे. यात कोणतीही सत्य नाही. ही बातमी तथ्यात्मकदृष्ट्या चुकीची आणि निराधार आहे, एवढेच मी स्पष्टपणे सांगू शकतो.

गौतम गंभीर यांचा बीसीसीआयसह असलेला करार २०२७ मधील एकदिवसीय विश्वचषकाच्या समाप्तीपर्यंत आहे. मात्र, बीसीसीआयच्या गोटात अद्यापही यावर चर्चा सुरू असल्याचा दावा करण्यात येत होता की, जागतिक कसोटी अजिंक्यपद २०२५–२७ या चक्रातील उर्वरित नऊ कसोटी सामन्यांसाठी लाल चेंडूच्या संघाचे नेतृत्व करण्यास गंभीर योग्य आहेत की नाही.भारताने इंग्लंडविरुद्धची पाच कसोटी सामन्यांची मालिका २२ अशी बरोबरीत संपवली होती. २०२६ मध्ये भारतीय संघाला श्रीलंकेविरुद्ध दोन कसोटी सामने खेळायचे आहेत, तर ऑक्टोबरमध्ये न्यूझीलंडचा दौरा करायचा आहे. त्यानंतर जानेवारी फेब्रुवारी २०२७ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध घरच्या मैदानावर पाच कसोटी सामन्यांची महत्त्वाची मालिका खेळली जाणार आहे. मात्र, सैकिया यांच्या वक्तव्यामुळे हे स्पष्ट झाले आहे की, गौतम गंभीर यांना प्रशिक्षक म्हणून बीसीसीआयचा पूर्ण पाठिंबा मिळत आहे.

# वैभव सूर्यवंशी अंडर–१९ टीम इंडियाचा कर्णधार

## दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी मिळाली कमान; विश्वचषकात आयुष म्हात्रेकडे कर्णधारपद

नवी दिल्ली,ता. २८–

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा केली. आयुष म्हात्रेला कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे, तर विहान मल्होत्राला उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. स्फोटक फलंदाज वैभव सूर्यवंशीचाही संघात समावेश करण्यात आला आहे. पुढील वर्षाच्या सुरुवातीला तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी टीम इंडिया दक्षिण आफ्रिकेचा दौरा करणार आहे. १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेसाठी निवडलेला तोच संघ या मालिकेतही खेळणार आहे.**

१९ वर्षांखालील विश्वचषक १५ जानेवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान झिम्बाब्वे आणि नामिबियामध्ये होणार आहे. १६ संघांची चार गटांमध्ये विभागण्यात आली आहे. पाच वेळा १९ वर्षांखालील विश्वचषक विजेता भारत न्यूझीलंड, अमेरिका आणि बांगलादेशसह गट ब मध्ये आहे. भारत १५ जानेवारी रोजी अमेरिकेविरुद्धच्या सामन्याने आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. त्यानंतर संघ १७ जानेवारी रोजी बांगलादेश आणि २४ जानेवारी रोजी न्यूझीलंडशी सामना करेल. स्पर्धेचा अंतिम सामना हरारे येथे खेळवला जाणार आहे.



यापूर्वी, टीम इंडिया तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी दक्षिण आफ्रिकेचा दौरा करणार आहे. १९ वर्षांखालील एकदिवसीय विश्वचषकापूर्वी ही मालिका भारतासाठी महत्त्वाची आहे. बीसीसीआयने आयुष म्हात्रे आणि विहान मल्होत्रा या मालिकेत खेळणार नसल्याचे जाहीर केले. दोघेही मनगटाच्या दुखापतींमुळे त्रस्त आहेत. परिणामी, बोर्डाने वैभव सूर्यवंशी यांना कर्णधार आणि आरोन जॉर्ज यांना उपकर्णधार म्हणून नियुक्त केले आहे. हे तीन सामने अनुक्रमे ३, ५ आणि ७ जानेवारी रोजी विलोमोर पार्क येथे खेळले जातील.

**दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी भारतीय संघ:** वैभव सूर्यवंशी (कर्णधार), आरोन जॉर्ज (उपकर्णधार), वेदांत त्रिवेदी, अभिज्ञान कुंडू (यष्टीरक्षक), हरवंश सिंग (यष्टीरक्षक), आर.एस. अंबरिस, कनिष्क चौहान, खिलन ए. पटेल, मोहम्मद एनन, हेनिल पटेल, डी. दीपेश, किशन कुमार सिंग, उद्धव मोहन, युवराज गोहिल, राहुल कुमार.

**अंडर–१९ एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघ:** आयुष म्हात्रे (कर्णधार), विहान मल्होत्रा (उपकर्णधार), वैभव सूर्यवंशी, आरोन जॉर्ज, वेदांत त्रिवेदी, अभिज्ञान कुंडू (यष्टीरक्षक), हरवंश सिंग (यष्टीरक्षक), आर.एस. अंबरीश, कनिष्क चौहान, खिलन ए. पटेल, मोहम्मद एनान, हेनिल पटेल, डी. दिपेश, किशन कुमार सिंग, उद्धव मोहन.

### न्यूझीलंड विरुद्धच्या एकदिवसीय मालिका

# पंतला संधी मिळण्याची शक्यता कमी

नवी दिल्ली, ता.२८–

**भारत आणि न्यूझीलंड पुढील महिन्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळणार आहेत. ज्यासाठी भारतीय संघाची घोषणा पुढील काही दिवसांत होण्याची अपेक्षा आहे. या मालिकेसाठी ऋषभ पंतची निवड होण्याची शक्यता कमी आहे. भारत आणि न्यूझीलंडमधील एकदिवसीय मालिका ११ जानेवारीपासून सुरू होईल. जर पंतला संधी मिळाली नाही तर यष्टीरक्षक इशान किशनला संघात स्थान मिळणार असल्याची चर्चा भारतीय क्रिकेट वर्तुळात आहे.**



इशानला अलीकडेच टी विश्वचषक आणि न्यूझीलंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी मालिकेसाठी संघात स्थान देण्यात आले. इशानने देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी करून राष्ट्रीय संघात पुनरागमन केले आहे. पंतने शेवटचा भारताकडून ७ ऑगस्ट २०२४ रोजी श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात खेळला होता. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी पंतचाही समावेश असला तरी, तो कोणत्याही सामन्यात खेळला नाही.

पंतच्या अनुपस्थितीत, ईशान एकदिवसीय संघात स्थान मिळविण्याचा दावेदार आहे. ईशानने भारताकडून शेवटचा २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात अफगाणिस्तानविरुद्ध खेळला होता. तेव्हापासून तो एकदिवसीय संघाबाहेर आहे. ईशान २०२५ च्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता आणि झारखंडला स्पर्धेतील पहिल्या विजेतेपदात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. ईशानने अंतिम सामन्यात हरियाणाविरुद्ध शतक झळकावले. ईशानने विजय हजारे ट्रॉफीमध्ये हा फॉर्म कायम ठेवला, कर्नाटकविरुद्ध ३३ चेंडूत शतक झळकावले, जे लिस्ट ए क्रिकेटमध्ये भारतीय संघाचे दुसरे सर्वात जलद शतक आहे.

दुसरीकडे, दुखापतीनंतर शुभमन गिल एकदिवसीय मालिकेत कर्णधार म्हणून परतू शकतो. गिल मानेच्या दुखापतीमुळे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेचा भाग नव्हता. पण उपकर्णधार श्रेयस अय्यर न्यूझीलंड मालिकेचा भाग असेल की, नाही हे अद्याप स्पष्ट नाही. श्रेयसला ऑस्ट्रेलिया दौऱ्यादरम्यान दुखापत झाली होती आणि त्याने बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स येथे नेटमध्ये फलंदाजी करण्यास सुरुवात केली आहे. पण त्याला अद्याप खेळण्याची परवानगी मिळालेली नाही.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत केएल राहुलने एकदिवसीय संघाचे नेतृत्व केले होते, जी भारताने २–१ अशी जिंकली होती. पंत सध्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये दिल्लीचे प्रतिनिधित्व करत आहे, त्याने पहिल्या दोन सामन्यात ५ आणि ७० धावा केल्या आहेत.

# अडीच फूट उंचीची 'पुंगनूर' गाय, १२ किलोचा टर्की कोंबडा ठरले आकर्षण

## यशवंत कृषी प्रदर्शनात विक्रमी गर्दी

कराड,ता.२८(प्रतिनिधी)–

**अडीच फूट उंचीची दुर्मीळ 'पुंगनूर' जातीची गाय, दीड ते दोन फूट उंचीचे बुटके बोकड व शेळ्या, तब्बल १२ किलो वजनाचा टर्की कोंबडा, तसेच रंगीबेरंगी विदेशी पोपट हे कराड येथील विसाव्या राज्यस्तरीय यशवंतराव चव्हाण कृषी, औद्योगिक व पशुपक्षी प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण ठरत आहेत. रविवार सुट्टी असल्याने लाखो नागरिक, शेतकरी व विद्यार्थ्यांनी प्रदर्शनास भेट दिली.**

शेती उत्पन्न बाजार समिती कराड, महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद कृषी विभाग व आत्मा प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने कराड येथील बैल बाजार तळावर हे भव्य प्रदर्शन सुरू आहे. सकाळपासूनच शेतकरी कुटुंबांसह नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लावत विविध स्टॉल्स, पशुपक्षी दालन आणि फुलांच्या स्पर्धा पाहण्याचा आनंद घेतला.प्रदर्शनातील फुले पिक स्पर्धा दालन मनमोहक, सुगंधी व रंगीबेरंगी फुलांनी नटले असून, शेवंती व झेंडू फुलांनी अव्वल मान पटकावला. जिल्हाभरातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग या स्पर्धेत पाहायला मिळाला.

कराड तालुक्यातील बेलवडे बुद्रुक येथील सर्जेराव शामराव मोहिते यांनी प्रदर्शनात आणलेली अडीच फूट उंचीची 'पुंगनूर' जातीची गाय नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. तिरुपती बालाजी देवस्थानात देवाच्या अभिषेकासाठी या गायीचे दूध, दही व तूप वापरले जाते.१ ते २५ लाख रुपये किंमत असलेली ही गाय दररोज ३ ते ५ लिटर दूध देते. दुधाला प्रतिलिटर ३०० ते ५०० रुपये, तर तुपाला प्रतिकिलो ५ ते १० हजार रुपयांपर्यंत दर मिळतो.

दीड ते दोन फूट उंचीचे शिंगे असलेले बुटके बोकड व दूध देणाऱ्या शेळ्या पाहण्यासाठी नागरिक मोठ्या कुतूहलाने चौकशी करत आहेत. यासोबतच पर्शियन मांजर, फायटर असील कोंबडा, पाळीव ससे, ब्लॅक अँड व्हाईट कबुतरे, विविध जातींचे रंगीबेरंगी विदेशी पोपट व आफ्रिकन बर्ड्स प्रदर्शनात दाखल झाले आहेत. हे सर्व पशुपक्षी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची कर्मभूमी असलेल्या कागल येथील हैदरअली बर्ड ब्रिडिंग फार्मच्या माध्यमातून सादर करण्यात आले आहेत.

सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील करोली गावच्या स्वराज ॲग्रो फार्मच्या स्टॉलवर तब्बल १२ किलो वजनाचा टर्की कोंबडा पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. याशिवाय टर्की, चिनी



कोंबड्या, इंडियन बदक, राजहंस बदक, गावरान, कडकनाथ, गिरीराज, सातपुडा, सोनाली, कावेरी व ब्लॅक अस्ट्रोलॉप अशा विविध जातींच्या कोंबड्या–कोंबडे प्रदर्शनात दाखल असून त्या नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

कराड शेती उत्पन्न बाजार समिती, जिल्हा परिषद व राज्य शासनाच्या कृषी विभाग, आत्मा प्रकल्प यांच्या वतीने आयोजित फुले पिक स्पर्धेत जिल्हाभरातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदविण्यात आला. काशिळ (ता. सातारा) येथील सोहम दीपक जाधव यांच्या शेवंती व मुंढे (ता. कराड) येथील संजय नाना माळी यांच्या झेंडू फुलांना विभागून प्रथम क्रमांक मिळाला. वडोली निळेश्वर (ता. कराड) येथील संजय पवार व केसे (ता. कराड) येथील राजेंद्र पाटील यांच्या गुलाब फुलांनी द्वितीय क्रमांक पटकावला. तर म्हसवे (ता. सातारा) येथील सचिन शेलार यांच्या जरबेरा व पेडगाव (ता. खटाव) येथील दत्ता जगदाळे यांच्या निशिगंध फुलांना तृतीय क्रमांक मिळाला.